Registered N. N. 4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६ ] आकोला-- सोमवार तारीख २ माहे सप्टेंबर सन १९१२ ई० [ अंक ३५

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हिंदीच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटिस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारपर्यंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. मागाहून येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल

---

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

या बँकेत खाली दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ट शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

---

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले व उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६$\frac{२}{३}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. Phillips. एजंट
नो० नं० २

---

### जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

पत्ता एम. एम. आणि सन्स पुलाजवळ आकोले

## निराश्रित बालरक्षण गृह

सर्वत्र जन समाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातके कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्याना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांपण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वत.च करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगानियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ निराश्रित बालरक्षण गृह स्थापन केलें आहे भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगानियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णू प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता० १६-५-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. २६०

---

### आनंदी आनंद.

पाऊस चांगला पडला. या मुळें पिकें चांगलीं येणार. सबब पुढील सालांकरितां आमची सुधारलेलीं शेतकीचीं आऊतें मागवा. यांत तुमचाच फायदा होणार आहे.

किर्लोस्करबंधु.
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).
नो० नं० ४३२

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार. ताबडतोब दूर होतात. किं रु. १८८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ८४

बाटलीवाल्याचें गजकर्णावरील मलम

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधा विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच एल. बाटलीवाला जे. पी. मु वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० २७६

---

## NOTICE.

Two scholarships for the Bombay or Calcutta Veterinary Colleges will be awarded in October next. The course will last 3 years, at the end of which approved students will be eligible for admission into the Provincial Veterinary Service. Candidates must have passed at least the Matriculation Examination, and be of good physique and active habits. For details apply to the Superintendent, Civil veterinary Department, Central Provinces, Nagpur.

The Nagpur 16th August 1912. } Sd. C. E. Low, Director of Agre. & Inds., C. P.

No. No. 445

---

## NOTICE.

Under section 44 of the Berar Municipal Law the Municipal Committee of Basim propose to impose under section 41 (1) (A) (b) a tax on ginned and pressed cotton to be levied from all persons carrying on within the limits of the Basim Municipality trade of ginning cotton or pressing the same into bales by means of steam or mechanical process at the following rates;—

(1) For each Boja of 10 Maunds ginned...... 8 pies
(2) For each bale of [illegible] Maunds pressed. 10 pies

Note;— The income earned by the tax payers from this trade will not be assessable to the tax on professions and Trades leviable under Residency Orders Notification No 112 dated 18 March 1899.

Any inhabitant objecting to the levy of the proposed tax may be within 30 days from the publication of this notice submit his objection in writing to the chairman to the Committee. The objections received (if any) will be considered by the Committee at a Special Meeting due notice of which will be given to the objector

Dated Basim 31 st July 1912. } W. G. Slaney. Chairman Municipal Committee Basim

No. No. 451

---

### वऱ्हाडात खात्रीची उत्तम नवीन सोय.

### 'खरे गारेचे थंड चष्मे

आह्मी मुद्दाम वऱ्हाडच्या लोकाकरितां डोळे तपासून सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानें विकण्याचे दुकान काढले आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे. सर्व गरजूनीं अनुभव घेवून पहावा.

गोपाळ पांडुरंग आणि कंपनी
नो० नं० ४९३

---

### जाहिर खबर

तमाम लोकांस कळविण्यांत येते कीं आमचे चुलते मयत ओंकारसा धोंडांसा यांस एक मुलगा नामें शंकर हा आहे. हा अज्ञान असून त्याचें संगोपन त्याची मातुश्री नामें भिमाबाई मर्दे ओंकारसा हा करीत आहे. ओंकारसा व मी एकत्र होतो. व एकत्र असलेल्या इस्टेटींतून चिरंजीव शंकरच्या व माझी चुलती भिमाबाई इच्या उदर निर्वाहाकरितां ओंकारसाच्या वेळेसारखा दरमहा रुपये ५० ओंकारसा मेल्यापासून तारिख ५।७।१९१२ ह्मणजे अधिक आषाढ वा ६ पावेतों मी तिला देत गेलों परंतु अलिकडे कांहीं कार्यसाधू व उपद्व्यापी मंडळींच्या सल्यानें माझी चुलती भिमाबाई वागत आहे व तेव्हां पासून आह्मी पूर्वीप्रमाणें दरमहा रुपये पन्नास देण्यास तयार असतां ती पूर्वीप्रमाणें दरमहा रुपये पन्नास घेण्यास नाकारते. व लोकांपासून कर्ज काढण्याचें विचारांत आहे. तरी सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं या बाईला कर्ज काढण्याचें मुळींच कारण नाहीं. व तिला कर्ज काढण्याचा अधिकारही नाहीं. जो इजला तिचें स्वतःचें नांवानें अगर अज्ञानाचें नांवानें कर्ज देईल त्यानें रकमेची आदाई अज्ञानाचे इस्टेटींतून होणार नाहीं. हें पक्कें समजावें त्यानें स्वतःचे जोखमेवर भिमाबाईशीं वाटेल तर व्यवहार करावा कळावें. ही नोटीस

ता० १८-८-१२ सही
विश्वनाथ नागोसा सावजी खामगांव.
नो० नं० ४४०

# स्वदेशी भारत स्टोव्ह

फार टिकाऊ



अगदीं टिकाऊ

भारत स्टोव्ह ( साध्या केरोसीन तेलाच्या चुली ) फार टिकाऊ, अगदीं साधे. स्वस्त, घर्डा होणारे व परदेशी चुलीशीं प्रत्येक बाबतींत टक्कर देणारे असे आहेत. यांत बिघडण्यासारखें कांहीं नाहीं, व सहज दुरुस्त करतां येतात. कित्येक पदकें मिळालीं आहेत.

## भारत स्टोव्हचे ग्यासचे दिवे !!

रचनेंत अगदीं साधे ! या स्टोव्हच्या एका दिव्यानेंच एखाद्या दिवाणखान्यांत "किट्सन"च्या दिव्यासारखा चक्क उजेड पडतो. टिकाऊ असून खर्च कमी !! हा दिवा वापरण्यास मुळींच त्रास पडत नाहीं. नं० ४. ५, ११, १०० किंवा नंबर २३४ च्या प्रायमस स्टोव्हवर अथवा वरची वाटी ( बनेर ) बदलल्यास दुसऱ्या कोणच्याही स्टोव्हवर हा बसवितां येतो.

किंमत फक्त अडीच रुपये.

इतर जातीचे सर्व तऱ्हांचे प्रायमस स्टोव्ह व त्याचें सामान आमचेकडे असून, अगदीं माफक भावान पुरविलें जातें. दुरुस्तीचें काम वाखाणण्यासारखें क्याटलॉग फुकट.

बाहरगांवच्या मागण्याकडे ताबडतोब लक्ष दिलें जातें. एक वेळ अनुभव घेऊन पहा.

**पत्ता:— बी. एम्. माढीवाला,**

**भारत स्टोव्ह डेपो.**

**मालक व तयार करणार**

**मोहन बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.**

नो० नं० ४५४


## नोटीस

नोटीस बेशमी सेवंती भ्रतार भिकाजी पटवारी राहणार पेठ आहमदपूर तालुका मलकापूर जी० बुलडाणा यासी:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझी सखी वडील भावजई असून माझा भाऊ व तूं व मी येंकत्र राहत असून खाणेंपिणें येकत्र होतें अजमास ६ वर्षे झालें माझाभाऊ मरण पावला नंतर तूं व मी एकत्र राहिलो. ९ महिने झालें तूं माझे विरुद्ध चालत असून पेठचें घरांतून माझें दुसरें घर कबज्यांत असलेलें यांत जाऊन राहिली तूं व मी एकत्र असतां मी तुजपाशीं ठेवीत असलेला पैसा व डागीनें सर्व तूं मला न विचारतां बरोबर घेऊन गेली ते तुजपाशीं तसेच आहे ते मी तुजला मागितलें असतां तूं देत नसून तूं यातील पैसे खाण्याकरितां खर्च करित आहे असें कळविलें वडीलोपार्जीत जी शेती आहे त्याचें खातें ज्या शेताचें तुझें नावें मी करून देवीलें त्या शेताबद्दल तुला वाटतें का मी मालकीण आहे व माझें नांवें खा- आहे त्याचा तो मालक आहे ह्मणून तूं एक शेत मला न विचारतां पेरलें दुसरें तुझें नांवें शेत असलेलें मी पेरीत असतां तुला वाटलें कीं पेरु देऊं नये ह्मणून तूं आटकाविण्यास शेतांत आली मी तुझे न ऐकतां तें मी शेत पेरले माझे विरुद्ध तूं मनास वाटेल तसें तितें करून राहिली आहे ते मला समजून येत आहे. यांत कांहीं अर्थ नाहीं तूं कितीही भानगड करसील तरी माझी मालकी कमी होऊन तुझी मालकी होऊ शकत नाहीं. तुझा हक्क फक्त अन्नवस्त्राचा आहे. त्याला मी नाकबुल नाहीं. ईस्टेटीची मालकीन होण्याकरितां तूं जी खटपट करून राहिली आहे ती विणाकारण आहे. जमीनीबद्दल कोणाला भाडे पट्टा बटाईखत किंवा दुसरें कोणतेही प्रकारे लिहून देण्याचा तुझा हक्क नाहीं व जागेबद्दल ही हक्क नाहीं. अन्नवस्त्रा शिवाय तुझा कोणताही हक्क देण्याघेण्याचा नाहीं. कारितां या नोटिशीनें तुजला कळविलें असून सर्वत्र लोकांसही कळविण्यांत येते कीं वरील माझी भावजई ईनें खाण्यापिण्याचे निमीत्यानें कोणास कांहीं वरील माझे शेतें ३ व घरें दोन लिहून दिल्यास त्या पैस्याबद्दल जबाबदारी माझेवर नाहीं. कारितां या नोटिशीनें सर्वांस जाहिर केलें आहे.

सही

लक्ष्मण गणपतराव पटवारी रा० पेठ आहामदपूर ता० मलकापूर जि० बुळडाणा दस्तुर खुद

नो० नं. ४५५

## नोटीस

नोटीस बेशमी रोडु वल्द विठोबा गाडेकर रा० मौजे शेवग जहागीर प्र० व ता० मेहेकर जि० बुलडाणें

यांस:—

नोटीस देणार गीरजी मर्द रोडु गाडेकर रा० मौजे बाभुळखेड प्र० व ता० मेहेकर जि० बुलडाणें नोटीस देते कीं मी तुमची गंधर्वीची बायको असून गंधर्वास ५-६ वर्षे झाली तुमचे पाशीं नांदत असतां ३-४ वर्षें झालीं मजला मारहाण करून घरांतून हाकून दिलें तेव्हांपासून मी आपलें आईचे घरीं राहून लोकाचें कर्ज काढून उदरनिर्वाह करीत आहे तुह्मी दुसरी रांड ठेऊन तीचेशी संसार करीत आहा व तुह्मी जातीभ्रष्ट झाला आहात तुह्मी जातींत नाहीं. तुह्मी जातींत नसल्यानें माझा संसार होण्यास मार्ग नाहीं. कारितां या नोटीशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून १५ दिवसाचें आंत तुह्मी जातींत येऊन मजला झालेलें कर्ज देऊन घेऊन जावे मी नांदण्यास तयार आहे तसें तुह्मी वरील मुदतींत न केल्यास हीच फारकत समजून मी दुसरा घरठाव करीन मग तुमचा मजवर नवरेपणाचा कोणतेच प्रकारचा हक्क चालणार नाहीं. कारितां आगाऊ नोटिशीनें कळविले आहे. कळावे ता० २०-८-१२ इ.

सही

नी० गीरजी मर्द रोडु इची असें

नो० नं० ४५६

## नोटीस

नोटीस बेशमी मुलचंद दामोदर डांगरे मारवाडी रा. आडसुळ ता० खामगांव

यांस:—

खालीं सही करणार याजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, तुम्ही शीवराम वा केशव रा० वझेगांव तालका बाळापुर याजपासून रक्कम रुपये ७००चे गहाणखत लिहून नोंदुन घेतल्याचे माझे ऐकण्यांत आले आहे सदहू शीवराम हा आमचा बरेच दूरचा नातलग असून त्याचा माझ्याशी कोणतेही तऱ्हेचा संबंध नाहीं. त्याचें व माझें घराणें बरेंच वर्षांपासून विभक्त आहे. माझा बाप हरसींग यानें कमावलेली स्थावर इस्टेट त्याचे हयातीपर्यंत त्याचेच ताब्यांत होती त्याचे मरण्यानंतर माझे ताब्यांत अव्याहतपणें आहे ही गोष्ट तुह्मी जाणून असताही त्याचे पासून खोडसाळपणा करून दुष्टबुद्धीनें मजला बुडाविण्याचें हेतुनें तुह्मी माझे मालकीची स्थावर मिळकत गहाण लिहून घेतली त्याचेवर शीवरामचा हक्क संबंध नाहीं करितां नोटिशीनें कळवितो कीं गहाणखतात लिहून घेतलेली इस्टेट माझे मालकीची असल्यामुळें ती गहाणास जबाबदार नाहीं तुह्मी मात्र या नोटिशीनें व पुढें होणारे खर्चास पूर्णपणें जबाबदार आहात ता० २०-८-१२

सही

पंढरी वा हरसींग पाटील द० खु०

नो० नं० ४५७

## जाहिर नोटीस

नोटीस बेशमी, असहुजी वा जयरामजी जायभाई कोंडावार रा० वणी ता० वणी

यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी व आह्मी विभक्त झालो त्यावेळीं तुह्मी आह्मास पत्रें दिलीं आहेत. कीं प्रेसमध्यें तुमचें साहापैचें नांव तुमचें हिश्याचें मागाल त्या वेळेस शरीक करून देऊं व जिनमध्यें एक आण्याचा हिस्सा तुमचा आहे. त्याचेहीं नांव मागाल त्यावेळस करून देऊं याप्रमाणें तुह्मीं आह्मास पत्रें दिलीं आहेत. तेव्हां त्याचें उत्पन्नासह हिशेब व नांव करून द्यावें तुह्मास आजपर्यंत वेळोवेळीं मागणें केलें असतां करून देत नाहीं. सबब ही नोटीस पावल्य पासून १ महिन्यांत आमचा सर्व निकाल करून द्यावा तसें तुमचे कडून न झाल्यास रितीप्रमाणें दिवाणींत दावा करून घेऊं मग त्याचा खर्च तुह्मास द्यावा लागेल व पुढें कोणत्याच प्रकारची साडे ... ऐकली जाणार नाहीं शिवाय श्रीमंत रा० रा० माधवराव गंगाधर दामले वकील साहेब उमरावती याचा हिस्सा प्रेसमध्यें साहा आण्याचा पहिलें पासून आहे. परंतु त्याजपासून तुह्मी हल्लीं आपलें नावानें पत्र आणलें आहे कीं, प्रेसमध्यें रुपये ४८०० तुमचे जमा आहेत व तुमचा हिस्सा १ आण्याचा आहे असें ऐकतों सबब या नोटिशीनें असें कळविण्यांत येतें कीं, ही नोटीस पावल्य पासून ४ दिवसांत उत्तर द्यावें कीं, ह्या पत्राचें पूर्वी किंवा नंतर तुमचें जवळ दुसरे कांहीं पत्र दामले वकील उमरावती याचें किंवा जिन आणि प्रेस संबंधीं दुसरे हिस्सेदार याचें असल्यास तसें खुलासेवार कळवावें तसें कळविलें नाहीं. तर पुढें तुमचा कोणताच लेख कबूल केला जाणार नाहीं. नाहींतर ही नोटीस पावल्यानंतर तुह्मी सदरहू दामले वकील यासी व इतर हिस्सेदार जिन आणि प्रेसचे याशीं कोणत्याही प्रकारचा लेख किंवा पावती रसीद वगैरे करून दिल्यास आह्मास कबूल नाहीं व आज तारखेपासून प्रेस व जिन संबंधीं कोणतीही लेखी संमती आमचे तिघे मुखत्यार याचें दस्तुरीची आमची सही असल्याशिवाय आह्मी कबूल करणार नाहीं. व याचेपूर्वी. आह्मी तुह्मास कोणत्याही प्रकारची जिन, प्रेस संबंधीं तोंडी किंवा लेखी संमती दिली नाहीं करीतां ही नोटीस तुह्मांस देऊन आगाऊ कळविले आहे. अगर याचे विरुद्ध तुमचे कांहीं ह्मणणें असल्यास नोटीस पावल्या पासून ४ दिवसांत खुलासेवार उत्तर द्यावें नाहींपेक्षां पुढें तुमची कोणतीच सबब ऐकली जाणार नाहीं ही नोटीस दिली असे तारीख २१-८-१२ इसवी

सही

गंगया लछण्णा कोमटी कोंडावार रा० वणी याचे हातची नी॥ असे दस्तुर धोंडो सखाराम मु॥

नो० नं० ४५८

…कान्स्टेबल

यांस—

खाली … करणार इलाहीबकस खां

…दागर राहणार चिखली यांचेकडून नोटी-

…स देण्यांत येते कीं तुम्ही आमच्या

…खडी येथील मसजीदीच्या पाठी मागील

…रांत ता० २४ जानेवारी सन १९११

…वी पासून दरमहा !८ आठ रुपये प्रमाणें

…हात आहा सदर्हु घराचें भाड्यापैकीं

…आजपर्यंत आपण एक पैसुद्धां अदा केली

…हीं व सदर्हु घर आजपर्यंत मोकळे

…करून आमचे स्वाधीन केलें नाहीं तरी

…ही नोटीस पावल्यापासून भाड्याबद्दलची

…रकम रुपये १४७ अदाई करून घर पं-

…धरा दिवसाचे आंत मोकळे करावें. नहीं-

…तर मोठ्या दिलागिरीनें योग्य कोर्टांत दाद

…मागावी लागेल या नोटिशीचा खर्च आ-

…पणास द्यावा लागेल. कळावें ता० २२-

८-१२ इ.

सही

(उर्दूत) इला… सौदागर रा० चीखली

नो० नं० ४५९

## नोटीस

रा० रा० हरी देवाजी माळी रा०

जळगाव ता० मलकापूर जि बुलडाणा

यांस:—

खालीं सह्या करणार चिंधी मर्द रामु माळी रा. तालखेड ता० मलकापूर व पुंजी मर्द तुकाराम रा० बोराळ ता० जळगांव जि० बुलडाणा या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं आम्ही दोघी मिळून वि० सबजज्ज सा. बा. कोर्ट खामगांव यांचे फैलावरील दि. मु. नं. १४५ सन १९११ इ.चे मोकदम्यांत तुम्हास या एकाच कामा करितां आखेर पावेतो मुखत्यारपत्र लिहून तें नोंदूनही दिलें होतें. त्यावरून तुम्ही कांहीं दिवस आमचे तर्फे कामही केलें आतां तुमसी व आमशी बेबनाव झाल्या कारणानें तुम्ही आमचें काम करीत नाहीं. सबब या नोटिशीनें तुम्हास कळविते कीं तुम्ही आतां या मोकदम्या संबंधानें कोणते कोर्टांत आमचे काम करूं नये. केल्यास तें आम्ही कबुल करणार नाहीं व आम्ही तुम्हास दिलेलें मुखत्यार पत्र रद्द केलें आहे. कळावें ता० २३-८-१२ इ.

द विष्णु माधव फडके पी. रा. आकोला.

सह्या

पुंजी मर्द तुकाराम नी० खु०

चिंधी मर्द रामु नी० खुद्द

नो० नं० ४६०

## नोटीस

नोटीस बेशमी जानकाई मर्द हैबती रा० कान्हेरी ता० बाळापूर इस—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येते कीं, तुझा नवरा माझा सख्खा चुलता होता. तो आज ३-४ वर्षें झालें वारला आहे. त्याचे देखत सर्व शेतांची समाईक वांटणी होऊन आम्ही निराळे राहिलो होतो. आतां तो वारल्यामुळें त्याला वारीस पुत्र वगैरे कोणींच नाहीं. तर आतां त्या जिनगीचा वारीस मी आहे. तूं गंधर्वानें बसल्यामुळें तुझा कोणत्याच प्रकारें हक्क चालत नाहीं. व तूं राहशील किंवा दुसरा घरठाव करशील याचाही भरंवसा नाहीं तर तूं फक्त जोंपर्यंत आमचे घरीं आहेस तोंपर्यंत तूं फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहेस व तुला त्याबद्दल २ शेतें अन्नवस्त्राकारितां जोंपर्यंत आमचे घरीं आहे तोंपर्यंत त्याचा उपभोग घ्यावा. व बाकी राहिलेलें दोन शेतांतील हिस्से तूं दुसऱ्यास विकत असल्यामुळें मीच तीं ५०० रुपयास विकत घेतलीं व त्याजबद्दलचें खेरेदीखतही तूं करून दिलें आहेस. दुसरें तुला अन्नवस्त्राकारितां ठेवलेली दोन शेतांतील हिस्से तुला विकण्याचा अगर गहाण, खेरेदी, बक्षीस देण्याचा अधिकार नाहीं. आणि तुजजवळ वरील ५०० रुपये व तूं बैलं, जोडी, जवारी २ खड्या विकली, असें एकंदर २५० रुपये तुमचे व तुमचे सवतीचे डागीनें व वारलेल्या दोन मुलाचे डागीनें असें एकंदर ३०० रुपयाचे आहेत असें असतां तूं ह्मणतेस मला खाण्यास कांहीं नाहीं. करितां नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तूं जर कोणास, शेतांतील हिस्से, गहाण, खेरेदी व बक्षीस, व पट्यानें दिल्यास ते रद्द असें. याप्रमाणें न वागल्यास आम्ही कोर्टमार्फत तजवीज करून व शेतांतील हिस्से ताब्यांत घेऊन, तुला अन्नवस्त्र देत जाऊं. कळावें ता० २६-८-१२

सही

नारायण खंडु कुंभार कान्हेरी ता०

बाळापूर द० खु०

नो० नं० ४६१

## नोटीस

सारजाबाई जवजे महिमाजी जात कुणबी हल्लीं राहणार भरतपूर तालुके बाळापूर जिल्हा आकोला. नोटीस देण्यांत येते कीं मयत महिमाजी वल्द इंद्राजी यानीं मजला त्यांचे हयातींत दत्तक घेतले आहे. व ते मयत झाल्यापासून त्यांचे सर्व जिनगीचा मी मालक आहे. अलीकडेस तूं माझे बहिणीचे व मेहुण्यांचे सांगण्यावरून सर्व स्थावर जंगम जिनगीची गैर व्यवस्था करीत आहेस. तरी तूं कोणाकडून कर्ज काढूं नये. किंवा कुळाकडून कर्ज वसूल करूं नये. किंवा कर्जाचे वसूलाचे ऐवजीं तुझे नांवचे दुसरे दस्तऐवज करून घेऊं नये तसें केल्यास त्या कर्जाचा मी जबाबदार नाहीं. व असाम्याकडून कर्ज वसूल केल्यास ते मजला कबूल नाहीं. कारण तूं हल्लीं माझी पालनकर्त्या आईप्रमाणें वागत नाहीस आकोला ता० २७-८-१२ इ.

सही

शामराव वा महिमाजी अ. पा. क.

रणधीर वा योगाजी जात

कुणबी याची नि० असे

नो० नं० ४६२

## नोटीस

नोटीस बेशमी नारायण वा खंडु कुंभार व गैराम वा खंडु कुंभार राहणार कान्हेरी गवळ्याची तालुके बाळापूर

यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं, गेल्या चैत्र महिन्यांत ह्मणजे मांडोस झाल्यानंतर तुम्ही मला सांगितले कीं माझ्या शेताची खातीं बदलून देतो. त्यासाठीं बाळापूर येथें जावें लागते. व तेथें गेल्यावर तहशीलदार साहेबासमोर ५०० रुपये भरणा कबूल करून कागदावर आंगठा दिलास ह्मणजे खातीं माझ्या नावांनीं होतील असें तुम्ही मला सांगितले त्यावरून मी तुमच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन तुमचे बरोबर बाळापूर येथें गेले. व तहशीलदारा समोर कागदावर आंगठा व ५०० रुपये पावल्याचे सांगितलें व नंतर कान्हेरी येथें परत आलें तेव्हां तुम्ही सांगितलें कीं आतां खात्या बदल हुकूम लवकर येईल त्यानंतर मी लागलीच आपल्या मुलीच्या बाळंतपणासाठीं वरवटबकाल येथें गेले तेथून पुन्हा कान्हेरी येथे परत येण्यास १५ दिवस झाले. कान्हेरी येथें आल्यावर मला गांवातील लोक ह्मणूं लागले कीं तुझ्या ४ शेतांपैकीं २ शेतें तूं विकलीस काय! तेव्हां मी ह्मणाले कीं मला शेतें विकण्याची गरज काय तेव्हां लोक ह्मणाले तूं बाळापूरास चैत्रांत गेली होतीस तेव्हां तूं कागद खेरेदीचा केलास तेव्हां मी त्यांस सांगितले कीं मी शेतें विकण्यासाठीं गेलें नसून मला शेताच्या खात्यासाठीं तहशीलदाराकडे जावें लागते असें नारायण व गैराम यानी मला सांगित्यावरून मी गेले होतें. तेव्हां पुन्हां लोक ह्मणाले कीं तुला त्यानीं खोटे सांगून फसवून व खेरेदी करून घेतली असेल तर तूं तपास कर व नक्कल घे. त्यावरून माझा जावई भवानी वा। इश्राम यानीं रजिस्टर कचेरींत तपास लाऊन नक्कल काढली. ती ता० २३ इसवीची खेरेदी २ शेतें तुम्ही आपल्या नावानीं करून घेतली आहे ते मी बायको मनुष्य तुमच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन फसले आहे मला तुम्ही ज्या कामाकारितां नेले ती सर्व लबाडी असून मला फसवून २ शेतांचे ५०० रुपयाचे खेरेदीखत तुम्ही केलें आहे ही तुमची पूर्ण लबाडी व फसवेगीरी आहे तेव्हां तुम्ही मला फसवून केलेलें खेरेदिखत खोटें असून मला भरण्यापैकीं १ एक पैसाही पावलेला नाहीं. माझे नवऱ्याचे ह्मणजे हैबतींचे हिश्यास आलेल्या ४ शेतांची मी पूर्ण मालक आहे व त्यांचा उपयोग मी घेईन. तुम्ही खेरेदीखतांत लिहिलेली शेतें ५ वर्षासाठीं पूर्वींच मी लाऊन काढली आहेत तरी ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत मला फसवून लबाडीनें तुम्ही करून घेतलेली खोटी खेरेदी मला परत द्यावी तसें न केल्यास तुमच्यावर कायद्याप्रमाणें वरील कृत्याबद्दल फौजदारी व दिवाणी काम चालविले जाईल. कळावें, तारीख २२-८-१२ इ,

सही

जानकाई मर्द हैबती कुंभार रा०

कान्हेरी गवळ्याची नि०

नो० नं० ४६३ खुद्द बांगडी असें

## जाहिर नोटीस

रा० असरुजी वा जयरामजी जायभाय बंजारी रा० हानवतखेड प्र० सिंदखेड ता० मेहकर पोष्ट देउळगांवराजा यांस—

मी खालीं सही करणार कळवितो कीं, तुमची बहीण नामें वनी इच्यासी तुम्ही माझे गंधर्व लाऊन दिलें आणि एक रुपयाचे कागदावर मजकडून लेख लिहून घेतला कीं, "मला लग्नाची बायको आहे तर तिला आणि इला एकत्र नांदवितांना तिचे चाहाडी चुघलीवरून इला विनाकारण गांजणार नाहीं." त्यांतील मजकूर आतां मात्र असे एकतो कीं, वर लिहिलेला स्टांप लिहून तुम्ही दिला त्यावेळीं तुम्हास लिहिता वाचता येत नव्हतें आणि लिहून घेणार व लिहिणार व दुसरे साक्षदार हे एका विचाराचे असल्यामुळें तुम्हास तोंडी मजकुर वर लिहिले प्रमाणें सांगून स्टांपावर असे लिहिले कीं, लग्नाची बायको जर मी सोडून दिली नाहीं तर ह्या गंधर्वाचे बायकोची हीच फारकती समजून तुम्ही इला दुसरा नवरा करून द्यावा माझा कांहीं हक्क चालणार नाहीं. असे हल्लीं माझे ऐकण्यांत आल्यावरून मी तो लेख पाहण्यास मागितला असतां तुम्ही तो दाखवीत नाहींत वरून सुभा झाला कीं आपण ऐकतों तें खरें आहे. ह्मणून ह्या नोटिशीनें कळवितो कीं, वरील कौंसातील मजकूर स्टांपावर लिहिल्याचे मला लटके वाचून दाखवून भलतेच मजकूरावर दगाबाजीनें तुम्ही माझी सही घेतली आहे ह्मणून त्या आधारें मी दोन्ही बायका नांदविण्याबद्दल सरकारचा अथवा जात, पंच, नगाध आणि नाईक वगैरे कोणाचा, हा गुन्हेगार ठरणार नाहीं. तुम्ही मात्र ठराल तरी ही नोटीस तुम्हास पावल्यापासून चार दिवसाचे आंत वरील स्टांप आम्हास परत द्यावा आणि वाटल्यास त्या ऐवजी वर लिहिलं कौंसातील मजकूराचा दुसरा स्टांप मजकडून लिहून घ्यावा आणि ह्या नोटीशीचा खर्च नगदीरोख मला आणून द्यावा आणि हा स्टांप खोटे मजकुराचा आम्हास परत पावल्याची आणि नोटिशीचे खर्चाबद्दल सर्व खर्च पावल्याची पावती आमचे कडून घ्यावी. या मुदतींत तुम्ही तसे न केल्यास दगाबाजी बद्दल आणि खोटे मजकुराचा स्टांप परत मिळण्याबद्दल ज्या त्या योग्य कोर्टांत दाद मागून बंदोबस्त केला जाईल. आणि कोर्टखर्च व नोटिशीचा खर्च हे सर्व तुमचे पासून कोर्ट मार्फत वसूल केला जाईल. कळावें. ता० २४-८-१२ ई०

दस्तुर लक्ष्मी नारायण रघुनाथ

मा० ब्रा० अंजनीखुर्द द. खुद

सही

निवृत्ती वा। धोंडजी घुगे बंजारी

रा० पिंपळखुट प्र०

सिंदखेड ता० मेहेकर पोष्ट

देउळगांवराजा जी० बुलडाण

याचे खुद हातचीं नि-

रेघ केली असे.

नो० नं० ४६४

वऱ्हाडसमाचार.

श्रावण वद्य ६ शके १८३४ परिधावी

## पतितोद्धाराची चुकलेली दिशा.

हिंदुसमाजानें निकृष्ट गणिलेल्या महार-मांगादि जातींना शिक्षणामृत पाजून त्यांचा उद्धार करण्यासाठीं मोठमोठ्या शहरांतून त्यांच्या शिक्षणाच्या शाळा वगैरे काढण्याचे यत्न चालले आहेत. सरकारही त्यांच्या-साठीं निराळ्या स्कॉलर्शिपा ठेवून त्या प्रयत्नांस साह्य करीत आहे, आणि महार जातीचे लोक शिक्षणाचा लाभ अधिक प्रमाणावर घेऊं लागले आहेत ही संतोषाची गोष्ट आहे. अशावेळीं मुंबई शहरांत महारांसाठीं एक स्वतंत्र देवालय बांधून देण्याची कल्पना उदय पावली आहे ही गोष्ट प्रस्तुतकालाचें एक चिन्ह ह्मणून लक्षांत घेण्यासारखी आहे. महारांचा हिंदु-जातींत समावेश होत असतांही त्या समाजानें आजपर्यंत त्यांना सर्व हिंदूजातींच्या-साठीं बांधलेल्या देवालयांत देवदर्शनासाठीं येण्याचा मज्जाव केला हा अन्याय त्यांच्या-साठीं त्या समाजानें स्वतःच्या खर्चानें स्वतंत्र देवालय बांधून दिल्यानें अंशतः दूर होईल अशी कित्येकांची कल्पना आहे पण ती चुकीची आहे. महार लोक स्वभावतः धार्मिकवृत्तीचे असून त्यांच्यांत चोखामेळ्यासारखे महान भगवद्भक्त होऊन गेले आहेत. अशा जातीची सध्याची गरज स्वतंत्र देवालय त्यांच्यासाठीं बांधून दिल्यानें दूर होऊन त्या लोकांमधला भगवद्भक्तीचा अंकुर नष्ट होणार नाहीं. पण त्या लोकांना अशा रीतीनें आपल्या पासून दूर ठेवल्या पासून त्या जातीचा उद्धार तर राहोच, पण तिच्याविषयीं हिंदुसमाजाच्या हातून घडत आलेल्या अन्यायाचें परिमार्जन हिंदुसमाजानें केलें असें खरोखर ह्मणतां येईल काय ? असा प्रश्न विचारी लोकांच्या मनांत उद्भवल्यावांचून राहणार नाहीं. हल्लीं आपण पाहतों कीं पुण्याच्या पर्वतीसारख्या देवालयांत देवालयाच्या अंतर्भागाच्या उंबरठ्यापर्यंत युरोपियन लोक व मडमा आपल्या पादत्राणासह खुशाल जाऊं लागले आहेत. इतकेंच नाहीं तर दरिद्री पण भाविक हिंदूंना ज्या मूर्तीचें दर्शन सुद्धा घडत नाहीं त्या मूर्ति द्रव्याच्या साह्यानें युरोपियन लोकांना दर्शन देण्यासाठीं उंबरठ्यापर्यंत धाव घेत असतात. अशी स्थिति जो समाज उघड्या डोळ्यानें पाहत आहे त्याच समाजानें महारासारख्या जातीला-ह्मणजे स्वतःच्याच एका अवयवाला—कायमचा दूर ठेवण्याचा यत्न करावा हें सध्याच्या काळाला योग्य दिसतें काय ? महारांसाठीं स्वतंत्र देवालय बांधून देण्याची कल्पना ज्याचे डोक्यांत प्रथम आली त्यानें या दृष्टीनें कधीं विचारच केलेला नसावा असें दिसतें. महारांसाठीं स्वतंत्र देवालय कां असावें? त्यांना दर्शनापुरतें तुमच्या देवालयांत येऊं दिल्यानें तुमचें काय बिघडणार आहे? जुन्या भाविक लोकांच्या समजुतीला धक्का बसूं नये येवढ्यासाठीं फार तर त्यांचा स्पर्श कशाला न होईल अशी खबरदारी घेतली ह्मणजे पुरे आहे. पण निराळें देवालय बांधून हिंदुसमाजापासून त्यांची कायमची ताटातूट करण्याचा यत्न कां करता? आह्मी युरोपियनां सारख्या अगदीं भिन्न धर्मीयांना सुद्धां जेथपर्यंत जाऊं देतों तेथपर्यंत तरी आमच्या स्वतःच्या धर्मबंधूंना नेण्याची आमची तयारी नसावी ही गोष्ट शोचनीय नव्हे काय? आणि या स्वतंत्र देवालय बांधून देण्याचे खटपटींत सर भालचंद्रासारखे विद्वान, सुशिक्षित आणि सार्वजनिक चळवळींत नेहमीं लक्ष घालणाऱ्या पुढाऱ्यांचें अंग असावें हें अंमळ विचित्र आहे. वास्तविक महार लोकांसाठीं देवदर्शनाची स्वतंत्र वेळ नेमून देऊन त्यावेळीं त्यांना देवालयाच्या गाभाऱ्यापर्यंत जाण्याची मुभा हिंदुसमाजानें द्या वयास पाहिजे होती. पण तसें कांहीं न करतां त्यांच्यासाठीं स्वतंत्र देवालय बांधून देणें ह्मणजे रूढीनें आजपर्यंत घातलेला सावळागोंधळ ज्ञानप्रकाशाच्या सध्याच्या युगांत कायम करून टाकण्याच्या प्रयत्नासारखा सर्वथा निंद्य आहे असें एका दृष्टीनें ह्मणणें भाग आहे.

## स्त्रियांसाठीं वैद्यकीय कॉलेज.

महाराणी मेरी या गतवर्षीं दिल्ली दरबारासाठीं आल्या होत्या त्यावेळीं कोटाच्या महाराजानीं त्यांच्या भेटीच्या संस्मरणार्थ एक लक्ष रुपये कांहीं उपयुक्त कामाकडे लावण्याचा संकल्प केला होता. सदर रकम हा अल्पारंभ समजून व अधिक रकमा मिळवून दिल्ली येथें स्त्रियांसाठीं वैद्यकीचें एक कॉलेज काढावें असा विचार लेडी हार्डिंज यानीं मनांत आणिला व त्या प्रीत्यर्थ इतर संस्थानिकांकडून कांहीं रकमा मिळाल्याचेंही प्रसिद्ध झालें आहे. दिवसेंदिवस वैद्यकी कॉलेजांत शिकण्यास जाणाऱ्या विद्यार्थीनींची संख्या वाढत्या प्रमाणावर आहे व स्त्री वैद्याची तर सध्याच्या काळीं मोठी जरूरी आहे. अशा वेळीं विलायतेंतल्या वैद्यकी जाणणाऱ्या स्त्रिया सामान्य लठ्ठ पगारावर इकडे आणण्याच्या सरकारच्या उद्योगापेक्षां इकडच्या इकडे स्त्रियांसाठीं वैद्यकीचें कॉलेज उघडून स्त्री वैद्यकीणी तयार करणें हा प्रयत्न अधिक प्रशंसनीय आहे यांत शंका नाहीं. एखाद्या अधिकाऱ्यानें एखादी नवी उपयुक्त संस्था उभारण्याचें मनावर घेईपर्यंत त्या संस्थेची उपयुक्तता आमच्यांतल्या संपन्न लोकांना दिसत नाहीं व तिची उणीव भासत नाहींशी झाली आहे. अशा स्थितींत लेडी हार्डिंग सारख्या उच्च पदस्थ स्त्रीनें ही चळवळ हातीं घेतली असल्यामुळें अल्पकालांत ती फलद्रूप होईल अशी उमेद बाळगण्यास हरकत नाहीं.

## सरकारजमा पुस्तकें.

गेल्या दोन वर्षांत देशी भाषांतल्या पुस्तकांची सरकारी अधिकाऱ्यांच्या सोवळ्या चाळणीनें झडती चालली आहे व आक्षेपार्ह पुस्तकें भराभर सरकारजमा होत आहेत. सरकारच्या या उद्योगाला नांवें ठेवण्याचा आमचा बिलकुल उद्देश नाहीं. कारण कीं सुविचारांच्या प्रसारासाठीं साधन ह्मणून निर्माण होणाऱ्या वाङ्मयानें राजद्रोह, जातींजातींत वैमनस्य वगैरे अनिष्ट प्रकार वाढविण्याचें साधन होऊन बसावें हें कोणत्याही दृष्टीनें इष्ट नसून उलट घातुक आहे. अशा रीतीनें वाङ्मयाचा दुरुपयोग होत असेल तर त्याचा प्रतिकार करणें अवश्य आहे. पण असा प्रतिकार करणें तो वाईट भागापुरता मात्र असावा. वाईटा बरोबर चांगलेंही नष्ट न व्हावें अशी कोणाचीही इच्छा असणें स्वाभाविक आहे. औषधोपचार किंवा शस्त्रप्रयोग करणें तो शरीराचा जो भाग रोगानें दूषित झाला असेल तेवढ्या पुरता असावा. त्याच्या योगानें सगळें शरीर निरुपयोगी होईल असें करूं नये. पण आक्षेपार्ह पुस्तकें सरकारजमा करण्यासंबंधानें जी चळवळ चालली आहे तिचा परिणाम केव्हां केव्हां असा घातुक होत आहे. समजा चारशें पृष्ठांचें सुंदर विचारांनीं किंवा माहितीनें भरलेलें उत्तम परिश्रमपूर्वक लिहीलेलें पुस्तक आहे. पण दोनचार ओळी आक्षेपार्ह आहेत. असें पुस्तक त्या दोनचार ओळींकरितां वाङ्मयांतून अजीबाद नष्ट करून टाकावें कीं आक्षेपार्ह ओळी काढून टाकण्याविषयीं प्रकाशकास सूचना व सधीं द्यावी ? कोणता मार्ग समाजास हितकारक होईल ? सध्याचे काळीं उत्तम ग्रंथकारांची मोठी वाण आहे. ग्रंथलेखन हा द्रव्यार्जनाचा धंदा ह्मणून चालण्यासारखी स्थिति नाहीं व लोकांत लेखनाची अभिरुची व धमक ही अद्याप तितकी आली नाहीं. अशावेळीं येवढ्याशा आक्षेपार्ह भागासाठीं संबंध पुस्तकचें पुस्तक नष्ट करून टाकण्यापेक्षां आह्मीं वर सुचविलें आहे त्याप्रमाणें तो आक्षेपार्ह भाग अजीबात गाळून नवी आवृत्ति काढण्याची संधी प्रकाशकास दिल्यास सरकारचा उद्देश सिद्ध होऊन वाङ्मयाचीही हानि होणार नाहीं. यंदाच्या साहित्यसंमेलनानें या विषयाचा पूर्ण विचार करून इष्ट सुधारणा घडवून आणण्याचें श्रेय घ्यावें अशी आमची सूचना आहे.

## आतां पुढें काय?

हिंदु व मुसलमान युनिव्हर्सिटीच्या मूळ हेतूवरच कुठार प्रहार करणाऱ्या विलक्षण अटी सरकारनें घातल्या असल्यामुळें सरकारनें माघार घेतल्या शिवाय त्या संस्था आतां अस्तित्वात येणें शक्य नाहीं. या युनिव्हर्सिट्यांची मर्यादा बनारस व अलिगड पुरतीच असावी, त्यांनीं स्वतःला हिंदु किंवा मुसलमान युनिव्हर्सिटी न ह्मणवितां नुसतीं बनारस व अलिगड युनिव्हर्सिटी अशीं नांवें धारण करावीं. प्रोफेसराच्या नेमणुका करण्यापलिकडे त्या संस्थांच्या चान्सेलरचे हातीं कांहीं अधिकार नसावा इ० इ० अटी कोणाही स्वाभिमानी किंवा विशिष्ट कार्याच्या उद्देशानें पाहणाऱ्या कोणाही संस्थेस कधीं मान्य होणाऱ्या नाहींत व मुसलमान युनिव्हर्सिटीच्या चालकांनीं आपली त्या संबंधाची नापसंती तत्काळ सरकारला कळविली यांत आह्मांस कांहींच आश्चर्य वाटत नाहीं. सरकारनें या प्रश्नाबद्दलचा आपला हा 'अखेरचा निकाल' आहे असें ह्मटलें आहे तेव्हां ते आतां माघार घेतील हाही संभव राहिला नाहीं. अशा स्थितींत 'आतां पुढें काय?' हा प्रश्न उभा राहतो. हिंदु व मुसलमान युनिव्हर्सिट्यांचे फंड मोठाले आहेत. या फंडाच्या पैशानें दुसरें कांहीं असेंच मोठें देशकार्य घडवून आणण्याकडे सदर पैशाचा व्यय उत्तम प्रकारें करतां येईल असें आह्मांस वाटतें. टाटा रिसर्च इन्स्टिट्यूटला हा फंड देऊन त्याची उपयुक्तता वाढवितां येईल. किंवा सध्यांच्या शिक्षण संस्थांतून शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सोयींकरतां पैसे लावतां येतील. किंवा शास्त्रीय विषयावरील उत्तमोत्तम जर्मन, फ्रेंच, इंग्रजी ग्रंथांचीं हिंदुस्थानांत व इतर देशी भाषांतून भाषांतरें करवून त्यांच्या द्वारें शास्त्रीय शिक्षणाचा प्रसार करतां येईल. अगर एक हिंदू करितां व एक मुसलमानां करितां अशीं दोन नंगी धंदे शिक्षणाचीं विद्यालयें काढून हजारों विद्यार्थ्यांना पोटापाण्याच्या उद्योगाला लावण्याचें श्रेय संपादतां येईल. सरकारच्या या वर्तनामुळें हिंदु व मुसलमान या दोन्ही जातींत समदुःखीता उत्पन्न केली आहे. तेव्हां दोन्ही जातींच्या प्रमुखांनीं एकत्र जमून एका विचारानें आलेल्या अडचणींतून निघण्याचा मार्ग शोधावा अशी आमची त्यांस सूचना आहे.

## आयरिश होमरूल.

विलायतेंतल्या आयरिश होमरूलाच्या वादाला बराच रंग चढला आहे. होमरूलाच्या विरुद्ध असलेला युनिअनिस्ट पक्ष व अल्स्टर परगण्यांतले लोक नुसत्या शाब्दिक वादानें तृप्त न होऊन देशांत अशांति व वेळ पडल्यास बंड उपस्थित करण्यासही मागें सरणार नाहींत असे त्यांच्या धमक्या वगैरेच्या भाषणांवरून उघड दिसूं लागलें आहे. सत्तारूढ पक्षातर्फे मि० चर्चिल यांनींही स्पष्टपणें सांगितलें कीं अशा भलताच मार्ग विरुद्धपक्ष स्वीकारील तर त्याचेवर राजद्रोहाचे खटले करण्यास प्रधानपक्ष कमी करणार नाहीं हें त्यांनीं ध्यानांत ठेवावें. आतां या दोहोंत कोणता पक्ष माघार घेतो तें पाहणें आहे. ब्रिटिश साम्राज्याचे आधारस्तंभ असे मुत्सद्दी यःकश्चित् कारणांवरून कसा बखेडा माजवितात व भाषणें करतांना किती अमर्याद वाहवतात हें यावरून चांगलें दिसतें. लिबरल पक्ष दुर्बळ होत चालला आहे, लवकरच त्याला राजीनामा द्यावा लागेल व युनिअनिस्ट पक्ष अधीकारारूढ होईल अशाही बातम्या आहेत. त्यांत जरी कांहीं तथ्यांश असला तरी होमरूला संबंधाच्या या तीव्र संग्रामांत त्यामुळें कांहीं फेरबदल होईलसें दिसत नाहीं. सध्याच्या वाग्युद्धावरून हिंदुस्थानाला दुसराही एक धडा घेण्यासारखा आहे. तो वाकूस्वातंत्र्याच्या मर्यादे संबंधाचा होय. वि-

इ० ५

अत्यंत वाचनीय व मनन आहे.
राज वंशपरंपरेनें जहागिरी दे-
होते; पण पुढें पेशव्यांनीं

[illegible] भाषण करतांना ज्या [illegible] शकतात त्याच्या पुष्कळ [illegible] मुद्दां हिंदुस्थानच्या लोकांना जातां [illegible] नाहीं व त्यांनीं नजाणें हें इष्टही आहे मोर [illegible]चला ह्मणून लांडोरानें नाचणें ही व्यवहाराचे दृष्टीनें मोठी चूक आहे हें सदोदित ध्यानांत वागविलें पाहिजे.

---

## दार खुलें आहे, पण—

नुकत्याच नेमलेल्या पब्लिक सर्व्हिस कमिशनपुढें हिंदुस्थानच्या लोकांना सरकारी नोकरींतल्या वरिष्ठ प्रतीच्या जागा देण्याबद्दलचा एक प्रश्न आहे. अशावेळीं मार्च १९११ मध्यें वरिष्ठ कायदे कौंसिलांत ना० मि० सुबाराव यांच्या प्रश्नास ना० सर रिचर्डेल अर्ल यांनीं दिलेल्या उत्तरांतल्या एका वाक्याचें स्मरण करून देणें इष्ट वाटतें. ना० सर रि० अर्ल ह्मणाले कीं हिंदी लो[illegible] सरकारी नोकरांतल्या हवी ती जागा दे[illegible]स कोणताच प्रत्यवाय नाहीं, पण त्या [illegible]मास त्यांची लायकी तेवढी पाहिजे. यांतला 'पण' ही मुत्सद्दीपणाची मोठी मेखच आहे. हिंदी गृहस्थाची लायकी मोठ्या दर्जाच्या जागा त्यांना देण्याच्या आड येते त्याला आह्मी काय करावें असा अर्थ त्या वाक्यांत ध्वनित आहे. तुह्मांला पोहतां येतें अशी प्रत्यक्ष खात्री करून दिल्याशिवाय तुह्मांला पाण्यांत पाय घालूं देणार नाहीं असें ह्मणण्यासारखेंच हें आहे. हिंदी गृहस्थ वरच्या दर्जावर नेमिला, पण नालायक ठरला अशीं किती उदाहरणें दाखवितां येतील? र[illegible]चंद्र दत्त, मि. सिंह, सर के. जी. गुप्त, किंवा हायकोर्ट जजाचे अधिकारावर आजपर्यंत नेमिलेले अनेक हिंदी गृहस्थ यांच्या लायकी संबंधानें सरकारला अद्याप शंका आहे काय? असेच दुसरेही कित्येक दत्त गुप्त नसतील कशावरून? सरकारांत रत्नपारखी इतके दुर्मिळ कधींपासून झाले?

---

## पाश्चात्यांची अहंमन्यता.

पाश्चात्य राष्ट्रांची अहंमन्यता विलक्षण, खरी! जपानी लोकांची उत्कृष्ट राज्यपद्धति स्वदेशाभिमान, स्वार्थत्याग, इ. गुणांचे पोवाडे तीं गातील. पण पुनः प्राच्य लोकांना प्रजातंत्र राज्य पद्धतीनें राज्य करतां येत नाहीं किंवा ते लोक गुणामध्यें पाश्चात्य लोकांहून कमी दर्जाचे हें ह्मणण्यास पुनः तीं तयारच! रशियांत किती अत्याचार घडत असतील तें परमेश्वर जाणें. पण रशियाच्या विरुद्ध ब्र काढण्याची त्यांची छाती नाहीं. मजुरांच्या संपाचेवेळीं खुद्द इंग्लंडची काय स्थिति झाली होती! खुद्द पार्लमेंटमध्यें किती वेळां हास्यास्पद प्रकार घडले आहेत! पण सुरतेच्या कांग्रेसला हंसावयाला इंग्रजलोक तयारच! हांगाऊ येथें दोन सेनापतींना फांशीची शिक्षा झाली व चिनी प्रजासत्ताक राज्याला नांवें ठेवण्याला इंग्रज पत्रकर्त्यांना आयती संधी मिळाली. बस. मग काय? इंग्रज लेखकांचे पेन लागलें चुरचुर चालायला! पण त्यांच्यांतलेच डा० मॉरिसन खुद्द चीनच्या राज्यकारभारांत पडले आहेत. ते काय ह्मणतात पहा. ते ह्मणतात कीं चिनी लोक जुन्या पद्धतीनें राज्यकारभार करीत होते तोंपर्यंत त्यांची उन्नति होत राहिली. युआनशिकाई व सुन्यतसेन यांच्यांत बेबनाव झाला अशी खोटीच बातमी देऊन इंग्रजपत्रें टिऱ्या बडवूं लागले आहेत. पण तें सारें खोटें आहे. चिनी मुत्सद्दी फार हुशार आणि दक्ष आहेत. पण चिनी लोक प्राच्य पडले. तेव्हां त्यांच्या अंगीं सद्गुण कोठलेही इंग्रजांची समजूत कांहीं केल्या नष्ट व्हावयाची नाहीं.

---

## मुसलमान युनिव्हर्सिटी

सरकारनें हिंदूंचें पाणी ओळखलें आहे. पण मुसलमानांचा सरकारच्या कृत्याला विरोध घडल्याचें पहिलेंच उदाहरण ह्मणजे त्यांच्या मुसलमान युनिव्हर्सिटीच्या स्थापनेंत सरकारनें नुकताच जो खो घातला त्याला त्या लोकांनीं दिलेला जबाब हें होय. मुसलमानी पत्रांवरून तर त्या जातीनें चांगलाच नेट धरल्याचें दिसून येत आहे. कलकत्याचें 'कामरेड' नांवाचें मुसलमानपत्र ह्मणतें कीं सरकारला पक्कें ठाऊक आहे कीं मुसलमान युनिव्हर्सिटी कमिटीला एकच आज्ञा पाळणें ठाऊक आहे आणि ती आज्ञा ह्मणजे मुसलमान समाजाची. एम्पायर पत्रानें असें प्रसिद्ध केलें आहे कीं लवकरच त्या जातीच्या पुढाऱ्यांची एक जंगी सभा भरून तींत सरकारच्या पत्राचा प्रतिवाद करण्याचें व युनिव्हर्सिटीचे संबंधांत सरकारनें दिलेल्या निकाला विरुद्ध विलायतेंत चळवळ करण्यासाठीं इकडून एक डेप्युटेशन पाठविण्याचें ठरणार आहे. थोड्या दिवसांपूर्वीं मुसलमानांच्या संबंधानें एक भ्रामकविधान स्टेटसेक्रेटरी साहेबांनीं करतांच त्यांच्यावर सर्व मुसलमान तुटून पडले व त्यांना तें विधान परत घ्यावयाला लाविलें. आतांच्या वादांतही तेच सरशी करतील असें त्यांच्या उत्साहावरून दिसतें. मुसलमान युनिव्हर्सिटीच्या आड जाण्याचें सरकारनें धाडस केल्याचें आंग्लो-इंडियन पत्रांना सुद्धां नवल वाटत आहे. या बाबतींत सरकारनें चूक केली आहे असें स्टेटस्मन् पत्र ह्मणतें. हल्लींच्या वारांत आमच्या मुसलमान बंधूंना यश मिळावें अशी आमचीही इच्छा आहे.

---

## देवी टोंचण्याला विरोध.

मद्रासचें 'इस्ट कोस्ट स्पेक्टेटर' पत्र ह्मणतें कीं नांबुद्री लोकांची पक्की समजूत ही आहे कीं देवीची लस टोंचण्यानें त्यांच्या रक्तांतलें आर्यत्व नष्ट होईल, आणि ह्मणून ती निषिद्ध लस अंगांत घालून घेण्याचे विरुद्ध त्यांची खटपट चालली आहे. खुद्द इंग्लंडात चांगले चांगले शास्त्रज्ञ देवी टोचण्यांचे विरुद्ध असतां नांबुद्री लोकांनीं देवीच्या लसीला निषिद्ध मानलें तर त्याबद्दल त्यांना कोणी दोष देणार नाहीं. आतां मद्रासचे भावी गव्हर्नर लॉर्ड पेंटलांड हे स्वतःच देवी टोंचण्याचें विरुद्ध आहेत हें ऐकून नांबुद्री लोकांस खात्रीनें संतोष वाटेल. लॉर्ड पेंटलांड यांनीं आपल्या दोन्ही मुलांना देवी टोचलेल्या नाहींत. पण मुलाला देवी टोचण्याचे संबंधांत मद्रास इलाख्यांतले नियम बरेच कडक आहेत ह्मणतात. हें खरें असल्यास त्या नियमांचा कडकपणा नव्या गव्हर्नर साहेबांच्या कारकीर्दीत कसा काय टिकतो तें पाहण्यास मिळेल.

---

## साहित्यपरिषद

खुद्द महाराष्ट्रांत साहित्याच्या उन्नतीसंबंधानें लोकांमध्यें अनास्था किंवा औदासीन्य दिसून येत आहे असें विधान आह्मीं गेल्या अंकांत केलें होतें त्याला पुष्टी देणारें भरपूर प्रमाण खुद्द साहित्यपरिषदेचे सेक्रेटरी रा० आपटे यांचे जुलैच्या 'विविधज्ञानविस्तारा'चे अंकांत प्रसिद्ध झालेल्या व्याख्यानांत आहे. रा० आपटे ह्मणतात-'आमच्या महाराष्ट्रसाहित्यपरिषदेवर आळसाचा, कर्तृत्वशून्यतेचा व दुसरे कित्येक आरोप करणारे टीकाकार शेकडों निघाले, पण आमच्या अडचणी काय आहेत, व महाराष्ट्रसाहित्याची उन्नति तिच्या हातून व्हावी तशी झपाट्यानें कां होत नाहीं हें समजून घेण्याची खटपट एका तरी टीकाकारानें कधी केली काय?' टीका करण्याचें काम सोपें आहे. तें कोणीही करावें. पण प्रत्यक्ष एखाद्या संस्थेचें सुकाणूं हातीं घेऊन काम करून दाखविण्याची पाळी आली कीं सगळे माघार घेतात. महाराष्ट्र साहित्यपरिषदेनें तयार केलेली परिभाषा तपासण्यासाठीं कित्येक विद्वानांकडे पाठविली. त्यांनीं ती तपासण्याचे कामाला हात लावण्यास दोन दोन वर्षें फुरसतच मिळाली नाहीं! साहित्यपरिषदेनें कोणतीं कामें हातीं घ्यावीं या विषयीं सूचना मागविल्या. पण शंभर पत्रांपैकीं पांचचार जणांचींच काय तीं उत्तरें आलीं. आणि त्यांत ही व्यावहारिक सूचना एकानेंही केलेली नाहीं! साहित्याची उन्नति झाली पाहिजे अशी खरी जाणीव अद्याप आमच्या लोकांत उत्पन्न झाली नाहीं याला आणखी पुरावा काय पाहिजे? आह्मी लोक राजकीय हक्क मागण्यांत तेवढे पुढें आहों, पण आमच्या स्वतःच्या स्वाधीन असलेल्या किती गोष्टींत आह्मी मन घालून खऱ्या कळकळीनें कामें केलीं आहेत हें पाहिलें ह्मणजे मन उदास होतें. यंदाच्या साहित्यसंमेलनानें ही जाणीव लोकांत उत्पन्न केली व साहित्यपरिषदेला भक्कम पायावर उभी करण्याचें श्रेय घेतलें तर मोठेंच कार्य केलें असें होईल.

---

## पेशव्यांची सरंजामी पद्धति

विविधज्ञानविस्ताराच्या जुलैच्या अंकांत प्रो० हरि गोविंद लिमये यांचा मराठ्यांच्या साम्राज्य संबंधाचा एक निबंध प्रसिद्ध झाला आहे. तो अत्यंत वाचनीय व मनन आहे. शिवाजी महाराज वंशपरंपरेनें जहागिरी देण्याचे विरुद्ध होते; पण पुढें पेशव्यांनीं ती पद्धत सोडून सरंजामी सरदार निर्माण केले व त्याच्यापायीं मराठी राज्य बुडालें असा आक्षेप पुष्कळ टीकाकार घेत असतात. त्यांना प्रो० लिमये यांनीं उत्तर दिलें आहे व परचक्र नाहींसें करण्याकरितां त्याकाळीं सरंजामी पद्धति सुरू करणें पेशव्यांना कसा भाग पडलें तें सरळपणानें दाखविलें आहे. प्रोफेसर साहेबांच्यामतें टीकाकार पेशव्यांना विनाकारण दोष देतात. सगळा दोष परिस्थितीचा आहे. पुढें तर त्यांनीं दैवालाही या वादांत ओढलें आहे. 'व्यक्तींप्रमाणें राष्ट्रांच्या अयुष्यक्रमांतही अदृष्ट हें एक महत्त्वाचें तत्व असतें. तें जर मराठ्यांस यावेळीं अनुकूळ असतें तर मराठ्यांस ही आपली साम्राज्याची इमारत दृढ करण्याची संधी मिळाली असती. आणि पेशवाई निःसत्व झाली ह्मणून अयोग्य ठरती तर कदाचित् शिंदेशाहीच्या प्रमुखत्वाखालीं मराठी साम्राज्याचा विस्तार झाला असता.' ऐतिहासिक गोष्टींच्या चर्चेंत दैववादाला स्थान मिळालें ह्मणजे सगळाच वाद मिटला पाहिजे. दैव अनुकूळ असतें तर अमकें करून दाखविलें असतें ही भाषा नपुंसकाच्या तोंडची आहे असें नेपोलियन ह्मणत असे. दैव तरी एखाद्याला अनुकूळ किंवा प्रतिकूळ होतें हें कशावरून ठरवावयाचें? या प्रश्नाला प्रोफेसर साहेब काय उत्तर देतील? जडसृष्टींतल्या इतर कार्यकारण संबंधांत दैवाला जागा नाहीं हें आपण पाहतों. झाडावरून फळ खालीं पडतें तें दैवानें नाहीं, तर गुरुत्वाकर्षणाच्या नियमानें पडतें. तसें राष्ट्राची उन्नति किंवा अवनति होते, अथवा त्यास कांहीं विशिष्ट परिस्थिति प्राप्त होते ती दैवानें नव्हे तर तिच्या पाठीमागें अनेक कारणांची परंपरा असतें. हीच गोष्ट पेशव्यांच्या सरंजामपद्धतीच्या इतिहासाला लावून तिची इष्टानिष्टता ठरविली पाहिजे. दैवाच्या अनुकूलतेचा किंवा प्रतिकूलतेचा नसता संबंध जोडून देण्यानें असले प्रश्न सुटतील असें जें प्रो० लिमये यांस वाटतें तो त्यांचा भ्रम आहे.

---

## ऐतिहासिक माहितीचीं टाचणें

'इतिहाससंग्रहा'चा नवा ह्मणजे नोव्हेंबर डिसेंबर १९११ व जानेवारी १९१२ चा जोड अंक नेहमीं प्रमाणें निवडक ऐतिहासिक माहितीनें भरलेला आहे. याच्या आरंभींच पानिपतच्या लढाईतल्या सैन्यरचनेचा नकाशा दिला आहे. त्या युद्धाचें वर्णन वाचतांना तो पुढें ठेविल्यास त्या युद्धासंबंधाची वस्तुस्थितीची बरीच चांगली कल्पना वाचकांना करतां येईल. हा नकाशा अयोध्येचा नबाब सुजाउद्दौला याचा वकील काशीराज पंडित याने तयार केलेला होता. याच काशीराज पंडितानें पानिपतच्या लढाईचा वृत्तांतही फारशी [illegible]षेंत लिहून ठेविला होता. हा पंडित [illegible]ा मुसलमान नबाबाच्या पदरीं [illegible] तरी हिंदुत्वास पारखा झालेला न[illegible]ता. युद्धाच्या गर्दींत

पडलेल्या विश्वासराव व भाऊसाहेब यांच्या देहांची मुसलमानांकडून विटंबना न होऊं देतां त्यांना हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें योग्य अग्निसंस्कार करण्याची परवानगी यानें फार परिश्रमानें मिळवून त्या प्रेतांचा दहनविधि त्यानें यमुनेच्या काठीं केला या कामीं त्याला गणेश वेदांती नांवाच्या सुजाउद्दौलाच्याच पदरच्या एका महाराष्ट्रीय ब्राह्मणाचें उत्कृष्ट साह्य मिळालें होतें. या दोघांचींही नांवें मराठ्यांच्या इतिहासांत अजरामर होण्यास योग्य आहेत. हा गणेश वेदांतशास्त्रात निपुण होता ह्मणून त्याचें नांव वेदांती असें पडलें होतें. या गणेश वेदांत्याचा चुलत बंधु माधवराव अनंत वेदांती ह्मणून होता. यानें श्री. सवाईराव माधवराव पेशवे यांस लिहिलेलें एक पत्र सांपडलें आहे. त्यांत पुष्कळ गमतीची माहिती आहे. त्यांतली काहीं येथें देतों. वेदवेदांगें यांच्या ज्ञानाचा विसर पडून लोक केवळ कर्मठ झाले हें पाहून वेदांत्यास वाईट वाटत होतें. यावरून तत्कालीन धर्मविचाराची दिशा कळते. ब्राह्मणांनीं एक ग्रंथ ह्मटला ह्मणजे शिवाजी महाराजांचें राज्याभिषेक गुरु गागाभट्ट यांनीं ब्राह्मणास मणभर धान्य व पांच रुपये रोख द्यावे, यावरून राजद्वारीं असलेलें दक्षणेचें मान कळतें. जयपूरकरांनीं त्याकाळीं अश्वमेध यज्ञ केला होता. यावरून धार्मिक राजे त्याकाळींही यज्ञयागादि करवीत व ती कर्मकांडाविषयींची कडकडीत श्रद्धा अद्यापीही त्या संस्थानच्या आधिपत्यांत परंपरेनें आलेली दिसते हें पाहून कौतुक वाटतें. याच पत्रांत सवाई माधवरात्र पेशव्यास राजनीतीचा उपदेश केलेला आहे. तो फार चांगला आहे.

२ सदाशिवराव भाऊचा तोतया कोकणांत एक झाला होता ही गोष्ट महाराष्ट्राच्या इतिहासांत प्रसिद्धच आहे. पण तसाच एक तोतया उत्तर हिंदुस्थानांतही झाला होता. या तोतयाचें रूप व भाऊ साहेबांचें रूप यांच्यांत इतकें विलक्षण साम्य होतें कीं भाऊसाहेबांचा एक चांगला परिचित लाला बालगोविंद नांवाचा इटावा येथलि एक व्यापारी त्या साम्यानें फसला, पण पुढें संशय येऊन त्यानें त्याला युक्तीनें वाटेला लाविलें. मी पानिपतच्या लढाईला जाण्यापूर्वीं तुमचे जवळ लाखों रुपयांची ठेव ठेविली आहे ती माझी मला परत द्या असें तो काशीच्या कित्येक ब्राह्मणांना ह्मणूं लागला यामुळें त्याची लबाडी उघडकीला आली. ही बाहेर आणण्याचें श्रेय मि० ग्रेहॅम यांनीं घेतलें हे आश्चर्य आहे. हे साहेब कुंपणी सरकारचे बनारस येथील एजंट होते. यांनीं राजा चेतसिंगाकडून त्यास कैद करवून चुनारगड किल्ल्यात ठेविलें तेथेंच तो सन १७८१ पर्यंत होता. पुढें वॉरन होस्टिंग्ज यांनीं त्याला सोडल्यावर तो काशीस जाऊन वारला.

३ तंजावरच्या राजघराण्याचा जो इतिहास रा० पासर[illegible] यांनीं लिहिला आहे तो फारच मनोवेधक आहे. एकोणिसाव्या शतकाचे आरंभीं झालेले परफोजी राजाला इंग्रजी शिकविण्यासाठीं एक मि[illegible]नरी शिक्षक ठेविला होता ही गोष्ट त्या काळच्या मानानें विचित्र दिसते. या राजांची अकबर बादशहाप्रमाणें सर्व धर्मांविषयीं समबुद्धि असे, व इंग्रजी वाङ्मय वाचण्याचा या राजाला नाद होता. यांना लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीनें ऑनररी मेंबर केलें होतें. हे समाजसुधारकही होते असें रा० पारसनीस सांगतात, पण याला प्रमाण मात्र त्यांनीं कोठें दिलेलें नाहीं. तें दिलें असतें तर बरें झालें असतें.

४ लॉर्डकार्नवालिस याच्याशीं पत्रव्यवहार करतांना मुसलमान बादशहा त्याचा किताब कसा लिहीत त्याचा मासला बघण्यासारखा आहे. तो किताब असा— „ मशीरखास सुलतान इंग्लिस्तान जुबदे जोइनाज अजीमशा गव्हरनरजनरल चालिस अरल कार्नवालिस सिपेसालार आफवाज पातशाही व कंपनी मुतालके किशवर हिंद फिदवी शाहाअलम पातशहागाजी "

५ दिल्लीचा शहा आलम बादशहा अलाहाबाद येथें कांहीं दिवस इंग्रजांच्या ताब्यांत होता. त्याला त्यांच्या कडून नजर नजराणा व सव्वीस लक्ष रुपये नगद अशी तैनात मिळत असे.

## वऱ्हाड वृत्त.

हवामान—— या सप्तकांत पर्जन्य फार नामी झाला आणि कित्येक ठिकाणीं ही खंडवृष्टी फार मोठी होऊन उपनद्या, नाले इत्यादिकांना महापूरही आले. रोगराईपैकीं हवेचा उपद्रव पुष्कळशा ठिकाणीं असून आरोग्याची स्थिती समाधानकारक होत चालली आहे.

पुढील महिन्यांत रा० रा० स्लाय साहेब कमिशनर हे रजेवरून परत येतांच त्यांच्या कडे रायल कमिशनच्या पुर्वारंभींची सिद्धता करण्याचें स्पेशल काम देण्यांत येणार आहे.

रा० रा० गो. इ. गोखले बी. ए. एल. एल. बी यांस उमरावतीस मुनसफ नेमण्यांत आले.

अभिनंदन—डाक्टर कुमारी श्रीमती नागुताई जोशी यांच्या सन्मानार्थ येथील स्त्रिया सार्वजनिक सभा येत्या ४ थ्या तारखेला भरवून त्याचा आदरसत्कार करणार आहेत अकोल्याच्या स्त्रीवर्गाची ही गुणग्राहकता स्तुत्य आहे.

आर्ट कालेज—वऱ्हाडप्रांतासाठीं आर्ट कालेज काढण्याचा प्रश्न निश्चित झाल्यासारखा दिसतो एडवर्ड स्मारक—फंडाच्या रकमेचा विनियोग या सत्कार्यीं व्हावयाचा आहे, या संबंधात येत्या गुरुवारीं रा० रा० स्टांडेन कमिशनर हे आपल्या कचेरींत त्या फंडाच्या व्यवस्थापकांची सभा भरवून कालेजाला लागणाऱ्या इमारती, उपसाहित्यें, पुढील योजना इत्यादि गोष्टींचा विचार करणार आहेत.

रा.रा. किलरो इनस्पेक्टर शाळाखातें यांची स्वारी सध्यां आकोल्यास आली आहे.

रा. रा. रामचंद्र सदाशिव लेले असि. इनस्पेक्टर हे थोड्या दिवसापूर्वीं नुकतेच गेले आहेत आणि त्यांनीं विद्यापरिषदेचा प्रोग्राम पक्का केला आणि शाळाही तपासल्या. नवी शिक्षणपद्धति प्रचलित करण्यासंबंधाचे प्रयत्न जारीनें चालू आहेत.

धार्मिक शिक्षण— तुरुंगांतील कैद्यांना नीतिमान करण्याचे जे प्रयत्न चालू आहेत. त्यामध्यें धार्मिक शिक्षणाचा एक प्रयत्न आहे. जबलपूर, रायपूर आकोला, बालाघाट व बुलडाणा येथील तुरुंगांतून अशा प्रकारचा उपक्रम चालू आहे व तो यशस्वी होईल किंवा कसें हें पुढील अनुभव सांगेल. सध्यां हा प्रयत्न सार्वत्रिक करण्याचा सरकारी विचार आहे; मुखवस्तु लोकांनीं सरकारास या बाबदींत साह्य करण्यास विसरूं नये.

### पाहिजेत

आकोले म्युनीसिपल कमिटी करितां दरमहा रु० २० व १५ वर दोन बिलकलेक्टर पाहिजेत. ज्यांची येण्याची इच्छा असेल त्यांनीं खालील सही करणाराकडे ता० १५-९-१२ चे आंत सरटिफिकिटासह अर्ज पाठवावें. कळावें ता० ३१-८-१२ इ०

R, M. Gupte

व्हाइसचेअरमन म्यु० क०

नो० नं० ४६५ आकोलें,

### NOTICE.

In exercise of the power con erred by rules I and 11 of the rules made under section 116 (1) (c) of the B. M. Law of 1886 and published in R. O. Notification No: 229 dated 23rd August 1897 the Committee have appointed the Police Officer for the time being in charge of the Town Station House as the only person to whom all reports of births and deaths within Municipal limits shall be made within 72 hours of their occurance in accordance with the terms of the aforesaid rules and on failure to make such reports to the Police, the defaulters will be prosecuted under the penalty clause of those rules.

R. M, Gupte

30-8-1912 Vice Chairman,

Akola. Municipal Committee Akola

No. No .466

### नोटीस

नोटीस बेशमी सदाराम कन्हीराम मारवाडी रा० खेर्डबु॥ ता० जळगांव जि० बुलडाणा यास:—

मी खालीं सही करणार याजकडून खेर्ड येथील सर्वे नंबर १७ एकर ३ गुंठे ४ आ० रुपये १९ यातील सहावा हिस्सा सर्वे नंबर ९४ एकर ३ गुंठे २८ आ० रुपये ८८८ यातील पांच आणे च्यार पैचा हिस्सा माझा असून वरिल सर्वे नंबरचें शेतें अजमास २-२॥ वर्षं झालें असतील मी त्यावेळीं अज्ञान असून पालन करिती सखूबाई मर्द पिराजी देशमुखीन रा० खेर्ड ही पालन करिती होती लोकांचे नादी लागून तुह्मास वरील शेतातील हिस्से लिहून न घेतां सर्वे शेताचें गहाणखत लिहून घेऊन गहाणाबद्दल रुपये ७५० कबूल केलें वरील रकम दिली नाहीं. या शीवाय ३-४ पुर्जे थाप देऊन लिहून घेतलें सर्वे नंबर १७।९४ या शेताचा भाडेपट्टा पांच वर्षीं करीतां रजिस्टर कचेरींत नोंदून घेतला माझे हिस्से न लिहून घेता सालीम सेताचे लिहून घेतलें माझा हिस्सा वजा जातां बाकीचें सेतावर माझा हक्क नाहीं. सन १९१०-११ सालांत गमनीराम मारवाडी रा० [illegible] पासून ७०० रुपयाचा हव[illegible] रुपये तुमचें जवळ अनामत जमीन व कापूस जवारी वगैरे बद्दल ६०० रुपये हेहि तुमचे जवळ अनामत आहे असे येकंदर १३०० शें तुमचे जवळ अनामत आहे. रुपये मागितले असता देत नाहीं. वरील पुर्जेही देत नाहीं. रुपये तुमचे जवळ अनामत असलेलें कोणते खातें कसें जमा केलें ते दाखवावे असे ह्मटलें असतां तुह्मी ह्मणालें कीं ज्यावेळीं दाखविण्याचा प्रसंग येईल. त्यावेळीं दाखवीन ता० २१-८-१२ इ० रोजीं मे० सबजज सा० ब० कोर्ट खामगांव मु० नंबर २०-१२ यांत प्रतिवादी असून माझी जबानी झाल्यावरून मजला संशय झाल्यावरून मजपासून पुर्जे लिहून घेतलेल्या पुर्ज्यांची पुढें फीर्याद करालच करितां नोटिशीनें कळविण्यांत येते कीं नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचें आंत १३०० शें रुपये आणून देऊन पावती [illegible] जावी कोणते खातें जमा केलें, त्या[illegible]याचा उत्तारा पंच लोकाचें समक्ष दाखवावें. पुर्जा लिहून घेतलेलें, तेही दाखवावें. व वरिल सेताचें भाडेपट्याचें रुपये आणून देऊन पावती घ्यावी व भाड्याचे रुपयाबद्दलचें. व्याजासुद्धां कोर्टांत दावा आणून कोर्टखर्च व नोटिशीचा खर्च तुमचे जवळून भरून घेतला जाईल कळावें तारीख २२।८।१२ इ०

सही

[illegible]जीराव यादवराव देशमुख राहणार खेर्ड खुर्द मु० खामगांव

नो० नं० ४६७

### जाहीरात.

सर्व लोकांस जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मयत माहिमाजी वल्दद इंद्राजी यानें शामराव वल्दद महिमाजी याला दत्तक घेतले आहे. व तेव्हां पासून मयत महिमाजीचें सर्व स्थावर आणि जंगम जिनगीचा शामराव मालक झाला आहे. त्याचे पुष्कळ लोकांकडून गहाणावरून व सांध दस्तऐवजावरून पुष्कळ घेणें आहे. त्याची दत्तक आई सारजाबाई जवजे महिमाजी ही आपले मुलीचे व जावयांचे मदतीनें तें कर्ज लोकांकडून वसूल करीत आहे असें समजतें तरी या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं सारजाबाई जवजे महिमाजी राहणार नकाशी इजला कोणी कर्ज देऊं नये. किंवा महिमाजीचे नांवे असलेलें दस्तऐवज तिचे नांवें नवीन करू नये किंवा तिजला कर्जाचे फेडींत पैसे देऊन तिजपासून दस्तऐवज अगर पावती घेऊ नये घेतल्यास तें कर्ज शामरावला मिळालें असें होणार नाहीं. व असाम्यास पुन्हां शामरावला देणें भाग पडेल आकोला ता० २७।८।१२

सही

शामराव वल्दद माहिमाजी अ० पा० क० रणधीर वल्दद योगाजी जात कुणबी रा० नकाशी नि. अर्से

नो० नं० ४६८

" बादशाही याकुती " बनविण्याचा हक्क प्रसिद्ध
डॉक्टर चांदलीआ ह्यानांच आहे.

## नामर्दाईवर " बादशाही याकुती "

आमच्या खऱ्या " बादशाही याकुतीचा " सरकारी रजिस्टर नंबर २२० आहे. ह्याच याकुतीनें सर्व प्रकारचे धातु विकार दूर होऊन नपुंसकत्वपणाचा पूर्णपणें नाश होतो व हमेश टिकेल अशी युवावस्था प्राप्त होते. हेंच औषध हिंदुस्थान युरोप व आफ्रिकेंत प्रसिद्ध आहे. किंमत रुपये १०.

**कमजोरीवर** " पुरुषार्थ लेप " गुप्त अंगाची कमजोरीचा नाश करून पुन तरतरी आणणारा प्रख्यात गुणकारी लेप. किंमत २९ रु.

## पूपरम्यावर वस्ताद प्रमेहांतक.

लघ्वीची आग, पू, ठणके हटकून बंद करणारा जगप्रासिद्ध " प्रमेहांतक " किंमत रुपये २ रोग बरा करूं इच्छिणाऱ्यांनीं हेंच औषध घ्यावें.

**जास्त माहितीसाठीं क्याटलॉग मागवा.**

**पत्ता--चादलीआ कंपनी** काळबादेवी रोड पोपटवाडी मुंबई.

नों० नं०

## तुमची निराशा दूर करण्या करिता.

= डॉ. आर, एम, युनानी यांचे औषध =

फारच अकसीर आणि यशस्वी झाले आहे. **करितां--खात्री--करा**

**शक्तिच्या गोळया**— ह्या गोळया इतक्या रामबाण आहेत कीं यानें नष्ट झालेली शक्ति व पुरुषत्व चमत्कारीक रितीनें परत येते. नष्ट झालेली स्मरणशक्ति प्राप्त होते. व मेंदू पुष्ट होतो. झोंप न येणें, भूक न लागणें आणि धातुसंबंधी प्रत्येक रोग नाहिसा करून ह्या गोळया मनुष्यास सशक्त करतात ह्या गोळयांचा असा खास गुण आहे. ह्मणून ह्या गोळया स्त्रीपुरुष दोघांसही उपयोगी आहे.

बाटली १ ची किंमत रु० १.

**परम्यावर अकसीर औषध**— वाटेल तसा पुष्कळ दिवसांचा जूना परमा असला तरी पण ह्या औषधाच्या सेवनाने मात्र तीन दिवसांत बरा होईल एक भाग पितांच वाटेल तशी आग, व तिडक बंद होईल व पू वाहणें बंद होईल असा ह्या औषधाचा चमत्कारीक गुण आहे. याचे सेवन केल्यानें आपले जीवास सुख होईल व द्रव्याचा व्यय होणें थांबेल.

बाटली १ ची किंमत रु० १.

**केस काळे करण्याचा सुगंधी कलप**— ह्या कलपानें तारुण्यात पांढरे झालेले केस काळे होतात व तेजस्वि आणि रेशमासारखे मऊ होतात. केसास लावल्यान दुसऱ्या कलपासारखी घाण येत नाहीं. परंतु सुगंधवास येतो. याच्या अशा गुणामुळें हजारो हौशी लोक याचा उपयोग करित आहेत. तरी आपणही याचा उपयोग करण्यास चुकु नये.

बाटली १ चा किंमत ६ आणे

प्रत्येक औषधाचा पोष्ट खर्च निराळा पडेल,

डा० रहेमतुला सुलेमानजी
हबीब बिलडींग कारनेर ग्रांटरोड — मुंबई

नो० नं० ४१६

## का य द्या चीं

**न्यायाश्रय मासिक पुस्तक** आह्मी आज ४९ वर्षें काढीत असतो; यांत चारी हायकोर्टांच्या व प्रिव्हिकौन्सिलच्या ठरावांचें भाषांतर दिलेलें असतें. याची सालीना अगाऊ वर्गणी रु. १० व ट. खर्च ६ आणे आहे.

इतर **कायद्यांचीं पुस्तकें**, इंडियन पिनलकोड, क्रि. प्रो. कोड, सि. प्रो. कोड वगैरे सर्व सटीक व साधीं पुस्तकें व किरकोळ आक्ट आमचेकडे विक्रीस तयार आहेत; खालील पत्त्यावर क्याटलाग मागवा.

पुणें, शनवार ४२९. **न्यायाश्रय कर्ते.**

नो. नं ४१९

## कां तुह्माला तरुण होणें आवडते कां?

**पांढरे केस काळे करण्याकरितां अगदीं नविन शोध**

**वेद कंपनीनें तयार केलेले**

**हेअर गोअर ( साळ्युशन )**

१९ दिवस लावल्यानें वाटेल तसे पांढरे केस काळे होतात व डोक्यांतील टकलीस केस उगवतात. पांढरे केस काळे झाल्यानंतर पुनः पांढरे होत नाहीं. आणि तुमची अडचण दूर होईल.

मग पहा, तुह्मी कसे देखणे दिसता!

हे तेल त्याच्या बहुगुणांमूळें घरोघरीं वापरतात. कारण कीं ह्यानें डोकें शांत होतें व केस रेशमासारखे मऊ होऊन तेजस्वी होतात, गुणाची जास्त खात्री पाहिजे असल्यास वापरून खात्री करा, बाटलीची किं० रु. २

पत्ता — वेद कंपनी आफीस खांडबाजार मुंबई.

नो० नं० ४१७

## जाहीरात.

**!!! डाक्टर जी. बी. याची सुवासिक औषधी तपकीर !!!**

**!! मागवा व खात्री करून घ्या !!**

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत.




शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेलीं आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशि, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदू स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंग होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साध्या तपकीर दहा वीस वेळां ओढून जो उपयोग होतो तो गूण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडों लोक ही तपकीर आपल्या कुटुंबात नित्य लागणाऱ्या औषधांप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत हे गूण आमच्या तपकीरींत एक वर्षपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मी मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे. एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलीं असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मी फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डजन बाटल्यास रु. २-८ " " " ६ आणे

[ सूचना ] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिहींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचे ठिकाणः—

**गुरुबसवा आणि कंपनी,**
सावकार पेठ, मद्रास.

नो. नं. ३०७

# एकाच वस्तूपासून तीन देणग्या

सौंदर्य

आरोग्य

थोडा खर्च

जेव्हा तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखांना मुकावें लागतें.

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारचे घाणेरे भयंकर रोग होतात:—काळे डाग, संधिवात वर्शातव्रण, पीनस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभैरी मेहरी, बद, फोड, चट्टे, ...गाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडु व कडकीपासून इतर रोग.

तर स्वत:चाच राजवैद्य बनून

रोग नष्ट करणें बरें नव्हे काय ?

डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—

## आयोडाईझड सार्सापरीलानें

ते निखालस बरे होतात.

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

——अनुभवतरपहा.——

किं. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तमगुणास, ४ बाटल्यांची पो. ख. सह किं. ४ रु.

बालामृत हें काय आहे ?

—— अस्सल बालामृत हें ——

मुलाना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगावर अमोलिक उपाय आहे

क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं हाडें, ओकारी, शौचाला वाण, वाईट दुधानें होणारें रोग, कंडू, आंकडी वगैरे.

डा० गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें.

इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला ! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊ नका.

किं. ०१२ आणे पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २८९

पत्ता:-- हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४ नं. २८७



# जवानी

भीमसेनी बळ

व

तारुण्यांतील शक्ती गेली असल्यास

दुसऱ्या औषधाशीं तुलना केल्यास नंबर १ चें

तावडतोब आमच्या १ रुपया किंमतीच्या नामांकित

शक्तिवर्धक औषधाचा

उपयोग करा

व मग पहा कीं दहा दहा व पन्नास पन्नास रुपये किंमतीच्या याकुतींपासून जास्त फायदा आहे कीं आमच्या रुपया किंमतीच्या औषधापासून जास्त फायदा आहे ?

आमचें औषध वापरणारांकडून त्यांस त्यांच्या गुणाप्रमाणें

...मेलेल्यास जिवंत करणार

हा किताब मिळाला आहे.

आणि तुह्मांस वापरल्यावर खरें तेंच कळून येईल.

हें औषध ज्या वस्तूपासून बनविलेलें आहे ती वस्तू दुनियेंतील हकिमांचें राजे लुकमानी याच्या औषधांपैकीं एक पहिल्या नंबरचें औषध आहे.

ज्यामुळें तुमची गेलेली शक्ती--तारुण्यांत आलेली दुर्बलता गात्रांची शिथिलता आजारीपणामुळें अंगांतील कमी झालेलें रक्त तुह्मांस प्राप्त होईल.

गरीबांनीं वापरून आह्मांस आशीर्वाद द्यावा ह्मणून ४० गोळ्यांच्या शिशीस किंमत १ च रुपया ठेविली आहे. पोस्टेज वेगळें. लेपाची शिशी पाहिजे असल्यास तिचीही किंमत १ रुपया आहे करिता दुसरें औषध घेण्यापूर्वीं ह्या औषधांचा उपयोग करण्यास चुकू नका.

पांच रुपयांचीं औषधें घेणारास गोळ्यांच्या २ शिश्या बक्षिस देऊं. दुसऱ्या, कित्येक जबरदस्त रोगाकरितां आमच्याकडे अस्सल युनानी औषधें मिळतील व त्याबद्दल माहिती पत्र आल्यास कळवूं. एम. ई. हकीम.

सिप्रपूर, नॉर्थ गुजराथ



## धी बॉम्बे टाइल कंपनी




= आरस पराण =

जमीनीवर बसविण्याच्या रंगीन लाद्या दगड आणि सीमेन्ट विकणार.

आमच्या मालाची खात्री करून घ्या.

उत्तम माल ??? स्वस्त भाव ??

१६७ डंकन रोड मुंबई नंबर ४



ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

# सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[१८६९]

इंग्लिश सरकारची सक्त देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता येत नाही.

भांडवल तेरा कोटी रुपये.

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत

पालिसी .... .... .... .... .... .... विन अटींच्या.

पॉलिसी .... .... .... .... .... .... विन तक्रारी.

पॉलिसी .... .... .... .... .... .... विन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस हार्नबी रोड मुंबई. } व्य. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे नो. नं. १३ वऱ्हाडचे जनरल एजंट अकोला ' प्रांतवऱ्हाड



# Oriental Govrnment securi
# LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

## FUNDS Exceed 4 crores

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in termes of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14


हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें.

Registered N.4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४६ ] आकोला—— सोमवार तारीख ९ माहे स्प्तेंबर सन १९१२ ई० [ अंक ३६


## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचें दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील.
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचना— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच [illegible] सप्तांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटिसी स्पेशल चार्ज पडेल


### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाच्या १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगत्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ } G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बँकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६३/३ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बँक आकोला २१-९-१० } G. A. Phillips. एजंट
नं० नं० २

### जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

पत्ता :एम. एम. आणि सन्स
पुलाजवळ आकोले

## निराश्रित बाल रक्षण गृह

सर्वत्र जनसमाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्याना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपशीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकाच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळ्यावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगनियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केलें आहे भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णू प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर
ता: १६-८-१२ आकोला वऱ्हाड
नो. नं. २६०

### पाहिजे

कम्पाऊन्डरचें काम शिकलेली बाई उमरावती येथील स्त्रियांचे दवाखान्याकरितां पाहिजे आहे. पगार दरमहा रु० २० व घर राहण्यास मिळेल. उमेदवारानें ऑनररी सेक्रेटरी कॉऊन्टेस ऑफ डफरीन फंड वऱ्हाड ब्रॅंच उमरावती यांचेकडे दाखल्याच्या नकलासह अर्ज करावा.

H. E. Banatvala
ऑनररी सेक्रेटरी

नं० नं० ४६९

### शेती भाती

असणाऱ्यांनीं आह्मीं तयार केलेल्या शेतकीच्या आउतांचा क्याटलाग मागाविण्यास विलंब लावूं नये. ही वेळ फुरसतीची आहे. सबब आतांच क्याटलाग मागवून त्यांतील आऊत पसंत करून आह्मांस पत्र लिहा. ह्मणजे तुह्मांला वेळेवर आऊतांचा उपयोग करण्यास सांपडेल

किर्लोस्करबंधु.
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा).

नो० नं० ४७०

### विकावयाचीं आहेत.

आकोलें येथील काळे मारुति मार्गे व मि. सावरकर यांचें घरामागे आह्मी नवें घर बांधिलें आहे. ते दुमजली असून त्यास गच्ची व प्रशस्त आंगण आहे.

उमरी प्रगणे बाळापूर ता. आकोला येथील मळा सर्वे नंबर ९९ एकरगुंठ १३।८१६ यांतील उत्तरेकडील आमचा एकतृतिअंश हिस्सा. यांत मोठी विहीर आह्मी चुनेगच्ची बांधली आहे. तींत दोन मोटीस पुरेसें पाणी आहे.

कसबे आडगांव ता. आकोट येथील सर्वे नंबर १४८ एकर १६८३८ सबंध शेत. [illegible] १ घर व २ शेतें आमचे मालकीचीं विकावयाचीं आहेत. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं विशेष माहिती मालकाकडे मिळवावी. ता. २४-८-१९१२

हरी रामचंद्र रोहणखेडकर.
आकोला

नो० नं० ४७१

### जाहिर नोटीस

वि० सबजज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टः—

सक्सेशन सर्टिफिकेट नं० १६ सन १९१२
सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज—
अर्जदार

उत्तमराव शिवजी देशमुख राहणार यवद तालुके दर्यापूर

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याचा अर्ज तारीख २-८-१२ रोजीं दिला असून त्याची चौकशीची तारीख १६।९।१२ ची नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचें कोर्टांत हजर व्हावें. तसे न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० ३-९-१९१२ इसवी.

सही
JANKIPRASAD.
सबजज आकोला.

नो० नं० ४७२

### "पैसा फंड व ग्लास वर्क्स तळेगांव"

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि० वि० सार्वजनिक उहापोह व्हावा ह्मणून खालील मजकूर आपण आपल्या पत्रांत प्रसिद्ध कराल अशी आशा आहे. पैसा फंडासंबंधानें सुरू केलेल्या कांचशाळेची स्थिति कशी आहे व ति[illegible] भरभराट होण्यास काय करावें तसेंच अशा तऱ्हेच्या अनेक उपयुक्त संस्था काढण्याचा ज्या पैसा फंडाचा उद्देश आहे, त्या फंडाची पूर्ववत् भरभराट होण्यास कोणते उपाय करावे यासंबंधानें ज्यांस जे उपाय सुचतील ते त्यांनीं कोणत्याही वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करावे. कोणास आक्षेप व शंका येतील त्या स्पष्टपणें कळवाव्या व संस्थेच्या हितास्तव कांहीं सूचना करणें जरूर वाटल्यास त्या कराव्या. त्या पत्राचा एक अंक अध्यक्ष डा० नानासाहेब देशमुख मुंबई या पत्त्यावर पाठविण्याची कृपा करावी. तसा अंक न आल्यास इच्छित हेतू पार पडणार नाहीं. तशी सोय नसेल तर मजला पत्रद्वारें कळवावें ह्मणजे मी ते मुख्य कमिटी पुढें ठेवीन. शक्य तीतकी जलदी करावी अशी करद्वय जोडून विनंति आहे.

पैसा फंडाची कल्पना बंगाल्यांतून इकडे आली. रा० गोविंदराव जोशी राह० वसई यांनीं १८७३ मध्यें पाहिला प्रयत्न केला. त्यांच्या मागून १८९६ पर्यंत रा० ओक, रिसबूड, पटवर्धन, वेळणकर, भट, गुर्जर, ठाकूर यांनीं अल्पस्वल्प प्रयत्न केले. परतु कल्पना सर्वमान्य झाली नाहीं. रा० भट व रा० वेळणकर यांस मात्र थोडें यश आलें होतें. १८९९ चा भयंकर दुष्काळ गरीब लोकांस चांगलाच जाणवला. एकानें ओकारी होऊन पडलेलें अन्न खाल्लें व दुसऱ्यानें आपली मुलगी ६ आणे घेऊन एका मुसलमानास विकली! सुवर्णभूमीच्या पोरांवर असा प्रसंग कां आला या संबंधानें विचार केला. तेव्हां देशांत जशी प्रजा वाढत आहे. तशी निर्वाहाचीं साधनें वाढत नाहींत, असें दिसलें. यंत्रकौशल्यापुढें हस्तकौशल्य फिक्कें पडल्यामुळें आमचे शेंकडो धंदे बसले. सबब सुधारलेल्या यंत्र सामुग्रीचें सहाय्य घेतलें तरच हल्लींच्या काळीं आपला निभाव लागेल ही गोष्ट समंजस लोकांस कळून चुकली आहे. परदेशांतील कला इकडे येण्यास २ मार्ग आहेत. तिकडे मुलें पाठविणें हा एक व तिकडून उत्तम प्रोफेसर आणवून इकडे शाळा काढणें हा दुसरा. हीं दोन्हीं कामें प्रचंड खर्चाचीं आहेत. पाहिल्या मार्गापेक्षां दुसरा मार्ग बरा असें आतां अनुभवांतीं पुष्कळास वाटूं लागलें आहे. या देशांत कै० टाटा यांच्या सारखे दानशूर श्रीमंत गृहस्थ

बिरळा आढळतात. मग मोठाले आंकडे पडून अवाढव्य फंड जमावा कसा? जमणार नाहीं व तो जमला तर पाहिजे. ह्मणून मी पैसा फंडाची कल्पना हातीं घेतली. ३० कोटीपैकीं, अगदीं दरिद्री व अशिक्षित असे २६ कोट लोक वजा केले, तर बाकी ४ कोट लोक राहतात. यांनीं बारा महिन्यांतून **फक्त एक पैसा** व तो फक्त **एकदांच** दिला, तरी त्याचे ६। लक्ष रुपये होतात. पैसा पैसा दिल्यानें इतका फंड जमा होतो मग दोन आणे चार आणे दिले तर किती रकम जमेल याचा अंदाज करा. कोणावर भार न पडतां “[illegible]की लकडी एकका बोजा” या [illegible]नें मोठा फंड जमण्याचा हा सोपा मार्ग असतां मोठाल्या मंडळीनें उत्तेजन देण्याऐवजीं थट्टा सुरू केली, फंड गांवांत ठेवा अगर सर्व लोकांस कळण्यासाठीं केसरीकडे पाठवा. माझा त्याच्याशीं काडी मात्र संबंध नाहीं असें भर सभेंत कंठरवानें सांगत असतां ५ वर्षांत फक्त ९०० रुपये जमले! फंडाची व्यवस्था कोण पाहणार व काय काम करणार हें सांगा ह्मणजे फंड देऊं असें लोक ह्मणत. कमिटी करण्याबद्दल पुढारी लोकांस सांगावें तर ते ह्मणत कीं, फंड जमल्याखेरीज व्यवस्था कसली करावयाची? जमल्यावर सर्व जाहीर करूं. याप्रमाणें दोघांनीं टोलवाटोलीव केली यामुळें पांच वर्षें गेलीं! अशा प्रकारचें उत्तेजन असल्यावर निराशा होणें साहाजिक आहे. पण मि. काब्डेनूचें चरित्र मीं वाचलें होतें यामुळें प्रयत्न सुरूच ठेवला. दुसरें कारण असें कीं, आरंभ शूराःखलु दाक्षिणात्यः” हा डाग अंशतः धुतला जाईल तर पहावा. शेवटीं “निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेची फळ” या अभंग वाणीचा भंग होऊं नये ह्मणूनच कीं काय परमेश्वरानें मोठ्या लोकांस कमिटी करण्याची प्रेरणा केली. रा० टिळक व डा० देशमुख यांच्या मनांत त्यावेळीं कमिटी करावयाची नव्हती. परंतु फंडाचा उत्कर्ष व्हावा ही प्रभूची इच्छा ह्मणूनच रा० ब० मुधोळकर, रा० ब० महाजनी, रा० गद्रे (धुळे) यानीं स्पष्ट सांगितलें कीं, कमिटी झाल्याखेरीज फंडावर विश्वास बसणें शक्य नाहीं. रा० काळे यांची मेहनत व्यर्थ जात आहे व जाईल. नंतर जाहीर सभा भरून कमिटी झाली. नियम तयार होऊन संस्था ता० १६।१०।१९ रोजीं सन १८६० च्या २१ व्या कायद्या प्रमाणें सरकारकडे नोंदली. शेती, व्यापार व कलाकौशल्य यांस उत्तेजन देणें हा उद्देश प्रसिद्ध झाल्यावर फंड वाढूं लागला. १९०६।७।८ या तीन वर्षांत ४४ हजार रुपये फंड जमला यापैकीं निम्मेपेक्षां जास्त शेवटच्या एकाच वर्षी जमलेला होता! याचा उपयोग कोणत्या कामीं करावा या संबधानें लोकांचे अभिप्राय मागविले. आगपेट्या, साखर, शिसपेन्सिली तयार करण्याचे कारखाने काढावे अगर कापडाचे माग घालावे अशा सूचना झाल्या. फंड कमी असल्यामुळें कांचेचा कारखाना काढण्याचें ठरून १२ हजार रुपये मंजूर झालें. मि० ईश्वरदास यांस बोलावण्यांत आलें. रा० वागळे हे विलायतेहून कांचकाम शिकून आले होते. यांचें मत या देशांत कांचेचा कारखाना सहसा फायदेशीर होणार नाहीं असें होतें ह्मणून तो कारखाना तळेगावीं समर्थ विद्यालया शेजारीं काढला ह्मणून कमिटींत मतभेद झाला. कित्येकांनीं आपलें अंग काढून घेतलें याचा परिणाम फंडावर थोडा थोडा होऊं लागला. ईश्वर कृपेनें मि० ईश्वरदास यांस यश आल्यामुळें तो मतभेद जागच्याजागीं जिरला. पोलीसास कांहीं संशय आल्यामुळें कारखान्याची अकस्मात् झडतीही घेतली. दोषाई कांहीं सांपडले नाहीं. कारखान्यांत प्रथम ३ जपानी ठेवून त्यांच्या हाताखालीं २ मुलें दिलीं. प्रथम त्यांस पगार होता. पुढें कांहीं पगार व कांहीं कमिशन ठरलें. मद्रास अंबाला वगैरे ठिकाणीं कारखाने होते. परंतु शिक्षणाची सोय कोठें नव्हती. जपानी गेले कीं कारखाना बंद पडत असे. ही उणीव दूर व्हावी व एक कला देशांत कायमची यावी ह्मणून कारखान्याचें शाळेंत रुपांतर केलें. कारखाना फायदेशीर होत नाहीं, तेव्हां बेअब्रू होऊ नये ह्मणून शाळेचे निमित्त केलें अशी कंडीही पिकविण्यांत आली! आज ४ महिने जपानी स्वदेशीं गेले असून मुलेंच कारखाना चालवित आहेत. यावरून शाळा काढली हें बरें केलें हें कोणीही कबूल करील. मि० करंदीकर बी. एस् सी. यांस ५० रुपयांवर शिक्षक नेमलें. जाहिरात देऊन आणखी मुलें घेतलीं. नंतर कारखाना लवकरच नांवारूपास आला. माल उत्तम निघतो अशी प्रसिद्धी झाल्यामुळें पुष्कळ लोक कारखाना पहावयास येत. मुंबईचे बडे शेट, म्हैसूरचे युवराज, बडोद्याचे महाराज, मुंबई सरकारचे मंत्री नाम. लँब, ना. मॉरिसन, ना. चौबळ हे हा कारखाना पाहून फार खुष झाले. यातिवानीं कोरडा संतोष न दाखवितां मुंबई सरकाराकडून आश्रय देवविला. पुढें नेक नाम. सर जॉर्ज क्लार्क, गव्हरनर साहेब बहा. यांची स्वारी पत्नीसह ता० २० जून सन १९११ रोजीं कारखाना पहावयास आली होती. त्यांनीं खालील शेरा देऊन फंडावर अगणित उपकार करून ठेवले आहेत.

I have had much pleasure in inspecting this factory. The work exceeds my expectation and I hope that this useful enterprise will be increasingly successful.

(हा कारखाना पाहून मला फार संतोष झालेला आहे. मला वाटलें होतें त्यापेक्षां अधिक काम येथें होत आहे आणि या उपयुक्त कामाची भरभराट होत जाईल अशी मी आशा बाळगतों.)

नाम. गोकुळदास पारख, सर ड. भालचंद्र, मि. दाजी साहेब खरे यांनीं गेल्या दसऱ्याचे वेळीं मुंबईत वर्गणी गोळा करण्याचे कामीं विनंतिपत्रावर सह्या देऊन सहाय्य केलें ह्मणूनच स्वयंसेवक थोडे असताही १३०० रुपये जमले. मुंबई प्रमाणें इतर ठिकाणी फंड गोळा करण्याची खटपट होत नाहीं. यामुळें अलीकडे फंड फारच कमी जमूं लागला आहे. फंड नोंदलेला असून त्यापैकीं १ पैसाही उद्देशाबाहेर खर्च झालेला नाहीं. हें रिपोर्ट पाहिल्यावर कोणासही कळून येईल. फंडानें हातीं धरलेलें पहिलेंच काम बिकट असतांही त्यांत यश आलें, मग लोकांस हुरूप यावा कीं निरुत्साही बनण्याची पाळी यावी? पूर्वीं दरमहा १५०० पर्यंत वर्गणी येई. आतां १५० सुद्धां येत नाहीं हें पाहून समंजस मनुष्यास सखेदाश्चर्य वाटेल. पूर्वीं सरकारी अधिकारी व पोलीस यांस फंडाच्या विनियोगासंबधानें शंका आली होती. पण दप्तर तपासणी झाली त्यावरून कमिटीकडून तरी उद्देशाबाहेर एक पैसाही खर्च झालेला नाहीं, हें सिद्ध झालें आहे. यामुळें तशी शंका राहिली नाहीं. परंतु फंड गोळा करणारांकडून दुरुपयोग झाला असावा असा कित्येकाकडून आक्षेप ऐकूं येतो. हा खरा आहे असें घटकाभर गृहीत धरलें, तरी यांत कमिटीचा काय दोष आहे, याचा विचार केला पाहिजे. कमिटी सर्वज्ञ नाहीं, कीं बाहेर जें जें होतें, तें सर्व अंतर्ज्ञानानें तिला समजूं शकेल. फंड गोळा करणारे किती लायकीचे आहेत, हें फंड देणारांनीं पहाण्यास पाहिजे. यापुढें मात्र या संबंधानें जास्त सावधगिरी घेतली जाईल हें मी खात्रीनें सांगतों. असो, इतर बाबतींत मतभेद असतांही या औद्योगिक बाबतींत सर्वांस काम करतां येणें शक्य आहे. मग तो कोणत्याही धर्माचा, जातीचा, पंथाचा अगर मताचा असो. संस्थेचे चालक कोणी असोत, उद्देशास सोडून त्यांचें वर्तन होणार नाहीं, तोंपर्यंत सरकार कडून उपसर्ग होणार नाहीं. हा पोटापाण्याचा प्रश्न आहे ह्मणून समदृष्टि राहणें शक्य नाहीं, असें कित्येकांस वाटतें परंतु कै० टाटा यांचा कारखाना, मुंडव्याची पेपर मिल वगैरे कडे लक्ष्य दिलें ह्मणजे शंका राहत नाहीं. ज्या कारखान्यांत हजारो टन पोलाद तयार होतें, त्याजवर वक्रदृष्टि नाहीं, तर तें या गरीब बिचाऱ्या पैसा फंडावरच कां ठेवील हें कळत नाहीं. आतां मुख्य कमिटीची निवड लवकरच होणार आहे. त्यावेळीं सर्वांच्या विश्वासास पात्र असे सभासद निवडून दिल्यास फंडाचें कल्याण होईल. गांवकमिट्या हा मुख्य कमिटीचा पाया होय. दरसाल ८ आणे देणारे १० इसम मिळाले ह्मणजे तेथें गांवकमिटी होऊं शकते. सगळ्या जिल्ह्यांत ८ आणे अगर अधिक वर्गणी देणाऱ्या गृहस्थांचीं नांवें प्रसिद्ध होतील. यांतून दोन नांवें मुख्य कमिटीकडे पाठवावीं कर्तव्यदक्ष एकटा मनुष्य केवढें मोठें कार्य करूं शकतो, हें प्रो. कर्वे यांच्यावरून आपणांस कळून येईल. त्यांच्या सारखे ४।५ माणसे या कमिटींत असतीं, तर १० वर्षांत ५० हजारापेक्षां जास्त फंड खचीत जमला असता. यापुढें तरी कर्तव्यजागृति होईल अशी आशा आहे. इतर लोक अगर सहाय्य देतील तरी कमिटीस पुष्कळ उत्तेजन येईल. मोठाले लोक विरुद्ध असतां माझ्या सारख्या साधारण माणसानें लोकमत तयार करून फंड जमविला, तर लोकमत तयार असतां विद्वानांस आपापल्या गांवापुरतें काम करतां येऊं नये काय? आगगाडीच्या १० हजार डब्यांतील उतारूंच्या पैकीं कोणी दार लावून घेईल तर गार्डास मेहनत न पडतां २ मिनिटांत गाडी चालू होईल. हाच न्याय येथें लागू करावा मुख्य कमिटी हा गार्ड व गांव हे डबे समजा प्रत्येक गांवांत एक दोन असे इसम मिळूं नयेत कीं जे कमिटीचा भार हलका करूं शकतील? उद्योग धंद्याचे बाबतींत सुद्धां आपण औदासिन्य धरलें तर पुढील प्रजेचें कल्याण होईल कीं अकल्याण होईल याचा विचार करा फंडाचे हिशेब तपासण्यासाठीं सरकारी ऑडिटर्स यांस सांगावें ह्मणजे कोणासही शंका राहणार नाहीं. मी १२ वर्षे काम करीत आहें. परंतु मला पोलीस कडून अगर सरकार कडून काडीमात्र त्रास झाला नाहीं, हें मी परमेश्वरास स्मरून सांगतों. उठल्या बसल्या पोलीसची नालस्ती करणारांनीं याचा विचार करावा परमेश्वरास ये जन्म शुद्ध भावानें प्रयत्न केल्यास सर्वशक्तिमान प्रभु आपल्या सार्वभौम प्रभूच्या रयतेच्या कल्याणार्थ होणाऱ्या प्रयत्नास हातभार लावण्याची प्रेरणा करील अशी मला खात्री आहे. पत्रकर्ते महाराज सर्वांनीं शांत मनानें याचा विचार करावा व दु ा जास्त वाटलें तर तो हस्तदोष समजून क्षमा करावी इतकें सांगून पत्र पुरें करतो. क. लो. वि.

अकोला — आपला

३।९।१२ — अं. दा. काळे

# वऱ्हाडसमाचार.

श्रावण वद्य १३ शके १८३४ परिधावी

## दुष्काळांनीं शिकविलेला धडा.

अलीकडे वारंवार दुष्काळ पडूं लागल्यापासून दुष्काळ पडण्याचीं कारणें व त्याच्या निवारणाचे उपाय याकडे लोकांचें गंभीर लक्ष लागलें आहे. सुदैवानें यंदा अद्यापपर्यंत पाऊस पाहिजे तसा पडत आहे. त्यामुळें यंदा तरी हिंदुस्थानांत कोठें दुष्काळ पडेल अशी भीती नाहीं. तथापि आजपर्यंत पडलेल्या दुष्काळांचा इतिहास जर कोणी लिहिला तर तो फार उपयुक्त होईल. त्याची यासाठीं या दुष्काळांच्या इतिहासाची थोडीशी सामुग्री गोळा करून त्यांपासून सरकारानें व लोकांनीं कोणता धडा घ्यावयास पाहिजे तें आज आह्मी वाचकांपुढें मांडीत आहों.

हिंदुस्थानांत अलीकडे वारंवार दुष्काळ पडतात असें आह्मीं ह्मटलें यावरून पूर्वींच्या काळीं मुळींच दुष्काळ पडत नसत असा अर्थ घ्यावयाचा नाहीं पूर्वींच्या काळीं हिंदुस्थानांत पडलेल्या ज्या दुष्काळांची नोंद इतिहासांत आहे तें असें होतेः—अकराव्या शतकांत दोन स्थानिक दुष्काळ, तेराव्यात एक हा दिल्लीच्या जवळपास होता. चौदा-

हा आरोप करणारे खरा व खोटा बेगडी वेदांत [illegible]क्षांत आणीत नाहींत.

[illegible] तीन. हे स्थानिक होते [illegible] शतकांत दोन दुष्काळ पडले. [illegible] स्थानिक होते. सोळाव्यात तीन स्थानिकच. सतराव्या शतकांत मात्र तीन दुष्काळ झाले आणि ते सगळे सार्वत्रिक होते. अठराव्या शतकांत दिल्ली, सिंधप्रांत व उत्तर हिंदुस्थान मिळून चार दुष्काळ झाले. एकोणिसाव्या शतकांत दुष्काळांची संख्या ३१ होती व त्यांच्यापायीं सुमारें २॥ कोटि जिवांची हानि झाली. ह्मणजे अकराव्या शतकापासून पुढें सातशें वर्षांत जेवढे दुष्काळ पडले, तितके एकट्या एकोणिसाव्या शतकांत पडले. असें होण्याचीं कारणें काय असावींत ही गोष्ट जिज्ञासूंनीं शोध करण्यासारखी आहे यांत शंका नाहीं. अनावृष्टि हेंच दुष्काळाचें कारण आहे काय? असल्यास एकोणिसाव्याच शतकांत इंद्र देवतेचा एवढा कोप हिंदुस्थानावर कां व्हावा? नुसत्या अनावृष्टीनें हिंदुस्थानांत दुष्काळ पडणें शक्य नाहीं कारण एका प्रांतांत एका [illegible] अनावृष्टि झाली तर दुसऱ्या प्रांतांत [illegible] सुवृष्टि होते. शिवाय या देशांत मोठाले नद, व नद्या आणि कालवे असल्यामुळें [illegible] केवळ पावसावरच अवलंबून नसतात. इतर प्रांतांतून धान्याचा पुरवठा होऊं शकतो धान्याचा दुष्काळ क्वचितच प[illegible]तो. बाजारांत धान्य आहे, पण तें विक[illegible] घेण्याला जवळ पैसे नाहींत अशी स्थिति मात्र अलीकडच्या काळांत विशेषत: दृष्टीस पडते. सारांश, सध्याचा दुष्काळ पैशाचा आहे. कित्येक पाश्चात्य लेखक दुष्काळाचें खापर वाढत्या लोकवस्तीवर फोडण्यास सर्वदा तयार असतात. पण हिंदुस्थानांतले प्रजावृद्धीचें प्रमाण पुष्कळ पाश्चात्य देशांतल्यापेक्षां उलटें कमी आहे. असें असून युरोपांत दुष्काळ क्वचित् आणि हिंदुस्थानांत निरंतर पडतात! हिंदुस्थानांत शास्त्रीय पद्धतीचा स्वीकार करून एकाच्या जागीं [illegible] कणसें पिकविण्याची विद्या अज्ञान शेतकऱ्यांना ठाऊक नाहीं ही गोष्ट खरी आहे, आणि ही गोष्ट ध्यानांत घेऊन आपलें दयाळू सरकार अलीकडे या दिशेनें शेतकरी लोकांत प्रयत्न करूं लागलें आहे ही संतोषाची गोष्ट आहे. पण दुप्पट किंवा चौपट धान्य पिकविल्यानें हिंदुस्थानांतले दुष्काळ नामशेष होतील हा मात्र भ्रम आहे. कित्येक लेखक असेंही ह्मणतात कीं पूर्वींही दुष्काळ पडून भयंकर प्राणहानि होत असे पण त्यावेळचे कागदपत्र उपलब्ध नसल्यानें त्यावेळच्या दुष्काळाची नोंद आपणांस लहान दिसते. कांहीं अंशीं ही गोष्ट सत्य आहे हें [illegible] पण त्याकाळीं लढाय[illegible] त्यापायीं पुष्कळच [illegible] असे. आतां लढाईचा [illegible]चें प्रमाण पूर्वीं इतकेंच [illegible] आहे. ही निवळ [illegible]रून सप्रमाण सिद्ध [illegible] गोष्ट आहे. हल्लीं [illegible] अधिक भयंकर आहे [illegible] नाकबूल करतां या[illegible] सबंध शतकांत [illegible] मेलेल्यांची संख्या [illegible] १७४३ पासून [illegible] पर्यंत १०७ वर्षांत नुसत्या हिंदुस्थानांत दुष्काळाचे पायीं चाळीस लक्ष मेल्याची नोंद आढळते. लॉर्ड कर्झन साहेबांच्या कारकीर्दींत १८९९-१९०० सालीं पडलेल्या एका दुष्काळांतच बारा लक्ष प्राणहानि झाली असें सरकारी रिपोर्टांत ह्मटलें आहे. हिंदुस्थानांत इतके वारंवार व इतकी भयंकर प्राणहानि करणारे दुष्काळ आजपर्यंत पडत आले असतां दयाळू इंग्रज सरकारच्या हातून त्यांच्या निवारणाचे रामबाण उपाय व्हावे तितके झाले नाहींत. हे उपाय ह्मणजे तलाव, विहिरी, कालवे वगैरे बांधणें, धान्याची परदेशास निर्गत होऊं न देणें, दुष्काळाच्या वेळीं रेलवेनें धान्य व गवत त्वेनें वाहून नेणें हे होत. या तिन्ही बाबतींत सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांत आजपर्यंत थोडीफार शिथिलताच होत गेली आहे असें दिसून येईल. इरिगेशनच्या प्रीत्यर्थ दरसाल बजेटांत जेवढी रक्कम मंजूर होई तेवढी बहुधा कोणत्याच वर्षीं खर्चीं पडत नसे असें वर्षानुवर्ष चाललें होतें. अलीकडे पांचचार वर्षांत मात्र या बाबतींत प्रशंसनीय परिवर्तन घडलें असून सरकारनें कित्येक जंगी इरिगेशनचीं कामें हातीं घेतलीं आहेत व या कामांनीं देशांत जेव्हां सुबत्ता होईल तेव्हां हिंदुस्थानची गरीब प्रजा सरकारास दुवा देत राहील. पण सरकारचे डोळे या बाबतींत फार उशीरा उघडले ही गोष्ट कोणालाही नाकबूल करतां यावयाची नाहीं. दुसरा उपाय परदेशास होणाऱ्या धान्याच्या निकासास प्रतिबंध हा होय. सरकारनें खुल्या व्यापाराचें धोरण पतकरलें असल्यामुळें या बाबतींत तें कांहीं एक करूं शकत नाहीं. हें उघड आहे. पण जें धोरण हिंदुस्थानाला धडधडीत अहिताचें आहे तें सरकारानें कां स्वीकारावें? हा प्रश्न फार मोठा असल्यामुळें त्याचा विचार येथें करतां येत नाहीं. तिसरा उपाय ह्मणजे धान्य, व [illegible] वाहून नेण्याचे कामीं होणारा आगगाडीचा उपयोग. हिंदुस्थानांत आगगाड्यांचा विस्तार करण्याकडे दरसाल कोट्यवधि रुपये खर्च होतात. इरिगेशनपेक्षांही आगगाड्यांचा विस्तार करण्याकडे सरकारचें लक्ष अधिक असतें. याचें मुख्य कारण असें सांगण्यांत येतें कीं दुष्काळाचे वेळीं आगगाड्यांचा मोठा उपयोग होण्यासारखा असल्यामुळें त्यावर कितीही मोठा खर्च केला तरी तो भूतदयेच्या व न्यायाच्या दृष्टीनें रास्तच ह्मटला पाहिजे. तात्विकदृष्ट्या हें ह्मणणें बरोबर आहे. पण सरकारी अधिकारी ह्मणतात त्याप्रमाणें दुष्काळाचे प्रसंगीं या आगगाड्यांचा व्हावा तितका उपयोग होतो काय? असा प्रश्न केला तर 'नाहीं' असें उत्तर देणें भाग आहे. गतवर्षींच्या गुजराथेंतल्या दुष्काळाचे वेळीं धान्य व वैरण यांची इतर प्रांतांतून टंचाई नसतां नुसत्या रेलवेकंपन्याजवळ पुरेसे डबे नसल्यामुळें गुरांची भयंकर प्राणहानि झाली दुसऱ्या प्रांतांत स्टेशनवर गवताच्या गंजी येऊन पडल्या आहेत आणि इकडे गुजराथेंतलीं जनावरें वैरणीवांचून मरत आहेत. ज्या रेलवेसाठीं सरकार इतके दिवस उदारपणानें खर्च करीत आहे त्या दुष्काळनिवारणाच्या उद्देशानें बांधलेल्या रेलवेंची अशी स्थिति कां असावी? रेलवेकंपन्यांनीं फर्स्टक्लास प्यासेंजरांसाठीं ऐशआरामाचे डबे करण्यांत ते पैसे वाजवीपेक्षां खर्च केले, कां नुसती रस्त्यांची लांबी वाढविण्याकडे अधिक पैसे खर्च झाले? दुष्काळ अनिवार्य आहे असें दृष्टीस पडतांच पुरेसे मालाचे डबे बांधण्याची तत्परता कंपन्यांनीं कां दाखविली नाहीं वगैरे कित्येक प्रश्न रेलवे बोर्डाच्या अधिकाऱ्यांना वाजवी रीतीनें विचारतां येण्यासारखे आहेत. हिंदुस्थानांतल्या दुष्काळांच्या इतिहासापासून जर सरकारानें कांहीं धडा घेण्यासारखा असेल तर तो या तीन बाबतींतच आहे. पैकीं इरिगेशनचीं कामें वाढविण्याकडे सरकारचें लक्ष अधिक लागलेंच आहे. बाकीच्या दोन गोष्टींतही असेंच मन घालून सरकार आपली चूक सुधारील तर यापुढें तरी दुर्दैवानें दुष्काळ पडल्यास निष्कारण गुराढोरांचे व मनुष्यप्राण्यांचे हाल व्हावयाचे नाहींत.

दुष्काळांत होणाऱ्या हालांची जबाबदारी सर्वस्वी सरकारी अधिकाऱ्यांचे माथीं मारण्याचा आमचा उद्देश नाहीं. तसें करणें हा अन्याय होईल. सरकाराइतकीच मोठी जबाबदारी लोकांचे पुढाऱ्यांवरही आहे आणि ती ओळखण्याचे बाबतींत सरकाराप्रमाणें लोकांच्याही हातून चुका घडत गेल्या आहेत. त्या झाकून ठेवून सरकारच्या दोषाचें तेवढें आविष्करण करण्याचा आमचा बिलकुल उद्देश नाहीं. पण आज बराच मर्यादातिक्रम झाला असल्यामुळें दुष्काळाच्या विषयाचा हा उत्तरार्ध भविष्यकालासाठीं राखून ठेवणें भाग आहे.

---

## धर्म आणि प्रपंच.

हिंदुस्थानच्या सध्याच्या शोचनीय सांपत्तिक स्थितीबद्दल हिंदूधर्म कितपत जबाबदार धरला जाईल याविषयीं मद्रासच्या एका पत्रकर्त्यानें देशांतल्या प्रमुख विद्वानांचे अभिप्राय मागविले आहेत. अगोदर हा प्रश्नच कां उद्भवावा तें आह्मास कळत नाहीं. कोणताही धर्म घेतला तरी तो सरळ नीतीच्या मार्गानें संपत्ति मिळविण्याच्या व सांपत्तिक उन्नतीच्या आड येत नाहीं. जग हें मिथ्या आहे असें ह्मणणारा शंकराचार्यांचा वेदांत सुद्धां तूं हा प्रपंच टाकून दे आणि देवाच्या भजनीं लाग असें ह्मणत नाहीं. जगाचा पसारा मिथ्या अस[illegible]री त्यांतच तुला राहवयाचें आहे हें तूं विसरूं नकोस. येवढेंच कीं त्यांतच आसक्त होऊन न राहतां तुझें मूळ राहण्याचें ठिकाण जें परब्रह्म त्याचा विसर तुला पडूं देऊं नकोस असें वेदांती ह्मणतात. आमच्या साधुसंतांनीं सुद्धा हाच उपदेश केला आहे. 'आधीं प्रपंच करावा नेटका। कधीं न दिसावा फाटका' ही समर्थांची उक्ति प्रसिद्धच आहे. यांतला प्रपंच हा शब्द सांपत्तिक उन्नति याच अर्थाचा आहे. प्रपंच करूं नकोस असें आमचा धर्म सांगत नाहीं. तर करशील तो नीटनेटका कर, भलत्या सलत्या मार्गानें करूं नकोस, अनीतीनें व अन्यायानें धनसंचय करूं नकोस असा त्याचा उपदेश आहे. आमच्या लोकांचें लक्ष वेदांताकडे वळल्यापासून सांपत्तिक स्थितीकडे त्यांचें दुर्लक्ष झालें असा आरोप कित्येक करीत असतात. पण हा आरोप करणारे खरा व्यावहारिक वेदांत व खोटा बेगडी वेदांत यांच्यांतला भेद लक्षांत आणीत नाहींत. खरा वेदांत सरळ व्यवहाराच्या आड कधीं येत नाहींत खोटा बेगडी वेदांत हा मात्र वेदांत या नांवाला बट्टा आणणारा आहे आणि तो आमच्या सांपत्तिक उन्नतीच्या आड येतो असें कदाचित् ह्मणतां येईल. असो हा प्रश्न उद्भवण्याचें वस्तुतः आज कांहीं कारण नव्हतें तथापि तो उद्भवला आहे, त्या अर्थीं त्या संबंधानें प्रमुख विद्वानांचे अभिप्राय वाचण्यास मिळतील हाच आपण लाभ समजूं. आतांपर्यंत कलकत्ता हायकोर्टाचे माजी जज्ज व कलकत्ता युनिव्हर्सिटीचे माजी व्हाइस–चान्सेलर सर गुरुदास बॅनर्जी व मद्रास हायकोर्टचे जज्ज ना. दिवाण बहादूर जस्टिस सदाशिव आयर या दोघांचेंच अभिप्राय प्रसिद्ध झाले आहेत, आणि दोन्हीही वाचण्या लायक आहेत. डा० सर गुरुदास बॅनरजी हे धर्ममतांत अत्यंत कडकडीत जुन्या पंथाचे आहेत हें सर्वांना ठाऊकच आहे. त्यांच्या मतें आमच्या लोकांत सांपत्तिक उन्नतीसंबंधानें जें औदासिन्य शिरलें आहे तें धर्मामुळें नसून सृष्टिदेवतेनें कृपाळु होऊन हिंदुस्थानाला सुपीक जमीन, विपुल पाणी, उत्कृष्ट निरोगी हवा आणि अनुकूळ ऋतुमान हीं दिली त्यामुळें थोड्या श्रमांत पोटास लागणाऱ्या वस्तु मिळत गेल्यानें बाकीचा वेळ व लक्ष ऐहिक विषयांहून श्रेष्ठ अशा पारमार्थिक कल्याणाकडे लावणें हा कर्तव्याचा एक मुख्य होऊन बसला आणि त्यामुळें हिंदुस्थानची सांपत्तिक अवनति होत गेली असें डा. सर गुरुदास यांचें ह्मणणें आहे. मि. जास्टिस आयर यांचे असें मत आहे कीं खरी धार्मिकता व सांपत्तिक उन्नति यांच्यामध्यें विरोध असण्याचें कारण नाहीं. आमच्या देशात खरी धार्मिकता जेव्हां वास करीत होती तेव्हां हिंदुस्थानसारखा संपन्न देश पृथ्वीच्या पाठीवर कोणताही नव्हता. पण पुढें खऱ्या धार्मिकतेचा लोप होऊन तिची जागा दांभिकता, अंधश्रद्धा, ढोंग, आणि ब्राह्मणांचें बंड यांनीं पटकावल्यापासून आणि धर्माच्या नांवाखालीं ऐहिक बडेजावाची पूजा होऊं लागल्यापासून सांपत्तिक स्थिति खालावत गेली. आमचा धर्म आमच्या अवनतीला कारण झाला आहे ही ओरड साफ चुकीची आहे. आमच्या धर्मानें आह्मांला बुडाविलें नसून आमच्या अधार्मिकतेमुळें मात्र आमची हानि आहे. आह्मी आपली सात्विकवृत्ति सोडून तामसीवृत्ति धरली, धर्म सोडला, नीति सोडली, आणि स्वार्थसाधु, भोंदु, ठक बनलों, त्याचा हा परिणाम आहे. आमचा खरा हिंदुधर्म केवळ पारलौकिक आहे असें नाहीं. तर इहलोकच्या व्यवहारालाही तो तितकाच लागू आहे. पण प्रपंच आणि धर्म यांच्यांत ३६ चा आंकडा आहे. ज्याला प्रपंच करावयाचा असेल त्यानें धर्म गुंडाळून ठेविला पाहिजे, किंवा धर्म पाळावयाचा असेल त्यानें अंगाला राख लावून प्रपंचाचा त्याग केला पाहिजे अशी जी भ्रामक समजूत अलीकडे लोकांत पसरली त्यामुळें आमची

रोजीं दिला असून ता० २३।९।१२ रोजीं त्या तारखेस त्यानें सकाळीं हजर व्हावें. रची ता०

नीतिमत्ता बिघडली, शील नाहींसें झालें, उद्योगाविषयीं पराङ्मुखता आली, आमच्यांतला उत्साह व धाडस हीं नष्ट झालीं, आणि याचेंच फळ सांप्रतची सांपत्तिक अवनति हें आहे. या प्रश्नासंबंधानें आणखी कांहीं विद्वानांचे अभिप्राय लवकरच प्रसिद्ध व्हावयाचे आहेत. ते प्रसिद्ध झाल्यावर पुनः एकदां या विषयाकडे वळूं.

## अफुचें व्यसन.

ज्या हिंदुस्थानसरकारानें भूतदयेनें प्रेरित होऊन चीन देशांतच्या लोकांचें अफूचें व्यसन निर्मूल करण्याकरितां स्वतःच्या लाखों रुपयांच्या वार्षिक उत्पन्नावर पाणी सोडलें तें सरकार स्वतःच्या प्रजेतलें तें व्यसन घालविण्याचे कामीं उदासीन राहील हें संभवनीय नाहीं. असें असतां आजपर्यंत या दिशेनें सरकारचे प्रयत्न विशेष दृग्गोचर झाले नाहींत याचें कारण हिंदुस्थानांत अफूबाजाची संख्या फारच अल्प आहे हें कदाचित् असेल पण या अल्पसंख्येची सुद्धां या व्यसनाच्या पायीं हानि होऊं देणें इष्ट नाहीं असें समजून हिंदुस्थानसरकारनें अफूच्या संबंधांत अधिक कडक निर्बंध नुकतेच केले आहेत. व या निर्बंधाचे जाहिरनामे सर्व देशी भाषांत छापवून सर्व प्रांतांतून वाटले आहेत. लोकांना अमुक एक व्यसन तुम्ही करूं नका, केल्यास दंड होईल असें अधिकाराच्या जोरावर सांगण्यापेक्षां त्या व्यसनाच्या पायीं शरिराचा, पैशाचा, नीतिमत्तेचा, व कालाचा कसा नाश होतो हें समजावून सांगण्याचे प्रयत्न होतील तर त्याचा परिणाम लोकांच्या मनावर अधिक चांगला होईल. प्लेगच्या दिवसांत प्लेगपासून किंवा कॉलरा, मलेरिया वगैरे रोगांपासून कशी हानि होते हें लोकांस समजावून सांगण्यासाठीं सरकारनें अशा प्रकारचीं पत्रकें निरनिराळ्या देशी भाषांत काढलीं होतीं. अफू किंवा दारू यांच्या व्यसनापासून होणारे दुष्परिणाम अशाच रीतीनें लोकांच्या नजरेस आणण्याचे प्रयत्न होतील तर प्रजेची नीतिमत्ता वाढविण्याचा सरकारचा स्तुत्य हेतु अधिक फलद्रूप होईल. अबकारी खात्याचे अधिकारी सरकारी नियमांचें उल्लंघन लोकांच्या हातून कोठें घडतें कीं काय तें पाहण्यासाठीं दारूचे गुत्ते, व चंडोलखानें वगैरे ठिकाणीं हिंडत असतात व तेथें त्या त्या व्यसनापासून घडणारे अनर्थ त्यांच्या रोजच्या पाहण्यांतले असतात. या खात्यांतल्या एखाद्या अनुभविक व हुषार अधिकाऱ्याकडून त्या अनर्थांचीं वर्णनें चटकदार भाषेनें लिहवून व तीं चित्ताकर्षक करण्यासाठीं चित्रें वगैरे घालून सर्कशीच्या जाहिरातीसारखे मोठाले जाहिरनामे प्रसिद्ध चवाठ्याचे ठिकाणीं लाविले, व देशी भाषांत पत्रकें लिहवून त्यांचा सर्वत्र प्रसार केला तर या व्यसनांना लवकर आळा घालतां येईल. कोकेन, जुगार, इ० इतर व्यसनांचे संबंधांतही हा उपाय अवश्य करून पाहण्यासारखा आहे मद्यपान निषेधक मंडळ्या व दुसऱ्या सन्मार्ग प्रवर्तक संस्था यांनीं सरकारास ही सूचना करून तिच्या सिद्धयर्थ आपली सहकारिता देण्यास तयार व्हावें अशी आमची सूचना आहे.

## यदाच्या कांग्रेसचे अध्यक्ष.

येत्या दिसेंबरांत पाटणा येथें भरणाऱ्या कांग्रेसचें अध्यक्षस्थान कोणास द्यावें याविषयीं वर्तमानपत्रांतून व कांग्रेस कमिट्यांतून आज बरेच दिवस चर्चा चालू आहे व बहुतेक प्रांतिक कमिट्यानीं ना० रा० ब० मुधोळकर यांचें नांव सुचविल्यावर बहार प्रांतांतल्या कांग्रेस कमिटीनें बहुमतास मान देऊन नामदारांचीच निवडणूक मुक्काम्यानें मान्य करणें रास्त आहे. पण जो वाजंत्र्याची बिदागी देतो त्याला तूं अमकाच राग वाजव असें सांगण्याचाही हक्क असतो अशा अर्थाची इंग्रजींत म्हण आहे या म्हणी प्रमाणें बहार प्रांताची कमिटी ना० गोखले यांचीच निवड व्हावी असा हट्ट धरून बसली आहे. अशा प्रसंगीं ऑल इंडिया कांग्रेस कमिटीकडे अखेरचा निर्णय नियमांनीं सोपविला आहे व त्याप्रमाणें हें प्रकरण त्या कमिटीकडे जाईल. पण इतक्या थराला गोष्ट जाऊं देणें कोणत्याही तऱ्हेनें इष्ट नाहीं. ना० रा० ब० मुधोळकरांचें विरुद्ध बहार कमिटीनें जाण्याला विशेष कांहीं कारण असेल असें आह्मास वाटत नाहीं. ना० रा० ब० मुधोळकरांची विद्वत्ता, स्वार्थनिरपेक्षता, देशकार्याविषयींची कळकळ कर्तृत्व, इ० कोणतेही गुण आजपर्यंतच्या कांग्रेसच्या अध्यक्षांच्या अंगच्या गुणाहून न्यून नाहींत. असें असतां बहुमतानें त्यांची निवड झाली असतां त्यांना बाजूस सारून ना. मि. गोखले यांचें नांव पुढें करणें म्हणजे एक तऱ्हेनें तो ना. रा. ब. मुधोळकरांचा अपमान आहे. बहार कमिटीचें हें वर्तन अत्यंत गर्हणीय आहे व अशा स्थितींत ना. मि. गोखले हे अध्यक्षस्थान स्वीकारण्यास कबूल होतील असें आह्मांस वाटत नाहीं. बरें, ऑल इंडिया कांग्रेस कमिटीनें पुनः ना. रा. ब. मुधोळकरांचीच निवड पसंत केली, तर त्यांच्या घरीं पाहुणे म्हणून जावयाचें त्या यजमानांचें आपल्याविषयींचें मत प्रतिकूळ आहे असें कळल्यावर त्यांच्या निमंत्रणाला ना. रावबहादुर साहेब जरी कितीशी मान्यता देतील हा प्रश्न आहे. म्हणजे ना. मि. गोखलेही नाहींत. आणि ना. रा. ब. मुधोळकरही नाहींत, तिसराच कोणी मनुष्य आयतेवेळीं उभा करून कार्यभाग उरकून घ्यावा लागेल. यासाठीं आमची बहारप्रांतस्थ कमिटीस अशी सूचना आहे कीं त्यांनीं आपला दुराग्रह सोडून ऑल इंडिया कांग्रेस कमिटीकडे न जातां स्वतःच बहुमताला अनुसरून ना. रा. ब. मुधोळकरांची अध्यक्षाचे स्थानासाठीं निवडणूक करावी.

## कल्पलता

श्रीमती कुमारी नागुताई जोशी या गेल्या बुधवारापासून ४ दिवस आकोल्यास होत्या. त्यांच्या आगमनानें जो तो स्त्री प्रमुदित होती आणि सर्वच स्त्रीसमुदाय आपापल्या परीनें त्यांचा धन्यवाद गाण्यांत अगदीं तल्लीन व आनंदमग्न होता. जाहिरसभा खाजगी पानसुपाऱ्या, मेजवान्या इत्यादिकांची गर्दी उसळली होती. सौ० लक्ष्मीबाई सरंजामे, राधाबाई चिपळूणकर कमळाबाई भागवत, तसेंच श्री. मनुताई बापट, द्वारकाबाई वैद्य, दुर्गाबाई जोशी इत्यादि पुष्कळश बायानीं निरनिराळ्या प्रकारें गुणानुवाद गायले, कोणी निबंध वाचले, पद्यें म्हटलीं आणि कोणी आईबापांची स्तुती केली तर कोणी डाक्टर नागुताई यांच्या विलक्षण धैर्याची, सौजन्याची व विद्यासंपन्नतेची बहारिनें तारीफ केली.

डाक्टर नागुताई या स्त्री समाजाला कल्पलतेसारख्या वाटतात. त्यांच्या उदाहरणानें स्त्रियांच्या महात्वाकांक्षा अपरंपार वाढल्या आहेत. सुकृतीची व श्रेष्ठ ध्येयाची डाक्टर नागुताई या सन्मूर्तीच वाटतात. यांचो पुढील कार्यमाला म्हणजे स्त्रियांचें आरोग्य, प्रसूतिसौख्य, इत्यादि गोष्टी होत; तेव्हां त्यांच्या सत्कृतीचें क्षेत्र मुंबई वगैरे कडील भाग होतील तथापि या पारिजातकाचीं फुलें वऱ्हाडास अगोदर लाभतील अशा आशयाचा एका व्यक्तीनें उद्गारही काढून दाखविला. विद्यार्जन करून परद्वीपाहून आलेल्या डाक्टर नागुताई यांच्या पंक्तीचा लाभ घेणारी प्रत्येक स्त्री स्वतांस पावन समजत असे. विद्यार्जनाचा महिमा तीर्थोदक, वन्हि व पावन पुरुष यांच्या स्वयंसिद्ध पावनक्रियेप्रमाणें आहे.

## वऱ्हाड वृत्त.

हवामान—— पीकें आनंदानें डुल्त आहेत. पण या जीवनाच्या आंदोलनाला नवा जोम व शक्ति आणणारी पर्जन्याची अमृतवृष्टी पाहिजे आहे. पर्जन्याचे पाश्चिम वारे जलद मेघांस समीप समीप आणीत आहेत असें हवेच्या दाबावरून दिसून येतें. पूर्वा नक्षत्राहून उत्तरा नक्षत्राकडे संक्रमण हो. ण्याच्या या संधीला पाऊस पडण्याचा रंग असतो. कांहीं कांहीं गांवीं हवेवा उद्रा अजून जोराचा आहे तथापि गोळावेरजेनें सार्वजनिक आरोग्य समाधानकारकच दिसतें.

मेजर ब्लैडन साहेब डिपुटी कमिशनर हे वार्षिक तपासणी निमित्त वाशिमास गेले असून एकदोन दिवसांत परत येतील.

गोकुळाष्टमी——लहान विद्यार्थ्यांना नीतीशिक्षण देण्यासंबंधानें रा. रा. रामचंद्र विष्णु महाजनी हे दर शुक्रवारीं गेल्या गोकुळाष्टमी पासून प्राथमिक शाळामधून एक घंटा शिक्षकाचा उद्योग करीत असतात. त्या प्रयत्नाचा वार्षिकोत्सव येथील सरकारी बगीच्यांत गेल्या गुरुवारीं मोठ्या थाटानें करण्यांत आला. बरेच सद्गृहस्थ जमले असून मराठी ४ थ्या इयत्तेंतील सुमारें १५० विद्यार्थी जमले होते. कृष्णाची वनक्रीडा हा धडा हेडमास्तर रा. रा. बळीरामपंत यांनीं शिकविल्यावर अध्यक्ष रावबहादूर विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं नेहमी प्रमाणें सुंदर उपदेश केला आणि डिपुटी इनस्पेक्टर जोग यांनीं अशा प्रयत्नाचा गौरव करून मुलांस खाऊ दिला आणि हा दिवस या प्रमाणें मुलांना गेला !

रा. रा. नारायण रामचंद्र धबाब डिपुटी क्लार्क आफ कोर्ट निसबत डिपुटी कमिशनर आकोला यांस जलोदराच्या रोगानें नागपुरास देवाज्ञा झाली हें कळविण्यास फार दुःख वाटतें. राजश्री नारायणराव यांच्या मृत्यूसंबंधानें मेजर ब्लैडन साहेबांनीं यांनीं सहानुभूतीचे फार प्रेमळ उद्गार काढले असून त्यांच्या स्मरणार्थ म्हणून गेल्या शुक्रवारीं येथील कचेऱ्या बंद ठेवण्यांत आल्या होत्या. मृताविषयीं एवढा सन्मान व आदरभाव व्यक्त करण्या सारखा हा मनाचा थोरपणा सर्वांच्या ध्यानांत राहील.

## नोटिशीचें उत्तर.

नोटीस बेशर्मी [illegible] नारायण माळी आडनांव ज्ञा ! रा० जामठी बु॥ ता० मुर्तिजापूर,

यांस:–

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, तुम्ही आह्मांस सुदर्शन पत्रांतून तारीख १४ [illegible] १२ च्या अंकांत नोटीस दिली. त्यांत असें लिहिलें कीं, ३८॥–। मजजवळ धरवर ठेवलें नाहींत परंतु आह्मी तुमचे जवळ रुपये धरवर दिले याबद्दल साक्षीदार आमचेपाशी आहेत. दुसरें आपण उभयतानीं लक्ष्मणराव पाटील यांचे जवळून ५५ रुपयांस १ वर्षाच्या पठ्यानें शेत वहितीस घेऊन त्यांत आपला अर्धा हिस्सा पोट भागिनीचा होता. तें सर्व खोटे आहे. कारण मी फक्त गंगाबाई जवजे अच्युतराव देशमूख यांचे मालकीचे स. नं. १८७ जामठी येथील शेत साहा वर्षाच्या पठ्यानें दरसाल ५५ रुपयास केले आहे. त्याप्रमाणें १ वर्ष मी उपभोग घेऊन शेत साराही १६=॥। लक्ष्मणराव जवळ दिला आहे. व त्या शेतांत तुमचा मुळीच हिस्सा वगैरे नाहीं. नोटिशींत आपण असें लिहिले कीं, लक्ष्मणराव जवळून ५५ रुपयास शेत १ वर्षाचें पठ्यानें केलें त्यावेळेस मी हजर होतो परंतु लक्ष्मणराव जवळून मी जर शेत पठ्यानें केलें नाहीं तर तुमचा तेथें हजर राहण्याचा संबंध काय ? करितां नोटीशीनें कळविण्यांत येते कीं, ८ दिवसाचें आत आह्मी आपलें जवळ गंगाबाईला देण्याकरितां धरवर ठेवलेले ३८॥–। परत आणून द्यावे. व आमची रसीद घ्यावी, वरील मुदतींत आपण पैसे आणून न दिल्यास कोर्ट मार्फत तजविज करून कोर्टखर्च व नोटिशीचें खर्चासह रकम भरून घेतली जाईल. कळावें तारीख २।९।१२ इ.

सही

भगवान वा राघोजी वानखेडे
रा. जामठी बु॥ ता. मुर्तिजापूर नि. खुद्द हातचा
नें. नं. ४७६ आंगठा.

बादशाही याकुती " बनविण्याचा हक्क प्रसिद्ध डॉक्टर चांदलीआ ह्यानांच आहे.

## नामर्दाईवर "बादशाही याकुती"

आमच्या खऱ्या "बादशाही याकुतीचा" सरकारी रजिस्टर नंबर २२० आहे. ह्याच याकुतीनें सर्व प्रकारचे धातु विकार दूर होऊन नपुंसकत्वपणाचा पूर्णपणें नाश हातो व हमेश टिकेल अशी युवावस्था प्राप्त होते. हेंच औषध हिंदुस्थान युरोप व आफ्रिकेंत प्रसिद्ध आहे. किंमत रुपये १०.

**कमजोरीवर** "पुरुषार्थ लेप" गुप्त अंगाची कमजोरीचा नाश करून पुर्णे तरतरी आणणारा प्रख्यात गुणकारी लेप. किंमत २५ रु.

## पूपरम्यावर वस्ताद प्रमेहांतक.

लघ्वीची आग, पू, ठणके हटकून बंद करणारा जगप्रसिद्ध "प्रमेहांतक" किंमत रुपये २ रोग बरा करूं इच्छिणाऱ्यांनीं हेंच औषध घ्यावें.

जास्त माहितीसाठीं क्याटलॉग मागवा.

**पत्ता--चादलीआ कंपनी** काळबादेवी रोड पोपटवाडी मुंबई.

ना० नं० ३३१



## तुमची निराशा दूर करण्या करिता

= डॉ. आर, एम, युनानी यांचे औषध =

फारच अकसीर आणि यशस्वी झाले आहे. **करितां--खात्री--करा**

**शक्तिच्या गोळ्या**— ह्या गोळ्या इतक्या रामबाण आहेत कीं यानें नष्ट झालेली शक्ति व पुरुषत्व चमत्कारीक रितीनें परत येते. नष्ट झालेली स्मरणशक्ति प्राप्त होते. व मेंदू पुष्ट होतो. झोंप न येणें, भूक न लागणें आणि धातुसंबंधी प्रत्येक रोग नाहिसा करून ह्या गोळ्या मनुष्यास सशक्त करतात ह्या गोळ्यांचा असा खास गुण आहे. ह्मणून ह्या गोळ्या स्त्रीपुरुष दोघांस्ही उपयोगी आहे.

बाटली १ ची किंमत रु० १

**परम्यावर अकसीर औषध**— वाटेल तसा पुष्कळ दिवसांचा जूना परमा असला तरी पण ह्या औषधाच्या सेवनाने मात्र तीन दिवसांत बरा होईल एक भाग पितांच वाटेल तशी आग, व तिडक बंद होईल व पू वाहणें बंद होईल असा ह्या औषधाचा चमत्कारीक गुण आहे. याचे सेवन केल्यानें आपले जीवास सुख होईल व द्रव्याचा व्यय होणें थांबेल.

बाटली १ ची किंमत रु० १

**केस काळे करण्याचा सुगंधी कलप**— ह्या कलपानें तारुण्यात पांढरे झालेले केस काळे होतात व तेजस्वि आणि रेशमासारखे मऊ होतात. केसास लावल्यान दुसऱ्या कलपासारखी घाण येत नाहीं. परंतु सुगंधवास येतो. याच्या अशा गुणामुळें हजारो हौशी लोक याचा उपयोग करित आहेत. तंरी आपणही याचा उपयोग करण्यास चुकु नये.

बाटली १ चा किंमत ६ आणे

प्रत्येक औषधाचा पोष्ट खर्च निराळा पडेल,

डा० रहेमतुला सुलेमानजी
हबीब बिलडींग कारनर ग्रांटरोड — मुबई

नो० नं० ४१६


## जाहिर नोटीस

त्रि० सबजज्ज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टांत:—

सक्सेशन सर्टीफिकेट नं० १७ सन १९१२

सक्सेशन सर्टिफिकेट मिळविण्याचा अर्ज—

अर्जदार

१ जानकाई मर्द कृष्णाजी वानखेड
२ गिरजाई मर्द कृष्णाजी वानखेड
राहणार देऊळगाव ता० बाळापूर

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानीं सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याचा अर्ज आमच्या कोर्टांत तारीख ६-८-१२ रोजीं दिला असून त्याची चौकशीची तारीख २३।९।१२ रोजीं नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानें सकाळीं १० वाजतां आमचें कोर्टांत हजर व्हावें. तसे न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० ३-९-१९१२ इसवी.

सही

JANKIPRASAD.

सबजज्ज आकोला.

नो० नं० ४७७


## कां तुह्माला तरुण होणें आवडते का?

पांढरे केस काळे करण्याकरितां अगदीं नविन शोध
वेद कंपनीनें तयार केलेले
हेअर गोअर (साल्युशन)

१५ दिवस लावल्यानें वाटेल तसे पांढरे केस काळे होतात व डोक्यांतील टकलीस केस उगवतात. पांढरे केस काळे झाल्यानंतर पुन: पांढरे होत नाहीं. आणि तुमची अडचण दूर होईल.

मग पहा, तुह्मी कसे देखणे दिसता!

हे तेल त्याच्या बहुगुणांमूळें घरोघरीं वापरतात. कारण कीं ह्यानें डोकें शांत होतें व केस रेशमासारखे मऊ होऊन तेजस्वी होतात, गुणाची जास्त खात्री पाहिजे असल्यास वापरून खात्री करा, बाटलीची किं० रु. २

**पत्ता:**— वेद कंपनी आफीस खांडबाजार मुंबई.

नो० नं० ४१७



# जाहीरात.

!!! डाक्टर जी. बी. याची सुवासिक औषधी तपकीर !!!

!! मागवा व खात्री करून घ्या !!

ह्या तपकीरीचा शेंकडों लोकांनीं अनुभव घेऊन सर्टिफिकीटें दिलीं आहेत शिवाय वैद्य व डाक्टर लोकांचीं या तपकीरीच्या स्वच्छते बद्दल व गुणाबद्दल अनुकूल मतें आह्माकडे आलेली आहेत. ही तपकीर पिनस. अर्धाशिशी, डोके दुखणें व डोक्यांतील मेंदुचे इतर सर्व रोग तसेंच पडसें वगैरे विकारांवर फार वस्ताद आहे. ही ओढल्यानें मेंदुतील दूषित धातु पातळ होऊन नेत्रद्वारें व नाकांतून बाहेर निघून जाते व मस्तकांतील मेंदु स्वच्छ होऊन बुद्धी व ज्ञान तीव्र व वृद्धिंग होतात. मज्जेसंबंधीं रोग दूर करणारें या सारखें सुलभ साधन दुसरें नाहीं. साधी तपकीर दहा वीस वेळ ओढून जो उपयोग होतो तो गूण आमची ही सुवासिक तपकीर फक्त दोन तीन वेळ ओढल्यानें करते. एक पैशाच्या साध्या तपकीरींत आमच्या सुवासिक तपकिरीच्या दोन चिमटी मिळविल्या असतां सर्व तपकीर सुगंधी होते. शेंकडो लोक ही तपकीर आपल्या कुटुंबात नित्य लागणाऱ्या औषधांप्रमाणें संग्रही ठेवतात साध्या तपकीरी प्रमाणें ह्या आमच्या तपकीरींतील सुवास व तीव्रता एकदोन दिवसांत नष्ट होत नाहींत. हे गूण आमच्या तपकीरींत एक वर्षेपर्यंत कायम रहातात ही तपकीर आह्मी मोठ्या श्रमानें व वैद्यलोकांच्या सहायानें तयार करविली आहे एक वेळ अनुभव घेऊन खात्री करून घ्यावी. एक आण्याचीं तिकीटें पाठविलें असतां नमुन्याची बाटली पाठवूं. सर्वांस घेण्यास सुलभ पडावी ह्मणून हिची किंमत आह्मी फायद्याकडे न पहातां फारच माफक ठेविली आहे.


REGISTERED TRADE MARK.

एक बाटलीस ४ आणे व बंगी टपाल व व्ही. पी. खर्च ३ आणे
डजन बाटल्यास रु. २-८ " " " ६ आणे

[सूचना] पत्र लिहिणारांनीं इंग्रजींत अथवा बालबोध लिहींत आमचेवर दया करून लिहीणें कळावें. तपकीर मिळण्याचे ठिकाण:—

गुरुबसवा आणि कंपनी,
सावकार पेठ सांगली

नो नं. ३०७

# एकाच वस्तूपासून तीन देणग्या

## सौंदर्य

आरोग्य

थोडा खर्च

**जेव्हा तुमचें रक्त दूषित होतें तेव्हां ह्या तिन्ही सुखाना मुकावें लागतें.**

रक्तदोषापासून पुष्कळ प्रकारंचे घाणेरे भयंकर रोग होतातः—काळे डाग, संधिवात वशांतव्रण, पीनस, नाकसडणें, रक्तपिती, सर्वांगठणकणें, सुनभेरी मेहरी, बद, फोड, चट्टे, ··गाची आग, तोंडाला दुर्गंध, अजीर्ण, कंडू व कडकीपासून इतर रोग.

**तर स्वतःचाच राजवैद्य बनून**

रोग नष्ट करणें बरें नव्हें काय ?

डा. गोखले एम्. ए. एम्. डी यांच्या प्रख्यात—

## आयोडाईझड सार्सापरीलानें

**ते निखालस बरे होतात.**

फक्त उत्तम वनस्पतींचा बनविलेला आयोडाईझड.

——अनुभवतरपहा. ——

किं. १ रु. पो. ख. ०४ आ. उत्तमगुणास, ४ बाटल्यांची पो. ख. सह किं. ४ रु.

**बालामृत हें काय आहे ?**

—— **अस्सल बालामृत हें** ——

**मुलाना आरोग्य देणारें आहे तें पुढील रोगावर अमोलिक उपाय आहे**

क्षय, खोकला, दम, अपचन, मोठें पोट, काड्यांसारखीं हाडें, ओकारी, शौचाला घाण, वाईट दुधानें होणारें रोग, कंडू, आंकडी वगैरे. डा० गोखले एम्. ए. एम्. डी यांनीं पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें प्रथम तयार केलेलें. इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला ! रंगीत साखरेचे पाक पाजून नसते रोग मुलांना विकत घेऊ नका.

कि. ०१२ आणें पो. ख. ०४ पूर्ण गुणास ३ बाटल्यांची किं. पो. ख. सह २८९

**पत्ताः-- हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल माधवबाग मुंबई नं. ४** नं. २८७

## जवानी

**भीमसेनी बळ**

व

**तारुण्यांतील शक्ती गेली असल्यास**

दुसऱ्या औषधाशीं तुलना केल्यास नंबर १ चें

तावडतोब आमच्या १ रुपया किंमतीच्या नामांकित

**शक्तिवर्धक औषधाचा**

**उपयोग करा**

व मग पहा कीं दहा दहा व पन्नास पन्नास रुपये किंमतीच्या याकुतीपासून जास्त फायदा आहे कीं आमच्या रुपया किंमतीच्या औषधापासून जास्त फायदा आहे ? आमचें औषध वापरणारांकडून त्यास त्याच्या गुणाप्रमाणें

## मेलेल्यास जिवंत करणार

हा किताब मिळाला आहे.

आणि तुह्मांस वापरल्यावर खरें तेंच कळून येईल.

हें औषध ज्या वस्तूपासून बनाविलेलें आहे ती वस्तू दुनियेंतील हकिमांचें राजे लुकमानी याच्या औषधांपैकीं एक पहिल्या नंबरचें औषध आहे.

ज्यामुळें तुमची गेलेली शक्ती--तारुण्यांत आलेली दुर्बलता गात्रांची शिथिलता आजारीपणामुळें अंगांतील कमी झालेलें रक्त तुह्मांस प्राप्त होईल.

गरीबांनीं वापरून आह्मांस आशीर्वाद द्यावा ह्मणून ४० गोळ्यांच्या शिशीस किंमत १ च रुपया ठेविली आहे. पोस्टेज वेगळें. लेपाची शिशी पाहिजे असल्यास तिचीही किंमत १ रुपया आहे करिता दुसरें औषध घेण्यापूर्वी ह्या औषधांचा उपयोग करण्यांस चुकू नका.

पांच रुपयांची औषधें घेणारास गोळ्यांच्या २ शिश्या बक्षिस देऊं. दुसऱ्या, ·त्येक जबरदस्त रोगाकारितां आमच्याकडे अस्सल युनानी औषधें मिळतील व ·दल माहिती पत्र आल्यास कळवूं.

एम. ई. हकीम.

सिधपूर, नॉर्थ गुजराथ

---

## धी बॉम्बे टाइल कंपनी

ITALIAN TILES



= आरस पगाण =

जमीनीवर बसविण्याच्या रंगी··· लाद्या दगड आंणि सीमेन्ट विकणार.

आमच्या मालाची खात्री करून घ्या.

उत्तम माल ? ? ?      स्वस्त भाव ? ?

१६७ डंकन रोड मुंबई नंबर ४

---

ठिक ठिकाणी एजंटस् पाहिजेत.

## सन लाइफ अशुअरन्स कंपनी ऑफ कानडा

[ १८६९ ]

इंग्लिश सरकारची सत्ता देखरेख सरकारी हुकुमाशिवाय भांडवल गुंतवता-येत नाही.

**भांडवल तेरा कोटी रुपये.**

पॉलिसीचे नमूने फारच सुधारलेले आहेत.

पालिसी .... .... .... .... .... .... विन अटीच्या.

पॉलिसी .... .... .... .. .... .... बिन तक्रारी.

पॉलिसी .... .... .... .... .... .... विन बुडणारी.

हिंदुस्थानचे मुख्य ऑफिस हार्नबी रोड मुंबई. } रा. श्री मुधोळकर मध्यप्रांताचे वऱ्हाडचे जनरल एजंट आकोला ' प्रांतवऱ्हाड नो. नं. १३

---

## Oriental Govrnment se curi LIFE ASSURANCE COMPANY Limited

ESTABLISHED IN 1874.

R. Paterson, Brown, Manager,

HEAD OFFICE—BOMBAY

**FUNDS Exceed 4 crores**

CLAIMS PAID FOR OVER 3 CRORES
IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is when claims arise, that the amount due under the policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the 'Oriental' keep well before them and act up treating their clients with the utmost liberality.

UNQUESTIONABLE SECURITY.

It is not sufficient to read that a Company's funds amount to a given um, but it is essential to know how such Funds are invested if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in termes of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through deceas of assured lives, and endowment policies matured.

Government Officers, Professional men, Tradesmen and others by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet, if he dies early before he had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which his danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month or less, has left the family without the intended provision.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. For terms please apply to the undersigned.

Prospectuses, forms and any further information can be obtained on application

M. DESOUZA,

CHIEF AGENT, Nagpur

CHIEF AGENCY FOR C. P., BERAR & KHANDESH No. No. 14

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआत्मरांत छापून प्रसिद्ध केलें



नोटीस

··मी राघो वा। नवला··
देउळगांव साकरश··
··· याजला
··ो माळी ह··
··ली या··
··कीं मी तुमची
··मारे ९।६ व··
··रीं नादण्या
··ला रुतु प्राप्त
··मजला तुम··
·२ दोन
··मःरहाण करून
··घरांत येऊ दि··
··र्ष झाले मा··
··तुह्मास समक्ष
··ले परंतु तु··
··. आजपावेतो
··ळे मजला ··
··तीनशे ··
··ली तुह्मास य··
··ांत येत कीं ही··
··वर्षाचे अ··

# …देशी भारत स्टोव्ह



फार टिकाऊ अगदी टिकाऊ

भारत स्टोव्ह (साध्या केरोसीन तेलाच्या चुली) फार टिकाऊ, अगदीं साधे, स्वस्त, घडी होणारे व परदेशी चुलीशीं प्रत्येक बाबतींत टक्कर देणारे असे आहेत. यांत बिघडण्यासारखें कांहीं नाहीं, व सहज दुरुस्त करतां येतात. कित्येक पदकें मिळालीं आहेत.

## भारत स्टोव्हचे ग्यासचे दिवे !!

रचनेंत अगदीं साधे ! या स्टोव्हच्या एका दिव्यानेंच एखाद्या दिवाणखान्यांत "किट्सन"च्या दिव्यासारखा चक्क उजेड पडतो. टिकाऊ असून खर्च कमी !! हा दिवा वापरण्यास मुळींच त्रास पडत नाहीं. नं० ४, ५, ११, १०० किंवा नंबर २३४ च्या प्रायमस स्टोव्हवर अथवा वरची वाटी (बर्नर) बदलल्यास दुसऱ्या कोणच्याही स्टोव्हवर हा बसवितां येतो.

किंमत फक्त अडीच रुपये.

इतर जातीचे सर्व तऱ्हांचे प्रायमस स्टोव्ह व त्यांचें सामान आमचेकडे असून अगदीं माफक भावान पुरविलें जातें. दुरुस्तीचें काम वाखाणण्यासारखें क्याटलॉग फुकट.

बाहरगांवच्या मागण्याकडे ताबडतोब लक्ष दिलें जातें. एक वेळ अनुभव घेऊन पहा.

पत्ता:-- बी. एम्. माढीवाला,
भारत स्टोव्ह डेपो.
मालक व तयार करणार
मोहन बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.

नो० नं० ४५४

## वऱ्हाडात खात्रीची उत्तम नवीन सोय.

## खरे गारेचे थंड चष्मे

आह्मी मुद्दाम वऱ्हाडच्या लोकाकरितां हेंळ तपासून सर्व तऱ्हेच्या फ्रेमीसहित खरे गारेचे थंड चष्मे माफक दरानं विकण्याचे दुकान काढले आहे. मुंबई वगैरे मोठ्या ठिकाणच्या भपक्यावर मंडळी कशी फसतात हें सर्वांना श्रुतच आहे. सर्व गरजूंनी अनुभव घेवून पहावा.

गोपाळ पांडुरंग आणि …
आकोला नो० नं० ४५३

## जाहिर खबर

तमाम लोकांस कळविण्यात येते कीं आमचे चुलते मैयत ओंकारसा धोंडीसा यांस एक मुलगा नामें शंकर हा आहे. हा अज्ञान असून त्याचें संगोपन त्याची मातुश्री नामें भिमाबाई कदे ओंकारसा ही करीत आहे. ओंकारसा व मी एकत्र होतो. व एकत्र असलेल्या इस्टेटींतून चिरंजीव शंकरच्या व माझी चुलती भिमाबाई इच्या उदर निर्वाहाकरिता ओंकारसाच्या वेळेसारखा दरमहा रुपये ५० ओंकारसा मेल्यापासून तारिख ५।७।१२ इ. ह्मणजे अधिक आषाढ वा। ६ पावेतों मी तिला देत गेलों परंतु अलिकडे कांहीं कार्यसाधू व उपद्व्यापी मंडळींच्या सल्यानें माझी चुलती भिमाबाई वागत आहे. व तेव्हां पासून आह्मी पूर्वीप्रमाणें दरमहा रुपये पन्नास देण्यास तयार असतां ती पूर्वीप्रमाणें दरमहा रुपये पन्नास घेण्यास नाकबूल करते. व लोकांपासून कर्ज काढण्याचें विचारांत आहे. तरी सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं या बाईला कर्ज काढण्याचें मुळींच कारण नाहीं. व तिला कर्ज काढण्याचा अधिकारही नाहीं. जो इजला तिचें स्वत:चें नांवानें अगर अज्ञानाचें नांवानें कर्ज देईल त्यानें रकमेची आदाई अज्ञानाचे इस्टेटींतून होणार नाहीं. हें पक्कें समजावें त्यानें स्वत:चे जोखमीवर भिमाबाईशीं वाटेल तर व्यवहार करावा कळावें ही नोटीस ता० १८-८-१२ सही

विश्वनाथ नागोसा सावजी खामगांव.
नो० नं० ४४०

## *NOTICE.*

Two scholarships for the Bombay or Calcutta Veterinary Colleges will be awarded in October next. The course will last 3 years, at the end of which approved students will be eligible for admission into the Provincial Veterinary Service. Candidates must have passed at least the Matriculation Examination, and be of good physique and active habits. For details apply to the Superintendent, Civil veterinary Department, Central Provinces Nagpur.

Nagpur
The 16th August 1912.
Sd. C. E. Low
Director of Agre, & Inds., C. P.

No. No. 445



## हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागलेलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाले यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारे ताटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार ताबडतोब दूर होतात. किं० रु. १।८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम·

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधा विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच एल. बाटलीवाला ज. पी. मु वरळी लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० २७६

## नोटीस

नोटीस बेशमी बंडीसा वल्लद शिवरामसा शेठ माळवी सोनार राहणार अंजनगांव ता० दर्यापूर

यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमच्याशीं माझे लग्न होण्यास अजमास २०।२२ वर्षे झालीं. तेव्हांपासून मी आपलें मामाचे घरीं. ह्मणजे दुरगडा ता० मूर्तिजापूर येथें राहत आहे. माझी तुह्मी मुळींच वास्तपुस्त घेत नाहीं सबब मी लोकांचें कर्ज काढून आजपावेतों. उदरनिर्वाह केला. तरी मला अन्नवस्त्रासाठीं झालेले कर्ज रुपये ५०० ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसांत माझे राहण्याचे गावीं घेऊन यावे व सर्व कर्जाचा निकाल करून मला फारकत द्यावी. तुह्मी अगदीं वाईट चालीचे असल्याकारणानें आता मी तुमचे घरीं राहूं शकत नाहीं वरील मुदतींत माझे अन्नवस्त्रासाठीं झालेले कर्जाचा निकाल न केल्यास व फारकत न दिल्यास ही नोटीस फारकत समजून मी दुसरा घरटाव करीन मग तुमची कांहींएक तक्रार ऐकिली जाणार नाहीं कळावें ता० ३-९-१९१२

सही
मानकी मर्द बंडिसा माळवी
सोनार रा० दुरगडा ता०
मूर्तिजापूर आज मु०
आकोला नि० खुद्द
आंगठा

नो. नं. ४७३

## नोटीस

नोटीस बेशमी राघो वा। नवला… राहणार मौजे देउळगांव साकरश… मेहकर जि० बुलडाणा यांजला … देणार शेंगाई मर्द राघो माळी ह… मौजे उंद्री ता० चिखली या…

नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची बायको असून आज सुमारे ५।६ व… तुह्मी मजला तुमचे घरीं नांदण्या… घेऊन जात नाहीं. मजला ऋतु प्राप्त… वर माझे आईबापानीं मजला तुम… आणून घातले तुह्मी २ दोन … मजला ठेविले मजला मारहाण करून बाहेर काढून देऊन घरांत येऊ दिले… त्याजला आज ५।६ वर्षे झाले मा… ईबापानीं बरेच वेळ तुह्मास समक्ष… घेऊन जाण्याम सांगितले परंतु तुह्मी… ला घेऊन जात नाहीं. आजपावेतो मजला घेऊन नगेल्यामुळे मजला अ… करितां सुमारे ३०० तीनशे … सावकाराचे काढले हाल्लीं तुह्मास या… रीनें कळविण्यांत येते कीं ही पावल्यापासून ८ दिवसाचे आंत तुह्मी मुकामीं येऊन सावकाराचे कर्ज देऊन घेऊन जावे असे तुमचे कडुन न झा… मी हीच फारकती समजून दुसरा … करीन मग तुमचा नवरेपणाचा हक्क… वर मुळींच राहणार नाहीं. ही लिहुन दिली जयराम रामकृष्ण मराठे द० ता० १०-८-१२ इसवी

सही
शेंगाई मर्द राघो माळी रा०
ता० चिखली नी० बागडी
नो० नं० ४७४

## नोटीस

नोटीस बेशमी लक्ष्मण वल्लद र… ईंगळे जळकेकर हल्लीं रा० खाम… ता० मजकूर जि० बुलडाणें य…

खालीं सही करणार नोटीस देतो… साजे कीं तुह्मी माझी बायको सूरजी हीस दिपवाळी करितां घे… आले. यास सरासरी २-२॥ वर्षे … अद्याप आणून घातले नाहीं माझा … २-३ वेळा घेऊन येण्यास आला अ… तुह्मी पाठविले नाहीं. नंतर मीही … मंडळीसह, तुमचें घरीं आलों अ… तुह्मी माझे बरोबर रवाना करितो ह्मणून २-३ दिवस ठेवून घेऊन नंतर … अखेरीस सांगितले कीं आह्मी पाठ… नाहीं तरी आतां ही नोटीस पावल्यापा… ८ दिवसांत माझे घरीं आणून घाल… न आणून घालाल तर तुमचेवर रिती… माणें दावा करून कोर्ट व नोटिशी… खर्च तुमचेवर पडेल. आमचेवर कोण… प्रकारची जबाबदारी नाहीं. नोटीस दि… ता० २९-८ १२

सही
किसन भोनाजी निशाणी …
नो० नं० ४७५

Registered N N.4

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar.

वर्ष ४ स गण] आकोला-- सोमवार तारीख १६ माहे सप्तेंबर सन १९१२ ई० [ अंक ३७

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट हां. ........२ रुपये
वर्गणी आगाउच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटिशींचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील. नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः- गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटिसास स्पेशल चार्ज पडेल


### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्यां बॅंकेत खालीं दिलेल्या अटींवर ठेवी ठेविता येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नावावर ठेवता येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पाच हजार.वरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बॅंकेत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०९ { G. A. Phillips. एजंट
नं १

### मुंबई बॅंकचें सोनें.

मुंबई बॅंकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बॅंकच्या आकोले उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती करितां बॅंकेंत तपास करावा.

एका चिपचें वजन २६ $\frac{2}{3}$ तोळे असतें. साधारण भाव वऱ्हाड समाचार वर्तमानपत्रांत बाजारभाव ह्या सदराखालीं सांपडेल.

मुंबई बॅंक आकोला २१-९-१० { G. A. PHILLIPS. एजंट
नो० नं० २

### जाहीरात

खरे गारेचे चष्मे. व खात्रीलायक घड्याळें आमचे येथें मिळतील. एकदा अनुभव घेऊन पाहवा खात्री न पटल्यास पैसे परत.

पत्ता एम. एम. आणि सन्स
पुलाजवळ आकोल


## निराश्रित बालरक्षण गृह

Septemb[er]

सर्वत्र जन समाजास अल्प मतीनें व अज्ञान बुद्धीनें व नम्रतेनें जाहीर करण्यांत येते कीं ज्या ज्या ज्ञातींत पुनरविवाहाची वहीवाट नाहीं त्या त्या ज्ञातींत वैधव्याचे प्रमाण दिवसें दिवस वाढत चाललें आहे यामुळें गर्भपात बालहत्यादी पातकें कशीं होतात व त्यांचा परीणाम पातकी व त्यांचे संसर्गी लोकांस कसा भोगावा लागतो व सदरील संबंधानें अनीवार्य संकटांत पडल्यामुळें त्याना किती दुःखें सोसावीं लागतात. ते तपसीलवार लिहिण्यास अशक्य आहे. तरी थोडक्यांत त्याचा परीणाम इतकांच आहे कीं ईश्वरापुढें पातकी, सरकारपुढें गुन्हेगार, व आपआपल्या ज्ञातींत अनेक प्रकारच्या दोषास पात्र व घरांतील आप्त वर्गास स्वतः डोळयावर झांकण टाकून कानाडोळा कसा होतो याचा विचार प्रत्येकांनी स्वतःच करावा. या सर्व गोष्टीविषयीं जगानियंत्या परमेश्वरानें माझे मनांत संचार केल्यामुळें वर दर्शविलेल्या संकटांतून निभावण्याकरितां आकोला ताजनापेठेंत हनुमान वस्तींत मारुतीचे देवळाजवळ **निराश्रित बालरक्षण गृह** स्थापन केलें आहे भाड्यानें घेतलेलें घर केव्हां सोडावें लागेल याचा निश्चय नसतो या करितां मुद्दाम विकत घेतलेलें घर या कामीं अर्पण केलें व वर दर्शविलेल्या नांवाची फळी त्या ठिकाणीं लावलेली आहे. या कामीं संचार करणारा व प्रत्यक्ष हातानी करविणारा व अशा कामीं सर्व प्रकारें निरंतर यश देणारा जगनियंता परमेश्वरच समर्थ आहे.

आपलें अज्ञान बालक जी. श्रीमंतातर्फे
म्यानेजर विष्णू प्रभुराम पेन्शनर
हायकोर्ट पिटिशनरायटर

ता: १६-५-१२ अकोला वऱ्हाड
नो. नं. २६०

## पाहिजे

कम्पाऊन्डरचे काम शिकलेली बाई उमरावती येथील स्त्रियांचे दवाखान्याकरितां पाहिजे आहे. पगार दरमहा रु० २० व घर राहण्यास मिळेल. उमेदवारानें ऑनररी सेक्रेटरी कॉऊन्टेस ऑफ डफरीन फंड वऱ्हाड ब्रॅंच उमरावती यांचेकडे दाखल्याच्या नकलासह अर्ज करावा.

H. E. Banatvala
ऑनररी सेक्रेटरी

नो० नं० ४६९

## शेती भाती

असणाऱ्यांनी आह्मीं तयार केलेल्या शेतकीच्या आउतांचा क्याटलाग मागविण्यास विलंब लावूं नये. ही वेळ फुरसतीची आहे. सबब आतांच क्याटलाग मागवून त्यांतील आऊत पसंत करून आह्मांस पत्र लिहा. ह्मणजे तुह्मांला वेळेवर आऊतांचा उपयोग करण्यास सांपडेल

किर्लोस्करबंधु.
पोष्ट किर्लोस्करवाडी (सं० औंध जिल्हा सातारा ).

नो० नं० ४७०

## विकावयाचीं आहेत.

आकोलें येथील काळे मारुति मार्गे व मि. सावरकर यांचें घरामागें आह्मी नवें घर बांधिलें आहे. ते दुमजली असून त्यास गच्ची व प्रशस्त आंगण आहे.

उमरी प्रगणे बाळापूर ता. आकोला येथील मळा सर्वे नंबर ९१ एकरगुंठे १३।८१६ यांतील उत्तरेकडील आमचा एकाद्वितिऑंश हिस्सा. यांत मोठी विहीर आह्मी चुनेगच्ची बांधली आहे. तींत दोन मोटीस पुरेसें पाणी आहे.

कसबे आडगांव ता. आकोट येथील सर्वे नंबर १४८ एकर १६।३८ सबंध शेत. वरील १ घर व २ शेतें आमचे मालकीची विकावयाचीं आहेत. ज्यांची घेण्याची इच्छा असेल त्यांनीं विशेष माहिती मालकाकडे मिळवावी. ता. २४-८-१९१२

हरी रामचंद्र रोहणखेडकर.
आकोला

नो० नं० ४७१

29

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांस व शेटसावकार यांसः- खालीं सही करणार याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, भोनाजी वल्द बाबुजी सांगुळंपदे रा. जसदगांव ता. आकोट याचेवर आमचा कर्जाऊ पैश्या संबधानें दावा चालूं आहे. तर तो आपलें जसदगांव येथील शेत आह्मास बुडविण्याचें हेतूनें कोणास गहाण, खरेदी वगैरे लिहून देईल, तर ते कोणी घेऊ नये घेतल्यास रद्द समजलें जाईल व कोणी माझ्या फिर्यादीच्या मुदत तारखे पासूनच्या मुदतींत खरेदी वगैरे घेतले असल्यास ते पोकळ व रद्द असे. कळावें.

ता. ६-९-१२

सही
रामचंद्र पुंजाजी जवंजाळ राहणार जसदगांव ता० आकोट नि० खु० हातचा आंगठा

नो० नं० ४८२

23

## जाहिर नोटीस

वि० सबजज्ज साहेब बहादूर आकोला यांचे कोर्टीतः—

सक्सेशन सर्टिफिकेट नं० १९ सन १९१२
सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याबद्दल अर्ज—

अर्जदार
गोविंद विश्वनाथ ऋषी रा. अकोला

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं अर्जदार यानें सक्सेशन सर्टिफिकेट मिळण्याकारितां अर्ज आमच्या कोर्टीत तारीख ७-९-१२ रोजीं दिला असून त्याची चौकशीची तारीख ७।१०।१२ रोजीं आमचे कोर्टीत नेमिली आहे. तरी त्या तारखेस ज्यांची कांहीं तक्रार असेल त्यानीं सकाळीं १० वाजतां आमचें कोर्टांत हजर व्हावें. तसे न केल्यास पुढें कोणत्याच प्रकारची तक्रार ऐकली जाणार नाहीं कळावें ता० ७-९-१९१२ इसवी.

सही
JANKIPR ASAD.
सबजज्ज आकोला.

नो० नं० ४८३

33

## नोटीस

नोटीस बेशमी तायापा वल्द बाबाजी जात मराठे कुणबी रा० बांबरडा (कानाकिरड ) ता० मुर्तिजापुर यांस —

खालीं सही करणार इजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, तुह्मी माझे लग्नाचे नवरे आहां व मी आपलेजवळ आज तारखेपावेतों संसार केला. व आपले पोटची एक मुलगी आहे. अलीकडेस सरासरी ३ वर्षे झालीं तुह्मी मजला पोसत नसून व आपण रांड ठेविली आहे. व मला मुलींच वागवत नाहीं. हल्लीं मी माझे भावाचे घरीं राहून कर्ज काढून पोट भरले अलीकडेस मला कोणी कर्जही देत नाहीं. व मजला आजपावेतों खाण्या बद्दल लोकांचें देणें २०० रुपये झाले आहेत. करितां नोटिशीनें कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्यापासून १९ दिवसाचे आंत मजला झालेले कर्ज २०० रुपये देऊन मजला घेऊन जावे मी येण्यास तयार आहे. व आपण ठेवलेली रांड काढून द्यावी वरील मुदतींत आपण कर्ज न दिल्यास व रांडीस हांकून न दिल्यास मी हीच नोटीस फारकत समजून दुसरा घरठाव करीन व कर्जाचे पैशाबद्दल फिर्याद करून कोर्ट खर्च व नोटिशीचा खर्च भरून घेतला जाईल. कळावें ता. ९.९.१९१२

सही
पुर्णाई तायापा मराठे कुणबी तर्फे लक्ष्मण वा रामजी राहणार मुबारकपूर ता. मुर्तिजापूर द. खु.

नो. नं. ४८४

वऱ्हाडसमाचार.

भाद्रपद शुद्ध ६ शके १८३४ परिधावी

## सरकार आणि हायकोर्टें.

कलकत्याच्या वर्तमानपत्रांतून मिदनापूर प्रकरणांतल्या अपिलाच्या निकाला संबंधानें चाललेला खडाजंगी वाद अजून मिटला नाहीं तोंच मुंबईच्या एका हायकोर्ट जज्जानें एका खटल्यांत दिलेल्या निकाला संबंधानें हिंदुस्थानसरकारानें स्टेटसेक्रेटरी साहेबांस केलेल्या रिपोर्टावरून एक महत्वाचा मुद्दा चर्चेचा विषय होऊन बसला आहे दोन्ही खटल्यांत मुद्दा एकच आहे आणि तो हा कीं सरकारचे अंमलबजावणी करणारे अधिकारी व हायकोर्ट जज्ज यांच्यामध्यें कोणत्या प्रकारचा संबंध असला पाहिजे? मिदनापुरच्या प्रकरणांत एक युरोपियन व दोन देशी अधिकारी खालच्या कोर्टानें गुन्हेगार ठरविले असतां सरकारनें त्यांचा कैवार घेऊन त्यांच्या अपिलाचा जंगी खर्च सोसला व आतां त्या अधिकाऱ्यास अब्रुनुकसानी बद्दल भरपाई दाखल कांहीं इनाम देण्याचा ही बूट निघाला आहे. शिवाय अपील कोर्टाचा निकाल एखाद्या तिऱ्हाईत न्यायाधिशास शोभण्यासारखा नसून अपील करणाऱ्या अधिकाऱ्यांचें वकीलपत्र घेतल्या सारख्या थाटाचा आहे अशीही कित्येक पत्रांची तक्रार आहे. मुंबईच्या प्रकरणाची गोष्ट याच्या अगदीं उलट आहे. ह्मणजे वायव्य सरहद्दी वरील प्रांताच्या अधिकाऱ्यांनीं होती मर्दान येथील नबाबावर कांहीं आरोप करून तो खटला मुंबई हायकोर्टा पुढें चालवून त्यांत नबाब साहेब निर्दोषी ठरून सुटले. या खटल्याचा निकाल सांगतांना ना० न्या० दावर यांनीं सरकारी अंमलबजावणी करणाऱ्या कांहीं अंमलदारांच्या वर्तनावर कडक टीका केली. त्यावरून चिडून हिंदुस्थान सरकारानें हायकोर्ट जज्जाच्या निकाला विरूद्ध स्टेटसेक्रेटरीकडे रिपोर्ट केला आहे व तो ग्याझिटमध्यें प्रसिद्ध केला आहे! आतां या दोन प्रकरणांवरून असें अनुमान काढण्यांत येत आहे कीं अंमलबजावणी करणाऱ्या आपल्या अधिकाऱ्यांचा कैवार घेऊन हवातसा उधळपट्टीनें खर्च करण्यांत व हायकोर्ट जज्जाच्या निकालावर आपली टीका ग्याझिटांत प्रसिद्ध करण्यांत दोन्ही ठिकाणीं सरकार चुकत आहे. मिदनापूर प्रकरणांत झालेला उधळपट्टीचा खर्च सरकारी तिजोरींतून देण्याचें मुळींच कारण नव्हतें आणि मुंबई हायकोर्ट जज्जाच्या निकालावर कडक टीका करण्यानें तर सरकार त्या कोर्टाची इभ्रत कमी करीत आहे आणि आपल्या मर्यादेच्या बाहेर जात आहे असें मुंबई ग्याझिटसारखीं आंग्लो-इंडियनपत्रेंही ह्मणत आहेत. हिंदुस्थान सरकारच्या या वर्तनाचें अनुकरण लवकरच प्रांतिक सरकारेंही करूं लागतील व तसें घडल्यास हिंदुस्थानांतल्या हायकोर्टाच्या स्वतंत्रतेस व त्या कोर्टाच्या निकालावरील लोकांच्या विश्वासास मोठा धक्का बसण्याचा संभव आहे. यासाठीं मुंबई हायकोर्टानें हा अपमान गिळून न बसतां आपल्या इभ्रतीच्या रक्षणासाठीं योग्य तो इलाज करावा असेंही तीं पत्रें सुचवित आहेत.

## राजकीय महर्षि.

मि. दादाभाई नौरोजी यांच्या ८८ व्या वाढ दिवसाच्या निमित्तानें हिंदुस्थानांतून व बाहेरून आलेल्या अभिनंदनपर तारांना व पत्रांना उत्तरादाखल त्यांनीं पाठविलेला संदेश त्या राजकीय महर्षीच्या योग्यतेला, देशहिताविषयींच्या कळकळीला व त्रिकाल ज्ञानिपणाच्या लौकिकाला साजण्यासारखा आहे. सामान्य लोकांच्या दृष्टि भूत व वर्तमान यांच्या पलीकडे फारशी जात नाहीं, पण मि. दादाभाई यांच्यासारख्या मुत्सद्यांची दृष्टि वर्तमान आणि भविष्य यांच्या मधल्या पडद्याला भेदून एक्सरेजप्रमाणें भावी स्थितीचें छायाचित्र आपल्या अपूर्व मानसिक शक्तीनें व तपोबलानें अगोदर लोकांच्या पुढें उभे करून त्यांना सन्मार्गदर्शक होते. गेल्या दिसेंबरांत बादशहा पांचवे जॉर्ज व राणी मेरी साहेब यांच्या आगमनापासून हिंदुस्थानाविषयींच्या राज्यकारभाराच्या धोरणांत जी क्रांति घडून आलेली दिसत आहे ती पंचवीस वर्षांपूर्वीं दुसऱ्या एका राजकीय महर्षीनें ओळखून आपली भविष्यवाणी लिहून ठेविली होती. तशी मि० दादाभाई यांचा आजचा संदेशही भविष्यवाणी आहे. हिंदुस्थानाला वसाहतींचें स्वराज्य देणाऱ्या कलमाच्या अर्थासंबंधानें बड्याबड्या अधिकाऱ्यांत कितीही मारामाऱ्या चालु राहिल्या तरी जोंपर्यंत हिंदुस्थानचे लोक राजनिष्ठापूर्वक व कायदशीर चळवळीचा पिच्छा सोडणार नाहींत, तोंपर्यंत हल्लींची उदार राजनीतीची लाट मागें ढकलली जाणें शक्य नाहीं, ती पुढेंपुढेंच सरकत गेली पाहिजे, आणि हिंदुस्थानचें वसाहतीच्या स्वराज्याचें ध्येय प्राप्त झालेंच पाहिजे, तें चुकावयाचें नाहीं, ही आमच्या राजकीय राजर्षीची भविष्यवाणी कालांतरानें खरी झालेली आह्मी पाहूं अशी आह्मांस उमेद आहे.

## दुष्काळ आणि सहकारिता.

गेल्या दुष्काळांपासून सरकारानें घेण्याजोगे धडे कोणते आहेत हें आह्मी मागच्या अंकांत बऱ्याच विस्तारानें दाखविलें आहे लोकांनीं यापासून काय शिकावयाला पाहिजे आहे या विषयाच्या एका बाजूचा विचार आज कर्तव्य आहे. कोणत्याही प्रयत्नांत सरकारी अधिकारी व लोक यांच्यामध्यें सहकारिता उत्पन्न झाल्याशिवाय तो प्रयत्न सफळ व्हावयाचा नाहीं ही पहिली गोष्ट आमच्या लोकांनीं पुरतेपणीं ध्यानांत ठेविली पाहिजे. दुष्काळ निवारणा सारख्या अत्यंत दुर्घट कामाला तर या सहकारितेची अत्यंत जरूरी आहे. सहकारितेचें तत्व मनुष्यसमाजाच्या कोणत्याही व्यवहाराला योग्य रीतीनें लाविलें असतां तें शुभपरिणामीच होतें. हें तत्त्व दुष्काळनिवारणाला कसें लावावयाचें याबद्दल पुण्याच्या सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे एक उत्साही व उद्योगी सभासद मि० गोपाळ कृष्ण देवधर यांनीं एक योजना तयार केली आहे. ती विचार करण्यासारखी आहे. ते ह्मणतात कीं शेतकऱ्यांनीं दुष्काळनिवारणार्थ एक परस्पर साह्यकारी विमा कंपनी काढावी अशी स्थिति येऊन ठेपली आहे. ब्रह्मदेशांत गुरांचें रक्षण करणाऱ्या विमा कंपन्या निघून त्यांचें काम चांगलें चाललें आहे. मि० देवधर यांचें ह्मणणें असें आहे कीं दुष्काळाच्या वेळीं उपयोगीं पडावा ह्मणून प्रत्येक शेतकऱ्यानें वैरणीचा वेगवेगळा संग्रह करण्यापेक्षा प्रत्येक शेतकऱ्यानें वार्षिक एक रुपया वर्गणी देऊन एक फंड उभारावा व या फंडाचें व्याज त्यातच मिळवीत गेल्यास लवकरच एक मध्यवर्ति पेढी स्थापन होईल व ती दुष्काळाचे वेळीं शेतकऱ्यांच्या गुरांचे प्राण वाचवील, इतकेंच नाहीं तर सावकाराच्या दाराशीं जाऊन त्याची पायधरणी करण्याचा त्याच्यावरला प्रसंग टाळील. सूचना कांहीं वावगी नाहीं. पण तिला मूर्त स्वरूप देण्यास कोणी पुढें येईल तेव्हां खरें.

## शेतींत सुधारणा.

शेती सुधारणेबद्दलचा हिंदुस्थान सरकारचा तिसरा रिपोर्ट नुकताच बाहेर पडला आहे, आणि तो अनेक दृष्टींनीं सध्याच्या काळीं फार महत्त्वाचा आहे निदान एक गोष्ट या रिपोर्टावरून चांगली स्पष्ट दिसते. ती ही कीं आमचें सरकार रयतेच्या कल्याणाविषयीं उदासीन होऊन बसलेलें नाहीं, तर तें आपल्याकडून शक्य तितक्या तऱ्हेनें शेतकऱ्याला मदत करण्याला तयार आहे. लोकांचीच अजून त्या मानानें असावी तशी तयारी नाहीं. रिपोर्टाच्या आरंभीच असें ह्मटलें आहे कीं मध्यप्रांतांतल्या लोकांना शेतकी सभांची उपयुक्तता जशी कळून चुकली आहे तशी इतर प्रांतांतल्या लोकांना अद्याप कळूं लागली नाहीं. मध्य प्रांतांत खजगी लोकांनीं प्रयोगक्षेत्रें उघडलीं आहेत. शास्त्रीय पद्धतीनें शेतकीचें शिक्षण मिळालेले कांहीं कामगार भाताची लावणी, गव्हाला पाणी देणें, किंवा ऊसांची लागवड अशा कामांत सुधारलेल्या पद्धतीचा स्वीकार केल्यापासून कसे फायदे होतात तें लोकांना समजावून देत असतात अशा लोकांना मालगुजारांकडूनही मागणी येऊं लागली आहे. प्रयोगक्षेत्रांची उपयुक्तता ही लोकांस अधिकाधिक कळूं लागली आहे. यामुळें नागपूरचा मालगुजारी क्लास बंद करून त्या प्रीत्यर्थ खर्च होणारा पैसा प्रयोगक्षेत्रें व शेतकी प्रदर्शनें वगैरेकडे लावावा असें सरकारास वाटूं लागलें आहे. मुंबई इलाख्यांत बहुतेक सगळ्या जिल्ह्यांतून शेतकीचें शिक्षण मिळालेले लोक सरकारानें पाठविले आहेत व ते शेतकऱ्यांना त्यांच्या शेतांत जाऊन कोठें कशी सुधारणा करावी त्या संबंधानें योग्य सल्ला मसलत देतात अवश्य लागणारीं वगैरे मागवून . पण या लोकांची देखरेख करण्याचें कामदार सरकारा जवळ नाहींत स्थानिक मागण्या भागण्या इतकी या मपारंगत लोकांची संख्या ही वाढलेली नाहीं ही मोठी अडचण तेथें. हल्लीं वाटूं लागली आहे. मद्रासेंत कांहीं मोठाल्या इस्टेटींत मात्र प्रयोग करून पाहण्याच्या सोयी झाल्या आहेत. पण लोकांत शेतकीच्या नवीन पद्धति प्रिय होण्याला अजून पुष्कळ गोष्टी करावयाच्या आहेत. बंगाल्यांत नवीन पद्धतीच्या शेतकी संबंधानें लोकांत जिज्ञासा व जागृति उत्पन्न झाली आहे. संयुक्त प्रांतांत लहान लहान शेतांतुन सुद्धां प्रयोग करून पाहणें अधिक श्रेयस्कर आढळून आलें आहे. ही जागृति कांहीं थोडी नाहीं. पण शेतीसुधारणेची प्रगति अधिक जोरानें होण्यास देशी भाषांच्या साधनांचा उपयोग हल्लींपेक्षांही अधिक करणें अवश्य आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या भाषेंत जेवढें ह्मणून समजावून देतां येईल तेवढें दिलें जात नाहीं. शेतकीची सुधारणा मौजेची व फायद्याची एक गोष्ट ह्मणून शेतकऱ्यांच्या नजरेस यावयास पाहिजे आहे. त्याकरितां मुद्दाम प्रदर्शनें भरविण्याचे ऐवजीं जत्रा वगैरेच्या निमित्तानें जमलेल्या लोकांच्या नजरेस शेतकीचे गमतीचे प्रयोग पाडण्याचा जो प्रघात मध्यप्रांतानें पाडला आहे तो खरोखर उत्कृष्ट आहे. मुंबई इलाख्यांत मुद्दाम शेतकीचीं प्रदर्शनें भरवून पाहिलीं पण जत्रेसारखीं तीं शेतकऱ्यांना चित्ताकर्षक झालीं नाहींत. बंगाल्यांत मोठाल्या जत्रांच्या वेळीं बियाणें, आउतें व खतें यांचे निरनिराळे नमुने मांडून व त्यांचा उपयोग कसा करावा, व त्यापासून फायदा कसा होतो त्याचें वर्णन देशी भाषेंत छापून वाटल्यापासून पुष्कळच फायदा दिसून आला. फिरत्या उपदेशकांचा उपयोग मध्यप्रांतांत करून पाहिला, आणि तो बराच होतो अशी अधिकाऱ्यांची खात्री झाल्यासारखी दिसते. मुंबई इलाख्यांत हें फिरत्या उपदेशकाचें काम भारी पगाराच्या कामदारांकडे सोंपविण्यांत आलें होतें. हेंच काम हलक्या पगाराच्या पण शेतकीचें शिक्षण मिळालेल्या उपदेशकांकडे देण्यांत आलें असतें तर कदाचित् अधिक उपयोग झाला असता. मध्यप्रांताच्या शेतकी खात्यानें खांडव्याच्या कांहीं शेतकऱ्यांना सरकारी भाड्यानें जबलपुराला नेऊन तेथें त्यांना खरिपाच्या पिकाची लागवड कशी करावी तें दाखविलें. या प्रयत्नाला बरेंच यश आलें व त्यापासून निवडक शेतकऱ्यांची का होईना, पण सुधारणेकडे प्रवृत्ति झाली ही संतोषाची गोष्ट आहे. मुंबईच्या शेतकी खात्याकडून पाटील, शेतकरी वगैरे लोकांच्या मुलासाठीं शेतकी कामाची एक लहानशी शाळा पुण्यास काढण्यांत आली आहे. या शाळेचा अभ्यासक्रम दोन वर्षांचा ठेविला असून त्यांचा निमा वेळ शाळेंत व निमा शेतांत प्रत्यक्ष काम करण्यांत जातो. शाळेंत जरूरीचे हिशेब ठिशेब, थोडेंसें भूगोलज्ञान, सृष्टिज्ञान ( व तेंही प्रत्यक्ष सृष्टिनिरीक्षणाच्या द्वारें ) इ. विषय शिकविण्यांत येतात. या शिवाय आरोग्याविषयीं

सामान्य माहिती, इंग्रजी [illegible]री इ० शेतकऱ्यांना अवश्य लाग[illegible] व्यावहारिक माहितीही देण्यांत येते. यडॉक्तकी शाळांपासून पुष्कळ फायदा होईल असा अंदाज आहे. या उपर प्रत्यक्ष अनुभव कसा काय येतो तें पाहणें आहे. या सगळ्या गोष्टी शेतकींत सुधारणा घडवून आणण्यासाठीं आहे. पण येवढ्यानें काम भागत नाहीं. शेतकरी व गिऱ्हाईक यांची प्रत्यक्ष गांठ घालून देण्याचे कामींही शेतकी खात्याला पुष्कळ करतां येण्यासारखें आहे हें थोड्याशा अनुभवानें कळून आलें आहे. मध्यप्रांतांत बुरी कपास नांवाची एक नवी कापसाची जात लावून पाहिली या कापसाला त्या प्रांताच्या शेतकीखात्यानें गिऱ्हाईक मिळवून दिलें. नागपूरच्या एंप्रेस मिलानें हा सगळा कापूस योग्य किंमत देऊन खरीद केला. तऱ्हेचें तिळाचें पीकही शेतकी सभेच्या विद्यमानें एका दिवशीं बाजारांत आणून तेंही असेंच किफायतीनें विकण्यांत आलें. मुंबई इलाख्यांत धारवाड येथें भडोच कापसाचा पेरा करण्यांत आला होता. त्याची ही लिलावाच्या पद्धतीनें विक्री करण्याची तेथील शेतकी खात्यानें व्यवस्था केली होती. आतां शेतकी खातें मालाच्या चांगुलपणाबद्दल खात्री देईल तर आम्ही सगळा माल खरीद करूं असें ह्मणणारी एक खाजगी मंडळी उर्फ सिंडिकेट मुंबईस निर्माण झाली आहे. सारांश, गेल्या पांचसात वर्षांत सरकारच्या शेतकी खात्यांच्या प्रयत्नामुळें शेतीनें सुधारणेच्या मार्गांत प्रगति दाखविली आहे, आणि या बद्दलचें श्रेय सरकारच्या सद्धेतूस व त्यांच्या अविश्रांत श्रम करणाऱ्या शेतकीखात्याच्या अंमलदारास देणें अगदीं वाजवी आहे.

## महाराष्ट्र साहित्यसंमेलन.

महाराष्ट्र साहित्यसंमेलनाची ७ वी बैठक आकोलें येथें ता० २९, ३०, व ३१ आक्टोबर मंगळवार ते गुरुवार या दिवशीं भरण्याचें ठरलें आहे. याच सुमारास वऱ्हाडच्या शाळाखात्यांतील अधिकारी व मास्तर यांचें संमेलन ता० २८-३० आक्टोबर रोजीं आणि वरिष्ठ शाळांतील मुलांच्या कसरती व खेळ ता० ३१ आक्टोबर आणि ता० १ नोव्हेंबर रोजीं होणार आहेत. साहित्यसंमेलन व विद्याखातें यांचा निकट संबंध असल्याकारणानें दोन्हीं संमेलनें एकाच वेळीं भरण्याचें ठरविण्यांत आलें आहे. यामुळें कोणत्याही संमेलनास येणाऱ्या गृहस्थांस व स्त्रियांस दुसरें संमेलन पाहण्याचा अनायासें योग येणार आहे. साहित्य संमेलनांत कांहीं निबंध वाचले जातील व कांहीं व्याख्यानें होतील. निबंध लिहिणारांचीं व व्याख्यानें देणारांचीं नांवें साहित्यसंमेलनाचें कार्यपत्रक वर्तमानपत्रांतून संमेलन भरण्यापूर्वीं १५ दिवस अगोदर प्रसिद्ध केलें जाईल, त्यांत दिलीं जातील. यंदांच्या साहित्यसंमेलनांत रा० रा० हरि नारायण आपटे यांस अध्यक्ष करण्याचें ठरलें असून त्यांनीं तें पत्करिलें आहे. महाराष्ट्रभाषाभिमानी अशा सद्गृहस्थांनीं या संमेलनास अगत्य यावें अशी आमची विनंती आहे. संमेलनास येणाऱ्या सद्गृहस्थांनीं आपण कोणा आप्तांच्या किंवा मित्राच्या घरीं उतरणार असाल, तर कोठें उतरणार तें कळवावें. आपली तशी सोय नसल्यास आपणांस विनंति आहे कीं, आह्मी पाहुण्यास राहण्याकरितां व भोजनाकरितां पुरुषाकरितां आणि स्त्रियाकरितां निरनिराळी जागा तयार करणार आहों, तेथें आपण उतरावें या जागेंत उतरण्याचा निश्चय आपण केला, तर आह्मास पत्रोत्तरीं कळविण्याची मेहेरबानगी करावी ह्मणजे किती पाहुणे येतील, याचा अंदाज करून त्याप्रमाणें व्यवस्था करण्यास ठीक पडेल. पत्राचें उत्तर संमेलनाचे चिटणीस—रा० रा० श्रीधर अनंत भागवत C/O रा० ब० विष्णु मोरेश्वर महाजनि, एम. ए, अकोलें (वऱ्हाड) या पत्यावर ता० २० सप्टेंबरच्या आंत पाठवावें. यंदाच्या संमेलनाचे स्वागत कमिटीचे अध्यक्ष रा० ब० विष्णु मोरेश्वर महाजनि, चिटणीस रा० रा० रामचंद्र हरी देवधर, रा० रा० अनंत सखाराम आठल्ये, रा० रा० विष्णु बाळकृष्ण मराठे, रा० रा० श्रीधर अनंत भागवत, कायमचे चिटणीस-रा० रा० वासुदेव गोविंद आपटे, बी. ए. हे असून संमेलनापुढें चर्चेकरितां विषय येणार आहेत, ते येणेंप्रमाणें:—

(१) मराठी वाङ्मयाची गेल्या वीस वर्षांत ग्रंथसंख्येच्या मानानें नव्हे तर ग्रंथाच्या योग्यतेच्या मानानें ह्मणजे खऱ्या वाङ्मयाच्या दृष्टीनें प्रगति होत आहे कीं नाहीं? काव्य, इतिहास व चरित्रें या तीन विषयावरच चर्चा व्हावी.

(२) सृष्टिशास्त्र व मानसशास्त्र या संबंधीं वाङ्मय तयार करण्याकरितां कोणते उपाय योजण्यासारखे आहेत?

(३) नूतन ग्रंथकारांत उत्तेजन कोणत्या रीतीनें देतां येणें शक्य आहे?

(४) साहित्यपरिषदेचें काम वर्षभर सतत चालावें व साहित्यसंमेलन वर्षांतून एकदां तरी निश्चित भरावें, यासंबंधीं काय योजना करावी?

(५) ग्रंथकार व ग्रंथ प्रसिद्ध करणार यांचे संबंध जास्त निकट होण्याला काय करितां येईल?

(६) प्रांतोप्रांतीं (१) मराठी वाङ्मयाचा अभ्यास करण्य करितां व (२) मराठींत स्वतंत्र अथवा इतर भाषांतील ग्रंथांच्या आधारें नवीन ग्रंथ रचण्याकरितां साहित्यपरिषदेच्या पोटमंडळ्या स्थापन करितां येतील काय? हल्लींच्या तुकाराम सोसायटी ऐतिहासिक सोसायटी इ. त्यात समाविष्ट होतील काय?

(७) साहित्यसंमेलनाच्या सभासदांना मराठी साहित्यवृद्धीकरितां काय काय करतां येईल?

(८) मुख्य जातींच्या, पोटजातींच्या परिषदा ज्ञानप्रसाराकरितां उद्योग करीत आहेत, त्यांत साहित्यसंमेलनांत प्रतिनिधी पाठवितां येणें किंवा अन्य मार्गानें त्याच्या कार्याला मदत देतां येणें शक्य आहे काय?

## 'हिंदु' शद्बाची नवी व्युपत्ति

'हिंदु' या शद्बाची व्युत्पत्ति अनेकांनीं अनेक प्रकारें आजपर्यंत केली. कोणी ह्मणतात कीं 'हिंदु' हा शद्ब फारशी असून त्याचा अर्थ काळा असा आहे. कोणी युरोपियन ग्रंथकार तो शद्ब 'सिंधु' शद्बापासून निघाला आहे असें प्रतिपादतात. परंतु मि० सभापति मुदलियार नांवाच्या एका मद्रासी लेखकानें या शद्बाचा संबंध अथर्व वेदाशीं जोडला आहे. ते ह्मणतात कीं पूर्वीं आर्यांना 'इंदु' अशी संज्ञा असे. अथर्व वेदांत 'इंदवः पितरः' असें पद आलेलें आहे. हें नांव आर्यांना मिळण्याचें कारण त्यांच्या विद्वत्तेचें तेज हें होय. आर्यऋषि फार विद्वान् असत. ज्या प्रमाणें इंदूचे किरण तमाचा नाश करतात, त्याप्रमाणें ऋषींच्या ज्ञानचंद्रानें अज्ञानतिमिराचा नाश केला. यावरून ऋषींना (आर्यांना) इंदु हें नांव पडलें असें मि० मुदलियार यांचें ह्मणणें आहे. कल्पना जितकी मोहक आहे तितकी ती मिथ्याही आहे. कारण कीं आर्यांना जर इंदु हें नांव होतें व तें त्यांच्या गौरवाचें सूचक होतें तर तें पुढें त्यांनीं कां सोडलें? केव्हां सोडलें? व आर्यांना इंदु ह्मणत या गोष्टीचें प्रत्यंतर अथर्व वेदांतल्या एखाददुसऱ्या पदाखेरीज सगळ्या संस्कृतवाङमयांत आढळूं नये हें आश्चर्य नव्हे काय? असल्या निराधार व्युत्पत्ति शोधून काढण्याचे निरर्थक श्रम आमच्यांतल्या विद्वान शोधक आपल्या मेंदूला न देतील तर बरें. एका गृहस्थानें मराठींतल्या 'सोवळया' शद्बाची व्युत्पत्ति 'कोंबडा' या शद्बापासून काढली आहे! संस्कृतांत ड व ळ हीं अक्षरें आणि व आणि ब हीं अक्षरें परस्परांबद्दल येऊं शकतात. तेव्हां कोंबडा या पासून कोंवळा येवढा शद्ब सहज सिद्ध होतो. अडचण काय ती राहिली 'को'ची इंग्रजींत सीचा उच्चार क व स असा दोन्ही तऱ्हेचा आहे तो नियम हाताशीं घेऊन या व्युत्पत्ति बहादुरानें कोंबड्याच्या गळांत सोंवळें अडकविलें! रा० राजवाडे यांच्या जवळ अशा व्युत्पत्तींचा अक्षय्य संग्रह आहे त्यापासून दुसरा कांहीं उपयोग झाला नाहीं तरी घटकाभर करमणूक चांगली होते.

## पदवीधरांची मराठी भाषा.

पंचवीस तीस वर्षां पूर्वीं महाराष्ट्रांत तरी निदान अशी स्थिति होती कीं पदवीधरानें मराठी भाषा लिहिण्याचा प्रयत्न करणें ही गोष्ट जगांतल्या आश्चर्यांतलें अत्यंत मोठें आश्चर्य गणलें जात असे. सुदैवानें निबंधमालाकारांच्या सणसणीत टीकेचा सुपरिणाम होऊन पदवीधरांचे ठायीं मराठी भाषेंत लेख लिहिण्याची स्फूर्ति उत्पन्न झाली. पण नुसती स्फूर्ति व हौस उत्पन्न होऊन काय उपयोग? कोणतीही भाषा लेखकास प्रयत्नावांचून आणि व्यासंगावांचून वश होत नसते. भाषेंत प्रभुत्व मिळवूं इच्छिणारानें त्या भाषेंतले उत्तमोत्तम ग्रंथाचें परिशीलन करावयास पाहिजे तें फारच थोड्या पदवीधरांचे हातून होत असतें व तेवढेच पदवीधर लेखक नामांकित झाले आहेत. बाकीच्यांची भाषा ह्मणजे मराठी पेहराव केलेली साहेबी भाषा असते. हल्लीं असे पुष्कळ पदवीधर लेखक मासिक मनोरंजन, ज्ञानप्रकाश, व इंदु प्रकाश इ० दैनिक पत्रें यांतून झळकत असतात. यांच्या लेखांनीं विचाराच्या दृष्टीनें काय लाभ होत असेल तो सांगवत नाहीं, पण भाषेच्या शुद्धतेच्या दृष्टीनें पाहिलें तर भाषेची दुर्दशा होत आहे असेंच ह्मणणें भाग पडतें. याचें ताजें उदाहरण कोणास पाहावयाचें असेल तर विविधज्ञान विस्ताराच्या आगष्टच्या अंकातला पहिला लेख पहावा. हा एका एम. ए. पदवी धारण करणाऱ्या प्रोफेसरांच्या लेखणींतून उतर[illegible] आहे हें वर नांव नसतें तरी चा[illegible] वाचकांस तेव्हांच कळलें असतें. शुद्ध[illegible] नाच्या सामान्य नियमांची सुद्धां [illegible] वेडीवाकडी वाक्यरचना, दूरान्वयदो[illegible] योजनेंत शिथिलता, प्रचलित सम[illegible] शद्बाचे जागीं बोजड संस्कृत श[illegible] जना इ० दोष पदवीधरांचे ले[illegible] असूं नयेत. "वेदांत" ही [illegible] ज्ञानाची एक शाखा आहे, [illegible] असतां केवळ सामान्यतः [illegible] ज्ञान अर्थानें त्या शद्बाचा उपयोग करणें सुशिक्षितांस तरी उचित नाहीं. अश[illegible] लेखांचा सुकाळ झाल्यापासूनच मरा[illegible] भाषेची अवनति स्पष्टपणें दृग्गोचर होऊ[illegible] लागली आहे. 'आपले माझ्यावर फार आभार आहेत; मी आपली फार उपकारी आहे' अशा तऱ्हेची भाषा सुशिक्षित पदवीधराच्या तोंडीं व लेखांत असणें कोण[illegible] त्याही दृष्टीनें क्षम्य नाहीं. पण या चुक[illegible] नेहमीं त्यांचे कडून घडतात. पूर्वींपेक्षां आतांच्या पदवीधरांत मराठी लिहिणारांचें प्रमाण ज्यास्त असेल. पण तेवढ्यावरच समाधान न मानतां मराठी भाषेचा व्यासंग पदवीधरांत ज्यास्त वाढेल अशी कांहीं तरी तजवीज होणें इष्ट आहे. यंदाच्या साहित्यसंमेलनानें वाटलें तर हा विषय चर्चेसाठीं हातीं घ्यावा अशी आमची सूचना आहे

## पनामा कालवा

